साप्ताहिक ७/१४ सप्टेंबर ८५। दोन रुपये

# माणूस

## हाजिरा ते जगदिशपूर

## १७३० किलोमीटर्स जमिनीखालून





## एक रंगलेला मेळावा

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : पंधरा व सोळा

७/१४ सप्टेंबर १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

छायाचित्रात, डावीकडून : शरद जोशी, विनायकराव पाटील, वि. वि. गोखले, अनंतराव कुलकर्णी, विनय हर्डीकर, अनिल काळे, श्री. ज. जोशी आणि प्र. गो. केतकर.




# मुंबापुरी

## □ बिनधास्त !

अंतुले सुटले. अन् चांगले घसघशीत सुटले. इमर्ज झाले. खाशी जिरली या विरोधी पक्ष-वाल्यांची. साधा कॉमन सेन्सही नाही या बेट्यांना. अहो, पब्लिकला अंतुले जाम आवडतात. प्रेसलाही अंतुल्यांविषयी फॅसिनेशन आहे.

गुळचट, गुळमुळीत गांधीवाद्यांपेक्षा अंतुल्यांचा 'डॅश' लोकांना भावला. पैसा तर ऊठसूट जो तो खातोही. त्यात नवल ते कसलं? पण अंतुले कसे धैर्यधर! चक्क दूरदर्शनवरच दाखवायचे. खुल्लमखुल्ला. कोणाची भीती नाही. कसा निडर माणूस आहे. अंतुल्यांची ही बिनधास्त स्टाईल म्हणजे सामान्यांना ऑनेस्टी वाटते. उगाच गांधीवादाची जपमाळ करत नाहीत. सत्ता टिकवण्यासाठी सगळ्या गिमिक्स कराव्या लागतात. जे अंतुले डेअरिंगबाजीने करतात. हा माणूस चांगला. गरीब बिचाऱ्याला सगळे छळायला टपून बसलेत असा एकूण सहानुभूतीचा सूर सर्वत्र. या सगळ्या बॅक-ग्राऊंडवर अंतुल्यांच्या विजयाची झळाळी विशेष जाणवावी.

प्रधानमास्तर, साठा उत्तराची कहाणी चांगलीच सुफळ संपूर्ण झाली म्हणायची. आता यांच्यावर एक फक्कड पुस्तक लिहून काढा बघू. किमान, उत्तम छपाईचं बक्षिस तरी मारालच सामंतजी, तुम्ही आधी तंट्या भिल्लाची गोष्ट वाचून काढा. चांगली उद्बोधक गोष्ट आहे हो !

## □ गोपनीय

कोणत्याही ठरावावर 'गोपनीय' लिहिले की, तो वृत्तपत्रांनी छापू नये असा महापालिकेत संकेत आहे. हा प्रघात कोणत्या आयुक्तांच्या कारकीर्दीत सुरू झाला, याची आम्हाला कल्पना नाही. मात्र आतापर्यंत पत्रकारांनीही फारशी तक्रार न करता 'गोपनीय' ठराव छापले नाहीत. जे ठराव निर्णयाप्रत पोहोचेपर्यंत जनतेपुढे येणे हिताचे नसेल, तसेच महापालिकेतील नेमणुका किंवा कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाची चौकशी, ह्याबद्दलचे ठराव प्रशासनाने 'गोपनीय' ठरविणे आम्हाला समजू शकते; परंतु ह्या अशा अधिकाराचा कित्येकदा गैरवापर होतो. जे ठराव प्रशासनाला अडचणीत आणणारे असतात किंवा ज्या ठरावांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उजळ प्रतिमेला धक्का बसण्याची शक्यता असते असे ठराव गोपनीय करण्याचा प्रयत्न होतो.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे बेस्ट प्रशासनाचे महाव्यवस्थापक पु. बा. केरकर यांनी मांडलेला ठराव. चौतीस वर्षांच्या नोकरीनंतर केरकर ऑक्टोबर एक पासून बेस्ट प्रशासनामधून निवृत्त होत आहेत. एकूण चौदा वर्षे त्यांनी महाव्यवस्थापक म्हणून काम पाहिले. गेल्याच महिन्यात केरकरांनी महापालिकेच्या बेस्ट समितीपुढे प्रस्ताव ठेवला की, निवृत्तीनंतरही त्यांना कुलाबा येथील मेहेर मॅन्शन या बेस्टच्या अधिकारी वर्गासाठी राखून ठेवलेल्या इमारतीत जागा दिली जावी. मेहेर मॅन्शनमधील फ्लॅट आपण व आपली पत्नी ह्यात असेपर्यंत केवळ पंचवीस रुपये भाड्याने आपणास वापरण्यास द्यावा अशा स्वरूपाचा हा ठराव होता. ह्या जागेच्या बदल्यात घाटकोपर येथील आपल्या मालकीचा फ्लॅट केरकरांनी बेस्ट प्रशासनाला आपल्या अधिकाऱ्यांसाठी देऊ केला.

केरकरांचा युक्तिवाद असा होता की, कुलाबा येथील रहाणीमान जरा खर्चाचे आहे, त्यामुळे प्रशासनातील अधिकारी तेथे येण्यास उत्सुक नसतात. या उलट घाटकोपर येथील रहाणीमान स्वस्त असल्याने तेथे रहाणे बेस्ट अधिकाऱ्यांच्या फायद्याचेच आहे असा भास निर्माण करण्याचा त्यांचा खटा-

टोप होता. महत्त्वाचा भाग हा की, हा ठराव बेस्ट समितीपुढे 'गोपनीय' म्हणून माडण्यात आला.

आणि तरीही तो वृत्तपत्रानी छापला. अशा या बेजबाबदार वागण्याला काय म्हणावे ? दुर्दैवाने, निवृत्तीनंतर अशा प्रकारे प्रशासनाची जागा भाड्याने देणे गैर आहे, अशा प्रकारचा शेरा महापालिकेच्या ऑडिट खात्याने दिला अशा तऱ्हेने नियमाविरुद्ध जागा दिल्याने समिती अनिष्ट पायडा पाडील असे मत खात्याने व्यक्त केले; परतु केरकरानी बेस्ट समितीतील शिवसेना आणि काँग्रेस आयमधील सदस्याना आपल्या बाजूला करून घेतले होते ऑडिटरने दिलेल्या निर्णयाविरुद्ध त्यानी खाजगी वकिलाने दिलेला सल्ला समितीच्या सदस्यापुढे ठेवला. महापालिकेच्या जागा केवळ नोकरीतील अधिकाऱ्यासाठीच राखून ठेवल्या जाव्यात आणि इतर कुणालाच भाड्याने देता येणार नाहीत असे महापालिकेच्या कायद्यात कोठेही म्हटलेले नाही असा हा सल्ला होता. केरकरसाहेब, प्रश्न कायद्याचा नव्हता, नीतिमत्तेचा होता. आजपर्यंत बेस्टमधून निवृत्त होणाऱ्या उच्च अधिकाऱ्यानी तीन महिन्याच्या आत मेहेर मॅन्शनमधील जागा सोडावी असा आपणच आग्रह धरल्यानतर आता अचानक हा अपवाद काय म्हणून ? असो

समितीने अखेर केरकराना जागा दिली. तशी ती देणे योग्य की अयोग्य ह्या वादात आम्हाला पडायचे नाही. आमचा प्रश्न असा आहे की, हा ठराव 'गोपनीय' म्हणून का माडण्यात आला ?

मांजर डोळे मिटून दूध पिते म्हणूनच ती चोरी करते आहे असा सशय येतो. तिने डोळे उघडे ठेवून सर्वांच्या देखत दुधाला तोड लावले तर ते तिच्या मालकी हक्काचे आहे असा इतराचा समज होऊ शकतो– निदान आमचा तरी !

—विष्णु जयदेव

# मेळावा, परिसंवाद - माणूसमित्रांचा

रविवार दिनाक २५ ऑगस्ट. स्थळ पूनमचा हॉल. 'माणूस'च्या पचविसाव्या वर्षानिमित्त माणूस मित्र–परिवारान अनौपचारिक स्वरूपाचा एक समारभ आयोजित केला होता.

रविवारची पूनमवरची सकाळ उत्साही, प्रसन्न होती माणस हळूहळू येत होती. खूप दिवसांनी भेटल्यानंतर जे होतं तीच अवस्था सगळ्यांची होती. हॉलमध्ये जाण्यापूर्वी पाहिल तर बाहेरच अनत भावे-पुष्पा भावे, राजेंद्र बर्वे–ललिता बर्वे, फिरोझ–प्रतिभा रानडे ही खास मुबईहून आलेली लेखक जोडपी आतमध्ये येणाऱ्या पुण्याच्या गो. रा. जोशी, मगला गोडबोले, गिरीश प्रभुणे आणि आणखी कुणाकुणाची ओळख करून घेत होती नऊ-सव्वानऊला हॉलमध्ये पाहावे तर सयोजक सत्कार समितीचे प्रमुख वि. ग कानिटकर, रगा मराठे याची गडबड चाललेली तर समितीतले उरलेले तिघ–विद्याधर पुडलीक, श्री. ज. जोशी आणि वि. शं. पारगावकर शातपणे कोण येतय–कोण जातय हे पाहत असलेले. पचाहत्तर–शभर माणसांनी भरलेल्या हॉलमध्ये गप्पा रंगायला लागणार एवढ्यात वि. ग पुढे आले बैठ्या स्टेजवर बसलेली मोनिका पुडलीक सतारीच्या तारा जुळवत बसली होती. (मगापासून येणारे सूर हे इकडून यत होते तर ! ) तिच्याकडे लक्ष वेधून वि. ग म्हणाले, आता मोनिकाच्या सतारवादनान कार्यक्रमाला सुरुवात होईल. मग हळूहळू गप्पा मारायला हरकत नाही.

तर कार्यक्रम असा सुरू झाला. सतारीच्या प्रसन्न सुरानी कोणता राग होता ते काही कळल नाही; पण उत्साही वातावरणाला साजेसा होता हे नक्की. मोनिकाच्या सुरानी मैफिलीला सुरुवात झाली. श्रोत्यात होते– कॉंटिनेंटलचे अनंतराव कुलकर्णी, शेतकरी सघटनेचे शरद जोशी, 'माणूस'चे मित्र आ. विनायकराव पाटील, म. श्री. दीक्षित, रविंद्र पिंगे, कोल्हापूर सकाळचे विजय कुवळेकर, शाताबाई किर्लोस्कर, वि स. वाळिंबे, दत्ता मिरासदार, मधुकाका कुलकर्णी, विनय हर्डीकर, सतीश कामत, सजय सगवई, मुबापुरीवाले विष्णु–जयदेव; 'माणूस'च्या लेखिका मंगला गोडबोले, शोभा भागवत, विनया खडपेकर; श्रीभाऊचे जवळचे मित्र नाशिकचे शशिकात टॅंबे, प्रा. व सौ. स. ह. देशपांडे, श्री. पु गोखले, रवीद्र गुर्जर, चंद्रशेखर मराठे शरद गोखले आणि माणूसच्या आणि माजगावकराच्या धाग्यानी जोडलेले बरेच जण. 'कोरम' असा 'जमला' होता.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत कार्यक्रम चालणार आहेत आणि सगळे कार्यक्रम अनौपचारिक असणार आहेत हे विगंनी आधीच सागितल होतं मोनिकाचे सूर कानात रेंगाळताहेत तोवर परिसवादाची मडळी स्टेजवर आलीसुद्धा विषय होता– 'ध्येयवादी वृत्तपत्राचे भवितव्य' आणि संचालक स. शि. भावे–त्यामुळे या परिसवादाला शिस्त लागण्याची भीतीच होती. पण वक्त्यानी ही शिस्त पुढे चागलीच धुडकावून लावली. परिसवादात बोलले तरुण भारतचे माजी संपादक वि. ना. देवधर, ललिता बर्वे, तरुण लेखक-कवी राजा दीक्षित, कोल्हापूर सकाळचे सपादक विजय कुवळेकर, टी. व्ही. स्टार अनत भावे, आणि प्रकृती ठिक नसतानाही आलेले सोबतचे ग. वा. बेहेरे.

परिसंवाद सुरू होण्यापूर्वी स. शि. भावेंनी आपल्या प्रास्ताविक भाषणात सागितल की, जरी नियोजित विषय 'ध्येयवादी वृत्तपत्राचे भवितव्य' असा असला 'तरी ध्येयवादी वृत्तपत्राची सद्य. स्थिती' असा विषय असावा. स. शि. भावेंनी प्रास्ताविकात तीन महत्त्वाचे मुद्दे माडले की, आर्थिक कारणामुळे माणूस बद होणार असेल तर त्यातून मार्ग निघू शकतो. जस राजवाडे सशोधन मदिर चाल राहण्यासाठी राजवाडे अर्बन बँक सुरू केली. दुसरी गोष्ट सार्वजनिक प्रसार माध्यमे शासनाच्या अधिकारात असल्यामुळे आज ध्येयवादी नियतकालिकानाच स्वातंत्र्य आहे

आणि ही नियतकालिके टिकणं ही नागरीक म्हणून आमची गरज आहे. तिसरा मुद्दा माजगावकरांनी आपल्या जागी नवीन माजगावकर तयार करण्याचा. त्यासाठी तरुण मंडळी पुढे येऊ शकतील. तेव्हा हाही प्रयोग करून पहायला हरकत नाही.


एवढया प्रास्ताविकानंतर प्रथम बोलले वि. ना. देवधर. ते म्हणाले,' जून महिन्यातील एका अंकात आलेल्या माजगावकरांच्या निवेदनातून आजच्या परिसंवादाचा विषय निर्माण झाला. सर्व समाजातच आज ध्येयवादाची आस्था घटत चालली आहे असा सार्वत्रिक अनुभव आहे. हे फक्त नियतकालिकांबाबत मर्यादित नाही. स्काऊट ग्राउंडवर खेळणाऱ्या मुलांच्या संख्येत गेल्या वीस वर्षात झालेला बदल हेही याचे उदाहरण म्हणता येईल. ध्येयवादाशी निगडीत वाङमयाचं स्थान काय, त्याला मागणी किती याबद्दल कोणत्याही ग्रंथालयात चौकशी केली तरी आपल्याला निराशाजनक उत्तर मिळेल. म्हणजे एकूणच ध्येयवादी वाङमयाची आस्था कमी. वृत्तपत्रांमध्ये जशी नवीन तंत्रं येतात तशा किमती वाढत जातात. किंमत वाढू नये म्हणून नवी तंत्रं टाळणं शक्य नाही, कारण या स्पर्धेच्या युगात टिकाव लागणार नाही. कारण ज्याचं निर्मितीमूल्य चांगलं ते घेण्याकडे ग्राहकाचा कल असणं स्वाभाविक आहे. ज्यांचा ध्येयवादाशी फारसा संबंध राहिलेला नाही असा ग्राहकवर्ग फार वाढत चालला आहे. या समस्यांना सर्वच ध्येयवादी वृत्तपत्र–नियतकालिकांना तोंड द्याव लागत आहे. एकीकडे 'इंडिया टुडे'चा प्रबुद्ध वाचक तर दुसरीकडे आकर्षक ते घेणारा साक्षर वाचक या कात्रीत ध्येयवादी नियतकालिकं अडकली आहेत. तेव्हा ज्यांना त्याची आस्था आहे त्यांनी ते टिकवावं.'

देवधरांनंतर ललिता बर्वे बोलल्या. माणूस आणि माजगावकरांच्या संदर्भातले काही व्यक्तिगत अनुभव त्यांनी प्रातिनिधिक म्हणून सांगितले. त्या म्हणाल्या, 'माणूसमध्ये वैचारिक सहिष्णुता असल्याने त्यात लिहिताना कधीही, हे लिहू की नको, असे वाटत नाही. कारण वैचारिक मोकळेपणा लेखकाला मिळतो. आज एका बाजूला वैचारिक उलथापालथ तर दुसरीकडे प्रसार माध्यमांची नवीन लाट उसळलेली दिसते आहे. यात वैचारिक साहित्याची स्थिती मात्र गंभीर आहे. अशा परिस्थितीत माणूस चालू रहाणे गरजेचे आहे.'

श्रीभाऊंच्या संपादनाबद्दलचे अनुभव आणि वेगळेपण सांगताना त्या म्हणाल्या,



**कानिटकर आणि टाळी ? साहित्यवर्तुळात असं बोललं जातं की, कानिटकरांनी टाळी दिली की, ती गोष्ट उत्तम असणारच. मोनिका पुंडलिकच्या सतार वादनानंतर छायाचित्रकार निशिकांत जाधव याने कानिटकरांची ही दुर्मिळ पसंती बरोबर टिपली. बसलेले : (डावीकडून) श्री. बाबा भाले, सत्कार मेळाव्याचं संयोजक रंगा मराठे, वि. शं. पारगावकर, ललिता बर्वे, श्री. ग. मा., सौ. शुभश्री माजगावकर, सौ. रेखा माजगावकर, गुरू माजगावकर आणि श्री. ग. मां.च्या मातोश्री...**



**‘वैचारिक मोकळेपणा लेखकाला हवा असतो’...ललिता बर्वे**
**व्यासपीठावर (डावीकडून) वि. ना. देवधर, स. शि. भावे, विजय कुवळेकर आणि राजा दीक्षित**

□

‘श्रीभाऊंचा आणि माझा परिचय चार-पाच वर्षांपूर्वी झाला. जरा घाबरतच लॉरेन्सवरील लेख मी अनाहूतपणे माणूसकडे पाठवला आणि त्याची दाद घेतली गेली. एवढंच नाही तर आरंभी ५।६ पानांचा लेख पुढे दसपट वाढला. लेख वाढण्याची जी प्रक्रिया घडली तो म्हणजे संपादक लेखकाला कसा घडवू शकतो याचा दुर्मिळ अनुभव आहे. असे सर्जनशील संपादक फार थोडे आहेत. श्रीभाऊंच्या संपादनाचं वैशिष्टय म्हणजे त्यांच्या संपादनात मार्गदर्शन आहे पण ढवळाढवळ नाही. संपादक हा लेखक व वाचक यातला दुवा असतो. तो लेखकाकडे वाचकाचे व वाचकाकडे लेखकाचे प्रतिनिधित्व करतो. आज ‘माणूस’सारखं वैचारिक व्यासपीठ आवश्यक असताना ते बंद पडण्याचा विचार अनावश्यकच नाही तर अप्रस्तुत आहे.’

नंतर बोलले राजा दीक्षित. ललिता बर्वेंचाच मुद्दा पुढे नेत ते म्हणाले, ‘माणूस-मध्ये नवोदित लेखक, त्याचे वय काय वगैरेपेक्षा तो लिहितो काय आणि कसं याचाच विचार केला जातो. लेखकाला काय म्हणायचं याचं पुरेसं स्वातंत्र्य माणूसमध्ये नेहमीच मिळत गेलं. त्यामुळे आपण ‘माणूस’मध्ये लिहित आहोत या जबाबदारीचं सतत भान रहातं. आपण ज्यांच्यासाठी लिहितो ते नेमकं तिथे पोचेल अशी खात्री असते. अशा नियतकालिकांची संख्या फार कमी आहे म्हणून माणूसची आवश्यकता आहे. टिळक–आगरकरांचा जमाना आता राहिला नाही हे मान्य करूनसुद्धा शेतकरी आंदोलन, ग्रामायन चळवळ यांना प्रसिद्धी मिळण्यासाठी, त्याच्या कार्याची साधकबाधक चर्चा होण्यासाठी ‘माणूस’-सारखी माध्यमंच आवश्यक असतात. म्हणून माजगावकरांनी निवृत्तीचा विचार केला तरी त्यांना रोखण्याची जबाबदारी आपली आहे आणि ‘माणूस’ समाजाच्या गरजेकरता चालू राहिलं पाहिजे याबद्दलच्या आपल्या जबाबदारीचं भान आपण ठेवू.’

इथ परिसंवादाचे संयोजक स. शि. भावेंना ध्येयवाद की व्यवहार हा मुद्दा मांडून मूळ विषयाकडे थोडे लक्ष वेधावे लागले. कारण चर्चेचा रोख ‘माणूस’ पुरताच मर्यादित राहिला.

यानंतर माजगावकरांचे ज्येष्ठ स्नेही श्री. पु. गोखले यांनी थोडक्यात एक मुद्दा मांडला की, ध्येयवाद आणि व्यवहार हे दोन्ही सांभाळता येईल, तर अशा मार्गाचा वापर का करू नये?

मूळ विषयापासून दूर चाललेल्या चर्चेला कोल्हापूर सकाळचे संपादक विजय कुवळेकर यांनी आपल्या मुद्देसूद बोलण्यान स्पष्ट सूर दिला. ते म्हणाले, ‘माणूस, सोबत, साधना ही वृत्तपत्रं आणि इंडिया टुडे, टाईम्स ऑफ इंडिया यांची तुलना करण्यात अर्थ नाही, हे लक्षात ठेऊनच पुढील चर्चा केली पाहिजे. ध्येयवादी नियतकालिकांचे भवितव्य काय याचा विचार करताना ‘भवितव्य’ म्हणजे नेमके काय अपेक्षित आहे हे आधी स्पष्ट झालं पाहिजे. प्रचंड खप, प्रचंड आर्थिक उलाढाल असे अपेक्षित असेल तर त्यात व्यावसायिकता आली. आधुनिक तंत्राचा अवलंब आणि माजगावकरांनी आपल्या निवेदनात उल्लेख केल्याप्रमाणे पुढील बंधनं आली तो अपरिहार्य ठरतात. तेव्हा ‘माणूस’च्या स्वरूपाची नियतकालिकं आहेत त्या स्वरूपात पुढे चालू राहणार का, असा भवितव्य याचा अर्थ ठरतो. सध्या ध्येयवादी वृत्तपत्रांच्या बाबतीत सर्वत्र निराशेचा सूरच ऐकू येतो. ध्येयवादी माणसं कमी आढळतात वगैरे बोललं जातं. पण पूर्वीसुद्धा समाजात सगळीकडे ध्येयवाद भरला होता असं नाही. ध्येयवादाचे स्फुल्लिंग असलेली माणसं मोजकीच होती. पूर्वीही

दोन नवीन विमा योजना

# आयुर्विमा महामंडळ
# आपणासाठी दोन 'दुहेरी लाभ' योजना सादर करीत आहे.

## 'जीवन साथी'

नोकरी-व्यवसाय करणाऱ्या जोडप्यांसाठी ही एक उत्तम योजना आहे. विवाह बंधनातील



प्रेमाच्या व एकनिष्ठेच्या वचनाप्रमाणेच ही नवीन जीवनसाथी विमा योजना आपले वचन आजीवनच नव्हे तर मरणोत्तरही पाळते.

मुदत पूर्ण झाल्यावर विम्याची मूळ रक्कम अधिक बोनस इतकी रक्कम मिळते. परंतु दुर्दैवाने, दोघांपैकी एका जोडीदाराचा विमा-मुदत पूर्ण होण्याआधीच मृत्यू झाल्यास विम्याची मूळ रक्कम हयात जोडीदाराला दिली जाते आणि त्यानंतर मुदत पूर्ण होई तो त्याला/तिला पुढील हप्ते भरावे लागत नाहीत. मुदत पूर्ण होताच, हयात जोडीदाराला किंवा मुदतपूर्ती आधीच त्या दुसऱ्या जोडीदारालाही मृत्यू आल्यास त्याच्या/तिच्या नामनिर्देशित व्यक्तीला नफ्यासह मूळ विमा रक्कम पुनः एकदा दिली जाते.

## 'जीवन मित्र'

कुटुंबाला जास्तीत जास्त संरक्षण देण्यासाठी आखलेली ही आणखी एक खास योजना.



मुदत पूर्ण होताच, विमा उतरविलेली मूळ रक्कम, इतर एण्डौमेण्ट विमा योजने प्रमाणेच, बोनससह दिली जाते. थोडा अधिक हप्ता भरल्यास, अपघाती मृत्यू झाल्यास, अधिक संरक्षणही मिळू शकते.

**या 'दुहेरी लाभ' योजनांच्या अधिक माहितीसाठी तुमच्या आयुर्विमा एजंटाला किंवा नजीकच्या आयुर्विमा महामंडळाच्या कार्यालयाला भेट द्या.**

# लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

daCunha/LIC/168/85/MR



मध्यंतरातील गप्पाटप्पा. शोभा भागवत, स्मिता प्रयागी, वंदना भाले, वा. र. गोडे...

टिळक–आगरकर दोनच होते. आताही एखादे देवल उठतात आणि म्हैसाळमध्ये जाऊन दलित विकासाचं कार्य करतात. एखादे शरद जोशी गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून शेतकरी संघटनेचा झेंडा खांद्यावर घेतात. ही समाजातली हिरवळ पूर्वी आणि आत्ताही थोडीच होती. फक्त तेव्हाची अनुकूलता आता थोड्या प्रमाणात कमी झालेली आढळते, संपलेली मात्र नाही. तसं असतं तर माणूस, सोबत, साधना सारखी नियतकालिकं २५ वर्षं तरी कशी चालली असती? माजगावकर उत्तम संपादक आहेत म्हणून केवळ माणूस २५ वर्षं चालत नाही तर त्यांच्याशी सुसंवाद साधणारे काही लेखक–वाचकही त्यासाठी लागतात. अशा सर्वांच्या संयुक्त बळावर, त्यांच्यात असणाऱ्या समान धाग्यावर अशी नियतकालिकं चालतात.'

ध्येयवाद हा व्यवहारापासून वेगळा काढता येत नाही हा मुद्दा कुवळेकरांनी फार चांगल्या पद्धतीनं स्पष्ट केला. ते पुढे म्हणाले, 'जगण्यामागची व्यावहारिक गुंतागुंत वाढली आहे. माजगावकरांनी त्यांच्यापुरती ही व्यावहारिक जोड आजवर यशस्वीपणे केली. 'माणूस' सारखी नियतकालिकं त्या त्या व्यक्तीभोवती केंद्रित असतात त्यामुळे त्या व्यक्तीशिवाय संस्थात्मक असे कार्य सुरू राहणे अपेक्षित असेल तर ते शक्य वाटत नाही. त्यांना जर आता दुसरं क्षेत्र खुणावत असेल तर अजून २५ वर्षं तुम्ही माणूस सांभाळा, चालू ठेवा असं म्हणण्यात अर्थ नाही.'


कुवळेकरांनी स्पष्ट केलेला आणखी एक विचार म्हणजे 'ध्येयवादाचा क्रॉस आपण दुसऱ्याच्या खांद्यावर द्यायला नेहमीच तयार असतो पैसे जमवणं अवघड आहे असं मुळीच वाटत नाही. ते सहज जमतील. पैसे जमल्यानं 'माणूस' उभा राहात नाही–राहणार नाही. केवळ सदिच्छेच्या बळावरही नियतकालिकाचा सगळा भार पेलत नाही. त्यासाठी माजगावकरांकडेच जे आहे असंही काही लागतं. 'माणूस' सारखी मुक्त व्यासपीठं चालू असावीत ही इच्छा ठीक आहे, ती चालू राहणं ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे, हे म्हणणंही ठीक पण. प्रत्यक्षात ती एकट्या माजगावकरांचीच जबाबदारी राहणार आहे. दुसरे माजगावकर तयार करू हे ठीक. पण दुसरे माजगावकर घडवणं शक्य आहे का? मुळात ते थोडे असावे लागतात. जसं वि. स. माडीवाले म्हणायचे, आधी बेसन पाहिजे मग जिलबी करायची का भजी हा प्रश्न.

नंतर अनंत भावे बोलले. ते म्हणाले, सध्या जो सार्वत्रिक कंटाळा आहे त्याचं कारण म्हणूनच ही नियतकालिकं बंद पडत असावीत बदललेल्या वाचकवर्गाचा, त्याच्या भिन्न अभिरुचीचा परिणामही 'माणूस' सारख्या नियतकालिकावर होणं शक्य आहे.

सोबतकार बेहेरे म्हणाले, 'ज्याला सार्वजनिक कामाची, समुदायाची नशा असते ते नियतकालिक बंद करण्याचा निर्णय घेणार नाहीत. त्यामुळे माजगावकर थांबणार नाहीत असं मला वाटतं.'

परिसंवादाचा समारोप करताना भावे म्हणाले, 'नवी पिढी ध्येयवादात थोडी पुढेच असायला हवी, आर्थिक अडचण हा काही प्रश्न होऊ शकणार नाही आणि आपण नियतीवादी नसून प्रयत्नवादी आहोत, त्यामुळे माणूससारखी नियतकालिकं बंद पडता कामा नये आता तर माणूस हे केवळ एक नियतकालिक राहिले नसून ती एक चळवळ झालेली आहे.'

सुमारे दीड तास चाललेल्या परिसंवादात जरी प्रामुख्यानं 'माणूस' बद्दलचीच चर्चा झाली तरी यातले सर्वच मुद्दे गंभीर नियतकालिकाच्या अवस्थेशी अप्रत्यक्षपणे संबंधितच होते




डावीकडून : विनायकराव पाटील, दि. वि. गोखले, विनय हर्डीकर, आणि शरद जोशी –
–' उत्पादनखर्चाचा विषय येथेही सुटत नाही...'

परिसंवादानंतर थोड्या इतर गप्पाटप्पा झाल्या आणि नंतर सुरुवात झाली मुख्य कार्यक्रमाला, सत्कार समारंभाला. माणूस आणि माजगावकरांवरच्या प्रेमातून एकत्र आलेल्या मंडळींनी योजलेला हा सत्कार-समारंभ अतिशय सहज, खेळीमेळीच्या वाता-वरणात आणि विगच्या खुमखुशीत कॉमेंट्रीने अधिक रंगला. श्रीभाऊबरोबरच त्यांची आई, पत्नी, भाऊ–दिलीप माजगावकर, त्यांची पत्नी रेखा माजगावकर. 'वनस्थळी ' प्रति-ष्ठानच्या प्रमुख व पूर्वी माणूसमध्ये सह-संपादक असलेल्या सौ. निर्मला पुरंदरे आणि ' माणूस 'च्या मेधा राजहंस यांचाही सत्कार करण्यात आला सगळा सत्कार समारंभ एका अकृत्रिम जिव्हाळ्याने बांधला होता आणि फुलांच्या गुच्छांपेक्षा उपस्थितांच्या चेहऱ्या-वरचे भाव जास्त प्रसन्न, विलोभनीय होते.

या अनौपचारिक सत्कार समारंभानंतर श्रीभाऊंबद्दल, माणूसबद्दल बोलण्याची, आपले अनुभव सांगण्याची आणि कृतज्ञतेचा भाव व्यक्त करण्याची इच्छा जमलेल्यांपैकी बहुते-कांच्या मनात होती. पण घड्याळाचे काटे पण पुढे पुढे सरकत होते आणि श्रीभाऊंचं भाषण आणि जेवण असे दोन्ही कार्यक्रम अजून व्हायचेच होते. त्यामुळे स्टेजवर मोज-केच माणसं जाऊन बसली. त्यात विनय हर्डीकर, आ. विनायकराव पाटील, शरद जोशी, अनंतराव कुलकर्णी, श्री. ज. जोशी, ग्रामायनचे अनिल काळे, सतीश कामत होते. या कार्यक्रमाचं औचित्यपूर्ण संचालन दि. वि. गोखले (म टा) यांनी केलं. आरंभी सत्कार समितीच्या वतीनं श्री. ज. जोशी बोलले. माणूसबद्दलच्या आपल्या आठवणी सांगताना ते म्हणाले, ' मला आठवतंय माणूस सुरुवा-तीला अगदी साधनेपेक्षाही अनाकर्षक रूपात निघत होता. पण पुढे त्यानं अंग धरलं. ' माणूस 'चा आणि माझा लेखक म्हणून संबंध आला. त्यावेळी पुण्यात अनेक नियत-कालिकं, साप्ताहिकं होती. ही सगळी चुर-चुरीत, शहरी, रविवार गमतीत घालवणारी आणि फारसं प्रबोधन न करणारी. यात ' माणूस 'चं वैशिष्ट्य काय ? ' माणूस 'मध्ये जायला लागल्यावर जाणवलं की यांना काही-तरी वेगळं सांगायचंय, मांडायचंय आणि ते तसं छापताही. उदा.अन्न संचलन. ते म्हणाले आम्ही मोर्चे काढतो, तुम्हीही चला. मी औरंगाबादला गेलो पण मधूनच निसटलो. विहिरी खणण्याची एक योजना होती. तामिळनाडूत जाऊन आम्ही लेखमाला लिहिली. (कानिटकर आणि पुंडलिक यांच्या बरोबर). पारगावकर, मी नंतर अहमदा-बादलाही जुन्या कांग्रेसचं अधिवेशन पाहा-यला गेलो होतो. असे अनेक नवीन विषय माणूसनं आम्हाला वाचायला-लिहायला लावले दुसरी गोष्ट ' माणूस ' हे आजच्या मध्यमवर्गाचं प्रतिबिंब आहे. सगळ्यातलं चांगलं तेवढं घेऊन त्यांनी अकबराप्रमाणे दिनेइलाही पंथ स्थापन केला आहे.

संपादक म्हणून माजगावकरांचं वैशिष्ट्य सांगताना ते म्हणाले, ' माणूसमधला एखादा लेख आवडला असं त्यांना सांगतो तेव्हा ते नुसते उमलून येतात. एखाद्या अपत्याप्रमाणे त्यांचं आपल्या लेख–लेखकांवर प्रेम असतं. नवीन लेखक तयार करण्याची किमया त्यांच्याकडे आहे. त्यांच्याएवढे नवीन लेखक कोणी तयार केले नाहीत.'

नंतर प्रकाशक श्री. अनंतराव कुलकर्णी बोलले. माजगावकरांची आणि त्यांची ओळख ४५–४६ च्या सुमारास झाली असं सांगून



श्री. ग. मा., मुकुंद संगोराम, सतीश जकातदार, सतीश कामत, संजय संगवई – ‘वाऱ्यावरची वरात’

□

ते म्हणाले, ‘तेव्हाची पुण्याची आकर्षण म्हणजे शैक्षणिक वातावरण आणि पु. ग. सहस्रबुद्धे. माजगावकर पुण्यात आले यातच त्यांच्या पुढच्या कर्तृत्वाची चाहूल लागली असं मला वाटतं. माझ्या प्रकाशन व्यवसाया तूनच आमची ओळख झाली. माझा नियतीवादावर विश्वास आहे आणि माजगावकर माणूससाठीच जन्माला आले आणि आपलं कार्य त्यांनी उत्तम केलेलं आहे असं मी मानतो. विद्यार्थी दशेतच आपण लेखन, प्रकाशन करावं असा त्यांचा विचार होता. हिंदुत्ववाद, सावरकर, राष्ट्रवाद यावर आमची चर्चा व्हायची. त्यांच्या कार्याची चाहूल तेव्हाच लागली होती. पुढे संपादक म्हणून लेखक घडवण्याचं काम त्यांनी फार चांगल्या प्रकारे केलं. पुस्तकेही उत्तम प्रकाशित केली. अनेक लेखक त्यांनी पुढे आणले. त्यांनी निवडलेल्या ध्येयमार्गावरून चालण्यासाठी त्यांनी अनेक संकटाशी सामना केला. आता ‘माणूस’ पुढे याच पद्धतीनं चालेल का असा प्रश्न त्यांना पडण स्वाभाविक आहे. कारण हे काम सातत्यानं पुढे चालणं आवश्यक असलं तरी अवघड आहे. मी नियतीवाद मानतो. दुसरे माजगावकर तयार होणं ही सहजसाध्य गोष्ट नाही, कोणाच्याही भरीला न पडता शांतपणे त्यांनी निर्णय घ्यावा.’

श्रीभाऊंनी निवेदनात व्यक्त केलेली निसर्गक्रमाची, नियतीवादाची अपरिहार्यता अनंतरावांनी मान्य केली आणि वस्तुस्थितीचं भान आणून दिलं. श्रीभाऊंच्या व्यक्तिमत्त्वातल्या सामाजिक कार्यकर्त्याचं आणखी एक कार्यक्षेत्र म्हणजे ‘ग्रामायन.’ ग्रामीण विकासासाठी नियोजनबद्ध काम करण्यासाठी माजगावकर आणि त्यांच्यासारखे १०–१२ समविचारी यांनी दहा वर्षांपूर्वी ही संस्था स्थापन केली आणि आज संस्थेचं काम जोमदारपणे चाललं आहे. ग्रामायनचा कार्यकर्ता अनिल काळे बोलायला उठला. अनिलनं ‘ग्रामायन’च्या माजगावकरांबद्दल बोलणं अपेक्षित आणि उचितही होतं. अनिल म्हणाला, ग्रामायनमध्येही त्यांच्यामधली वैशिष्टयं ठळकपणे जाणवतात. ‘माणूस’ मधे जो मोकळेपणा आहे तोच त्यांनी ग्रामायन संस्था चालवताना राखलेला दिसतो. कारण भिन्न प्रकृतीची अनेक माणसं आज तिथे काम करत आहेत. तिथे काम करणाऱ्या तरुण वर्गाला त्यांच्याबद्दल अत्यंत आदर वाटतो. ‘माणूस’मधून ते जी मतं मांडतात, तीच ते प्रत्यक्षात आणताना दिसतात. माणूस आणि ग्रामायन यामध्ये एक सुसंगती आढळते त्यांनी स्वत: बरेच ठिकाणी हिंडून, ग्रामीण भागात प्रत्यक्ष जाऊन, तेथील काम, झीज सोसून, त्रास सहन करून प्रत्यक्ष पाहिलं आहे. त्यात भागही घेतला आहे. आणि मग ते त्यासंबंधी सांगतात. त्यामुळे ते काही तरी उपदेशात्मक सांगताहेत अशी भावना होत नाही तर तरुण वर्गाला उत्तम मार्गदर्शन होतं. ग्रामायनमध्ये जेव्हा काही संकटांना तोंड द्यावं लागतं तेव्हा ते कधी मागे रहात नाहीत. सामाजिक व्यवहार चालवत असताना जी काही आर्थिक सावधानता बाळगायला पाहिजे त्यात श्रीभाऊ कोषाध्यक्ष या नात्याने सतत जागरूक असतात. खर्च किती करायचा याची मुभा आम्हाला असली तरी ही सामाजिक संस्था आहे ही जाणीव ते सतत देतात. ज्यावेळी ग्रामायनचे काही कार्यकर्ते उत्साहाने नवीन कल्पना मांडतात तेव्हा त्या वास्तवाला धरून आहेत की नाही, लोकांचा सहभाग त्याला लाभेल की नाही हे ते सतत सांगत असतात. माणूसमधून प्रेरणा घेऊन ग्रामायनचं काम करणारे किती तरी कार्यकर्ते आहेत.’

श्रीभाऊ वयाच्या मानानी खूप तरुण

दिसतात आणि तरुण वाटतात. याबद्दल कोणी काही बोलल की ते हसून म्हणतात, त्याचं रहस्य दोन गोष्टीत आहे. मी खूप चालतो आणि तरुणाच्यात रहातो. त्याचं म्हणण फार खरं आहे. श्रीभाऊशी बोलताना पिढीचा फरक जाणवत नाही आणि यामुळे त्यांच्याभोवती तरुणाचं कोंडाळंच असतं. यात सतीश कामत,मुकुंद सगोराम, सतीश जकातदारसारखे तरुण पत्रकारही. सतीश कामत याविषयी बोलताना म्हणाला, 'श्रीभाऊभोवती तरुणाचं कोंडाळ असतं याच अनेक वयस्क मंडळींना कुतूहल वाटतं, काही प्रमाणात हेवाही वाटतो. आमच्या तरुण पिढीच्या आईबापांचा एक प्रमुख दोष म्हणजे ते सतत हे करा, ते करू नका अस सांगत असतात. त्यामुळे त्यांची जरी आमच्यावर माया असली तरी ती काही वेळा नकोशी होते. श्रीभाऊ याला अपवाद आहेत. ते गप्पा मारतात पण उपदेशाचे डोस पाजत नाहीत. आम्ही त्याच्याकडे त्यानी मार्गदर्शन करावं म्हणून जात नाही आणि त्याचाही तो आव नसतो. म्हणून आमच्या गप्पा–सवाद होऊ शकतो. आमच्या बरोबरीने ते तासन्तास हॉटेलमधे बसतात. त्याची मतं आम्हाला सागतात, पण लादत नाहीत श्रीभाऊंचं वाचन खूप आहे. त्याच्याबरोबर गप्पा मारताना जाणवतं की आम्ही जणू काही अभयारण्यात बद गाडीतून निर्धास्तपणे फिरतोय आणि ते आम्हाला गाधी, टिळक, लेनिन, मार्क्स दाखवताहेत. ही सगळी माणस त्याच्या अवती–भवती असल्यासारखं ते आम्हाला ती व्यक्तिमत्व दाखवतात. बॅ. जीना हे सुरुवातीला देशभक्त होते हे आम्हाला श्रीभाऊमुळे कळल. नाहीतर अनेक थोर लोकाबद्दल आमच्या पिढीचे गैरसमज कायम राहिले असते.'

सतीश पुढे म्हणाला, 'त्यांच्याबद्दल आकर्षण वाटतं कारण ते जे काही करतात त्याची किंमत मोजायला ते तयार असतात. साहित्य परिषदेचा हिरक महोत्सव होता. हल्ली माणूसचे कार्यालय जेथे आहे त्या मळेकर वाडयात म. सा. प. ची सुरुवात झालेली असल्यानं तिथेच केंद्रीय मंत्री वसतराव साठेंच्या अध्यक्षतेखाली एक कार्यक्रम आयोजित केला होता. श्रीभाऊ वसतरावांना फिरून सगळ दाखवत होते. कार्यक्रम संपल्यावर कुणीतरी सहज म्हणालं, आता जाहिराती वगैरे मिळायला हरकत नाही. त्यावर ते सहज म्हणाले, ज्या दिवशी मी अशी जाहिरात मागायला जाईन त्या दिवशी माणूसच्या कार्यालयाला कुलूप लावीन. श्रीभाऊचं हे वेगळपण आम्हाला आकर्षित करत.

'त्यांच्यात आणि आमच्यात दोन–तीन पिढ्यांचं अंतर आहे. परवा ते सहज म्हणाले आता वय झाल, पण आम्हाला काही ते पटत नाही इतके ते आमच्याबरोबर मिसळून असतात.' तेव्हा श्रीभाऊ अजून तरुण आहेत आणि तरुणच राहतील अस सतीश म्हणाला.

## वैचारिक दंगामस्ती

सतीश कामतनतर विनय हर्डीकर बोलले. 'सपादक आणि लेखक या नात्यानं आमची जास्तीत जास्त भाडणं झाली आहेत. माझं पुस्तक श्रीभाऊच्या घरातच लिहिल गेलं आहे माणूस हे आम्ही वैचारिक दगामस्ती करण्याच अरण्य समजतो. अनेक ठिकाणचे वृक्ष आणून त्यानी इथे काळजीपूर्वक जोपासले आहेत. गांधीचा वटवृक्ष तर विनोबाचा अश्वत्थ वृक्ष. हल्लीच्या शेतकरी सघटनेची काटेरी बाभळही एका कोपऱ्यात आहे. काही परदेशी बियाणं आहेत. कार्व्हरचा आम्रवृक्ष आहे– ग्रामायनाचा ताटवा आहे अशी एक ना एक अनेक बियाणं त्यानी काळजीपूर्वक आपुलकीने लावली आहेत. यातील तुम्हाला आवडेल त्याच्याखाली तुम्ही जाऊन बसा. श्रीभाऊचा कोणताच आग्रह नाही. या क्रीडागणात मध्यभागी माणूसचं फुलझाड आहे. हे आमचं हक्काचं क्रीडास्थान आहे असं आम्ही समजत होतो. आज जाणवतय यात काही तरी धोका आहे. धुळे जिल्ह्यातील अबर्रासगची चळवळ वाचकापर्यंत पोचवेपर्यंत श्रीभाऊ सपादक होते. नतर ते ग्रामायनाचे झाले आणि आता तिसरा टप्पा म्हणजे ते निवृत्ती मागताहेत. चिंतन, लिखाण करण्यासाठी हे मागण असेल तर हे मागणं,हा हक्क आम्हाला मान्य आहे. तेव्हा माजगावकराना ही सुटी देणं आणि तरुणानी वैचारिक प्रांतात आपली कामगिरी दाखवणं हाच मी माजगावकराचा सत्कार समजतो.'

नतर नाशिकहून आलेले श्रीभाऊंचे मित्र शशिकात टेंबे बोलले. ते म्हणाले, '१५–१६ वर्षापूर्वी त्यानी अन्न स्वतत्रता संचलन पदयात्रा काढली. तेव्हा ते नाशिकला आले होते तिथे जे काही १५–२० कार्यकर्ते एकत्र झाले होते त्यांनी श्रीभाऊंना पाहिलसुद्धा नव्हत माणूसमध्ये वाचूनच त्यात सहभागी होण्याचं ठरवल होतं. त्यात मी एक होतो. तेव्हापासून आम्ही बरोबर आहोत.

'श्रीभाऊंजवळ नुसती पत्रकारिता नाही, सामाजिक कार्याची आस्थाही आहे. त्यामुळे कोणत्याही कानाकोपऱ्यात काही सामाजिक चळवळ चालू असो, श्रीभाऊंना त्यात रस असे, ते त्यात असत. नाशिक जिल्ह्यात त्या काळात ज्या ज्या सामाजिक चळवळी झाल्या त्या सर्वांत श्रीभाऊ आमच्याबरोबर होते. श्रीभाऊ आता आमच्याजवळ विश्रांती वगैरे मागत नाहीत, ती त्यांना नकोयसुद्धा–तर त्यांना अस वाटत असाव की, माझी इनिंग मी खेळलोय, आता इतर कुणाला खेळी खेळायची असेल तर त्याना क्रीडागण रिकामं आहे.'

नतर श्रीभाऊचे जुने मित्र प्रा. स. ह. देशपांडे बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'श्रीभाऊच्या कार्याचा नव्याने काही पाढा वाचण्याची गरज नसली तरी ते एक उत्तम पत्रकार आहेत हे मी सागतो. आज ज्याला Investigative journalism म्हटले जाते ती शोधक पत्रकारिता मराठीत माणूसनेच प्रथम आणली. हे माणूसचं पत्रकारितेतील मोठं contribution आहे. ते हिंदुत्ववादी आहेत; पण त्याचा हिंदुत्ववाद उदार आहे, समतेचा आग्रह धरणारा आहे. अधिक अतर्मुख आहे त्यात आक्रमकता असेल पण अतर्मुखता जास्त महत्त्वाची आहे. ते कृतिशीलही आहेत. त्याच्या विचारविश्वाबद्दल मला नेहमीच कुतूहल वाटत. कारण हिंदुत्ववाद, गाधी–विनोबा याचा मेळ ते कसा घालतात याचा मला नेहमी प्रश्न पडतो. ते उत्तम लेखकही आहेत.' 'श्रीग्रामायन' सारख सुदर गद्य लिखाण पुन्हा त्याच्या हातून व्हावं अशी सदिच्छा शेवटी त्यांनी व्यक्त केली.

तद्नतर आले शेतकरी संघटनेचे शरद जोशी. संत लोंगोवाल याच्या हत्येमुळे त्याचा पंजाब दौरा रद्द झाला. 'योद्धा शेतकरी'ची बाभळ श्रीभाऊंनी ऐन दिवाळीत

पृष्ठ २९ वर

# H. B. J.

# एक महत्त्वाकांक्षी नलिका प्रकल्प

विनायक गोखले

हजिरा–विजयपूर–जगदीशपूर वायूनलिका मार्ग म्हणजेच ‘H–B–J पाइप लाइन.’ भारताच्या विकासाच्या आराखड्यातील एक महत्त्वाचा प्रकल्प. संबंधित उद्योगात असलेला जगातील सर्वात मोठा प्रकल्प. ‘बॉंबे हाय’मध्ये निर्माण होत असलेला ‘नैसर्गिक वायू’ भारताच्या ‘आतवरच्या’ प्रदेशा–प्रदेशात नेणारा नलिका प्रकल्प. या प्रकल्पासबंधात भारत सरकारने आपले धोरण बदलले आहे. या बदलत्या धोरणामुळे या प्रकल्पाच्या ‘कत्राटा’करता जगातील सर्व उद्योगाना खुली स्पर्धा ठेवली आहे. या व्यवसायातील बडी बडी मडळी या स्पर्धेत उतरण्यास उत्सुक आहेत. ‘टेंडर’ भरायची शेवटची तारीख २७ ऑगस्ट ठरवण्यात आली होती. ती तर आता उलटून गेली आहे. सरकार कत्राट देण्यासबधीचा निर्णय लवकर घेऊ इच्छिते. कारण वर्षाअखेर या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे. आधीच उशीर झाला आहे व यापुढचा उशीर टाळण्याची सरकारची धडपड चालू आहे.

१७३० कि. मी लाबीचा हा नलिकामार्ग भारताच्या विकासाच्या दृष्टीने एक मोठा टप्पा ठरणार आहे. तो पूर्ण झाल्यावर त्यावर अवलंबून असलेल्या योजनासुद्धा प्रचंड आहेत. पाच दशलक्ष टन ‘युरिया’ उत्पादन, पंधराशे मेगॅवॅट वीज निर्मिती आणि घरगुती कारणाकरिता लागणारे अनेक ‘लक्ष’ गॅस सिलेंडरर्स याशिवाय या नलिकाद्वारे येणारा वायू ‘उर्जा’ म्हणून वापरला जाणार आहे सहा खत प्रकल्पासाठी, गुजरात व कर्नाला येथील रिफायनरीसाठी व बडोदा येथील IPCL च्या नवीन प्रकल्पात हा वायू उर्जा म्हणून वापरला जाणार आहे. याशिवाय सध्या चालू स्थितीत असलेल्या खत प्रकल्पानासुद्धा याचा उपयोग होईल. हा एवढा मोठा प्रकल्प आखताना गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशात महत्त्वपूर्ण बदल करण्याचे उद्दिष्ट आहे.


तर असा हा नलिकामार्ग, जो अनेकाच्या विकासाच्या दृष्टीने आशास्थान आहे, ज्या योजनेत मोठ्या प्रमाणावर गुतवणूक केली जाणार आहे आजवरची या प्रकल्पासबधीची प्रगती पाहता, अनेकाच्या मनात प्रकल्प फलदायी होण्यासंबधी शकेची पाल चुकचुकणे स्वाभाविक आहे. कारण हा प्रकल्प काही साधासुधा नसून, रोज अठरा दशलक्ष घन मीटर वायू वाहून नेणारा नलिकामार्ग आहे आणि या प्रकल्पाचे यापुढील कामसुद्धा जर ‘सरकारी’ पद्धतीने चालू राहिले, जे इतके दिवस चालू होते, तर या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा ‘बट्ट्याबोळ’ वाजण्यास वेळ लागणार नाही आणि बहुधा ही भीती ओळखून नवीन सरकारने या प्रकल्पाचे कत्राट देण्याचा निर्णय घेतला व खुली स्पर्धा ठेवली.

हा नलिकामार्ग व त्यासबधित प्रकल्पात होत असलेली आणि यापुढे अपेक्षित असलेली गुतवणूक फार मोठी आहे. या नलिकामार्गाचा खर्च आहे अदाजे सतराशे कोटी रुपयाच्या घरात ( ८३ सालची किंमत ). या नलिकामार्गावर जे प्रकल्प उभे राहणार आहेत, त्यात दररोज १३५० टन नैसर्गिक वायूवर आधारित खत निर्मिती करणारे सहा प्रकल्प. याच्यात केली जाणारी गुंतवणूक आहे ४२०० कोटी रुपयाची याशिवाय तीन नैसर्गिक वायूवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प – याची प्रत्येकी क्षमता ५०० मेगॅवॅट वीज निर्मितीची असेल. या प्रकल्पात होणारी गुंतवणूक १००० कोटी रुपयाच्या वर असेल आणि सरते शेवटी ऑथॅरिटीज ऑफ इंडीया’ हे अडीचशे कोटी रुपये खर्चून स्वयंपाकाकरता लागणारा वायू निर्माण करणारे दोन प्रकल्प उभारण्याचे योजिले आहे. नलिकामार्ग आणि इतर तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्प यामध्ये होणारी गुतवणूक, योजनेस लागणारा अवधी लक्षात घेता ५००० कोटी रुपयाचा टप्पा ओलाडून जाईल असा अदाज केला जात आहे.

## वेळेचें बंधन

सध्या सर्व मोठे उद्योग या प्रकल्पावर डोळा ठेवून आहेत. आतरराष्ट्रीय ख्याती असलेले, या व्यवसायातील लोक सध्या दिल्लीत ठाण माडून आहेत. गॅस ॲथॉरिटी ऑफ इडिया लिमिटेड ( GAIL) म्हणजे या नलिका मार्गाचे मालक, आणि त्याना याबाबतीत सल्ला देणारे इजिनिअर्स–इंडिया लिमिटेड (EIL) याच्यावर ‘H-B-J’ चे कत्राटदार ठरवण्याची जबाबदारी आहे. २१ जून रोजी सरकारने टेंडर सबंधीची कागदपत्रे देऊ करण्यास सुरुवात केली. २७ ऑगस्ट ही शेवटची तारीख ठरलेली असतानासुद्धा, ‘मुदत वाढवली जाणार’ अशा तऱ्हेची हवा निर्माण करण्यात आली होती. एका बहुराष्ट्रीय उद्योग समूहाने तशी विनती केली होती. परतु सरकारला ‘वेळेचे बधन’ ही सर्वात महत्त्वाची ‘बाब’ वाटत असल्याने ही विनंती फेटाळून लावण्यात आली.

या संदर्भात कंत्राट देताना आर्थिक मुद्द्यावर भर जास्त दिला जाईल असे दिसते नैसर्गिक वायू आणि तेल या संदर्भात ‘बांधकाम’ करणाऱ्या उद्योगात सध्या काहीशी मदी आहे त्यामुळे ‘H-B-J’चे काम मिळवण्याकरता बहुराष्ट्रीय उद्योग जोरदार प्रयत्न करतील. या प्रयत्नात ‘आर्थिक’ बाबतीत जास्त आकर्षक सवलती ते देऊ शकतील सर्व पुढारलेल्या राष्ट्राना त्याच्या तेल उद्योगाशी सबधित उद्योग ‘जगवायचे’ असल्याने, या कत्राटाबरोबर येणारा खर्च, कर्ज म्हणून त्यानी देऊ करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. भारत सरकारने या बाबतीत खुली स्पर्धा ठेवताना, अशा तऱ्हेची द्विस्तरीय योजना एखाद्या उद्योगाकडून ठेवली जाईल अशी अपेक्षा नक्कीच ठेवली असणार.




सध्या असे चार बहुराष्ट्रीय उद्योग हे कत्राट मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत त्याच्यात खरी स्पर्धा आहे. यातला एक स्पर्धक आहे 'स्नॅम्प्रोगेट्टी' (Snamprogetti), इटालीतील ENI ह्या एका अवाढव्य 'पब्लिक सेक्टर' मधील उद्योगाचा घटक सी. इतोह व जे. जी. सी या जपानी उद्योगानी तर 'डॉडसल' या भारतीय उद्योगाला सहकारी म्हणून बरोबर घेतले आहे. Spie Capag of France हा फ्रेंच उद्योग समूह, तोयो इजिनियरिंग व N. K K. या जपानी उद्योगाच्या सहकार्याने कत्राट घेण्यास उत्सुक आहेत. मॅजेस्टिक कॉन्ट्रॅक्टर या उद्योगाने, आलास्का येथे नुकत्याच्या उभारलेल्या नलिकामार्गाचे कत्राटदार 'नोव्हा कार्पो. कॅनडा' याच्या साहाय्याने मैदानात उडी घेतली आहे ते भारतातील 'बिर्ला इजिनियरिंग' याच्या मदतीने काम करतील. आणि चौथा स्पर्धक म्हणजे मेक्सिकोतील 'कोडक' हा उद्योग समूह तो दक्षिण कोरियातील 'ब्राऊन अँड रूट' व 'ह्युदाई' या उद्योगाच्या साहाय्याने प्रयत्न करत आहे. त्याचा भारतीय साथीदार असेल 'इस्सार!' वर उल्लेखिल्याप्रमाणे 'एका उद्योग समूहाकरता मुदत वाढ दिली जाईल अशी हवा होती. तो Khoday उद्योग, 'मॅकलपाइन' ह्या ब्रिटिश तर Preussag ह्या पश्चिम जर्मनीतील साथीदारांच्या साहाय्याने हे कंत्राट मिळवू पाहात आहे. शेवटच्या कालात जर ते कागदपत्रे सादर करण्यात यशस्वी झाले असतील तर ते यातील 'खऱ्या' स्पर्धकातील पाचवे स्पर्धक ठरतील. रशियन मडळीसबधी सर्वांच्यात उत्सुकता होती. ते या स्पर्धेतील 'डार्क हॉर्स' म्हणून सबोधिले जात होते. कारण रशियाला या कंत्राटासदर्भात रुपयात' रक्कम मोजली तरी चालेल व कत्राट मिळवण्याच्या दृष्टीने ही मोठी फायदेशीर बाब मानली जात होती त्याच बरोबर रशियाशी असलेली मैत्री, त्यांच्याशी नैसर्गिक वायू व तेल या संदर्भात खोदाई करण्याचे झालेले करार आणि ट्रान्स सैनेरिया नलिका मार्ग टाकल्यामुळे पाठीशी असलेला अनुभव यामुळे रशिया या स्पर्धेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असे वाटत होते. परतु या कत्राटाबाबतीत पारडे जड असूनही रशियाने विशेष आस्था दाखवली नाही.

नलिका मार्ग टाकण्यास परदेशी कत्राटदार व तत्रज्ञांना पाचारण करावे लागणार आहे भारतीय तत्रज्ञ हे काम करू शकणार नाहीत का ? भारतीय कत्राटदारांना एवढे आर्थिक ओझे घ्यायचे सकट वाटत आहे, किंबहुना हे कत्राट त्याच्या कुवतीबाहेरचे आहे असे सरकारला वाटते, त्यात कितपत तथ्य आहे ?

## प्रचंड आव्हान

हा नलिका मार्ग हा 'नळ कारागिरीतील सर्वोच्च दर्जाचा असला पाहिजे कारण यातून सहज पेटणारा वायु, एक-दोन नव्हे तर १७०० कि. मी. वाहून नेला जाणार आहे. या नल मार्गाच्या प्रत्येक चौरस सेंटीमीटरवर ८५ किलो वायूचा दाब असेल कमीतकमी १४ दशलक्ष घनमीटर वायू वाहण्यास यातून जी सुरवात होईल ती वाढत वाढत प्रतिदिनी ३० दशलक्ष क्युबिक मीटर इतकी काही कालावधीत पोहोचेल. या नलमार्गाला पडणारे एखादे छिद्र फार मोठा विध्वस घडवू शकेल. या नलिका मार्गाच्या प्रत्येक भागात एखाद्या बाँबची ताकद समावलेली आहे असे म्हणणे अतिशयोक्तिचे ठरणार नाही.

हा नलिका मार्ग संपूर्णपणे जमिनीखालून नेला जाणार आहे. सहा फूट रुद व सहा फुट खोल खदकातून हा नलिकामार्ग १७०० कि. मी. जाणार आहे ३६ इंच व्यास असलेले नळाचे घुड उभे करताना फार मोठी दक्षता घ्यावी लागेल आणि हा उद्योग म्हणून फायदेशीर ठरण्यास सर्वोच्च दर्जाचे व्यवस्थापन, नियोजन, देखरेख व तंत्रज्ञान आवश्यक आहे नियोजनाचा मुद्दा आपण प्रथम बघू हा नलिका मार्ग काही सलग मैदानावर नाही, हा 'क्रॉस–कन्ट्री' मार्ग आहे. सर्व साधारण मार्ग जरी ठरला असला तरी त्यातल्या बारकाव्याची जबाबदारी कत्राटदारावर आहे. बारकाव्यासकट मार्गाची आखणी कागदावर तयार झाली तरी महत्त्वाचा भाग शिल्लक राहतो. सरकारकडून परवानगी मिळण्याआधी, या मार्गासबंधी शेकडयांनी 'आक्षेप नसल्याची' पत्रके घ्यावी लागतील. रेल्वे, रस्ते, पाटबंधारे, सर्वेक्षण ही सरकारी खाती व श्रीमंत जमीनदारांपासून ते एखादा छोटा शेतकरी याच्या 'अंगावरून' जाणारा हा मार्ग किती हेलकावे खाऊ शकेल हे न लिहिणे बरे. H-B-J नलिका मार्ग हा सर्व सर्वसाधारणपणे बडोदा, उज्जेन, गुना, विजयपूर, झाशी, शहाजहानपूर, नाबाला, कानपूर आणि रायबरेली असा जाईल हा मार्ग विंध्य पर्वतातून जाणार आहे. तेथील खडकाळ प्रदेशावर मात करणे जिकिरीचे समजले जात आहे तर मधे येणाऱ्या नद्या ह्या एखाद्या 'वेळ काढू' सिग्नलप्रमाणे त्रास देणाऱ्या ठरतील हा मार्ग नर्मदा, यमुना, गंगा, रामगंगा, चंबल, या सारख्या नद्या पार करून जायचा आहे.

यामुळे या नलिकामार्गाचे माप ज्या कत्राटदाराच्या पदरात पडेल ते त्याला विशेष सुख देईलच अशातला भाग नाही. मनुष्यहीन भागात माणसापासून ते अन्न, पाणी, वस्त्र, निवारा यांची व्यवस्था करावी लागेल आणि ओसाड भागातून हा मार्ग बहुताशी जात असल्याने हा मुद्दा गौण धरला जाणार नाही आणि याच बरोबर विविध प्रकारची यंत्रसामुग्री, तिची सख्या दोनशेच्या घरात असेल, तिची वाहतूक ही एक आपल्या येथील वाहतुकीची व्यवस्था बघता, समस्या होऊ शकेल.

हा नलिका मार्ग तीन वर्षात उभारला जावा अशी सरकारची धारणा आहे. वर्षात कामाचे दिवस तीनशे धरले तरी रोज २ कि. मी. चे नळ टाकावे लागतील. हे नळ परदेशातून आयात केले गेल्यावर, कांडला बंदरातून कोटिंग करण्याकरता इतरत्र नेले जातील व तेथून खणलेल्या खंदकात. प्रत्येक नळ हा १२ मीटर लांब असेल. त्याचे वजन १० टनापेक्षा जास्त असू शकेल. यामुळे नुसत्या नियोजनाचीच नव्हे तर दर्जेदार व्यवस्थापनाची आवश्यकता हे काम झटपट करण्याकरता असेल.

दर्जेदार व्यवस्थापनाबरोबर उच्च दर्जाचे तंत्रज्ञानही लागेल 'नळ कारागिरी' पासून 'दूर संचार' यासारखे अनेक घटक यात असतील. अशा परिस्थितीत भारतीय तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन ही योजना यशस्वी होण्यास पुरेसे आहेत का ? त्याची यापूर्वीची कामगिरी विशेष कौतुकास्पद आढळत नाही.

बॉम्बे हायपासून सुरुवात झालेला नलिका मार्ग समुद्रातून जमिनीवर येतो तो 'उम्रत' पाशी. हा २१७ कि. मी. लांबीचा मार्ग टाकताना विशेष अडचणी आल्या नाहीत. परंतु उम्रत ते हजिरा या छोटया अतराच्या मार्गात अनेक अडचणी उभ्या राहिल्या. 'मदोला' या नदीच्या पात्रातून हा मार्ग नेताना ह्या अडचणी उद्भवल्या. उभारणीच्या कामापासून ते पुढे नदीच्या प्रवाहामुळे नळ वाकणे इत्यादी अनेक अडचणी उभ्या राहिल्या आणि या संदर्भात गंगा, यमुना यासारख्या नद्यांचा विचार करता, अजून गभीर अडचणीची शक्यता दिसते. नलिकामार्ग टाकण्यासंबंधी येत असणाऱ्या या अडचणीशिवाय अनेक बाबतीत गलथानपणा व 'उशीर' याचा प्रत्यय येत आहे. ONGC ने बॉम्बे हाय ते हजिरा हा २४५ कि. मी. लांबीचा नलिका मार्ग डिसें ८४ पर्यंत उभारायचा ठरवला होता, परंतु अजूनही नळ टाकण्याचे काम पूर्ण झालेले नाही. 'उम्रत' पर्यंत आलेल्या मार्गाचा खर्च १२० कोटी रुपये आला होता, तर समुद्रापासून मदाला नदी ओलांडणारा ४ कि मी च्या मार्गावर खर्च झालाय सव्वातीनशे कोटी रुपये

अशा प्रकारच्या दिरंगाईमुळे या नलिका मार्गाच्या उभारणीत रोजचा तोटा एक कोटीच्या घरात आहे. आणि हा मार्ग अजून अपूर्ण असल्याने खत प्रकल्पात केलेली ९६० कोटींची गुंतवणूक धूळ खात पडलेली आहे. त्याच्यावरचे वाया जात असलेले व्याज वेगळेच !

H B.J. नलिका मार्गाचे कत्राट कोणाला मिळेल ? H.B J. नलिका मार्ग केव्हा पूर्ण होईल ? H B.J. नलिका मार्ग पूर्ण होईल तेव्हा खर्चाची रक्कम कोणत्या पातळीवर असेल ? इंग्लडमध्ये जो नलिका मार्ग टाकण्यात आला त्याचा खर्च गेला होता २४००० कोटी रुपयाच्या घरात. तो जरी ३००० कि. मी. लांबीचा मार्ग असला तरी त्या सदर्भात H B J. नलिका मार्गाला प्रत्यक्षात येणारा खर्च हा नियोजकाच्या कल्पनेपेक्षा कितीतरी जास्त असू शकेल. हा नलिकामार्ग किमान २० वर्षे चागले काम करत राहिला पाहिजे अशी सरकारची अपेक्षा आहे कारण बॉबे हाय मधील गॅस २० वर्षे पुरेल असा अदाज आहे. अर्थात काही तज्ज्ञांच्या मते हा काळ फक्त १० वर्षांचा असेल. त्यामुळे 'काळाचे बधन' असलेला हा प्रकल्प वेळेत पुरा होणं हे फार आवश्यक आहे इतके दिवस 'सरकारी' पद्धतीने कामे झाली व त्यात विनाकारण वेळ व पैसा खर्च झाला आहे त्यातून वेळीच धडा घेतलेला बरा !

अशावेळी मनात येतं की, इतका गुंतागुतीचा व किचकट प्रकल्प हाती घेताना 'प्रथमच विचार करायला हवा होता' हे म्हणण्याची वेळ येऊ नये.

□

मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# नोकरशाही : आधार की अडथळा ?

विश्राम राजहंस

आर्य चाणक्याच्या काळापासून ते राजीव गांधीपर्यंत अनेकानी सरकारी सेवकाविषयी बर-वाईट मत करून घेतलेल आहे. सरकारी नोकर म्हणजे 'झारीतील शुक्राचार्य' आहेत, अस सामान्य माणसाच मत आहे; पण एखाद्या सरकारी नोकराला विचारलं तर तो म्हणेल, की 'आम्ही आहोत म्हणून आपण इथपर्यंत तरी आलो, नाहीतर या राजकारणी लोकानी भारत केव्हाच विकून टाकला असता.'

या दोन्ही एकाच सत्याच्या दोन बाजू आहेत. भारताला लिखित घटना आहे. त्यामुळे देशाच्या राजकीय व सामाजिक रचनेमध्ये या घटनेचा भरभक्कम आधार सतत उपयोगाला येतो. या घटनेत उल्लेख केलेली समता, बंधुत्व व स्वातंत्र्य ही तत्त्वे तशी भारतीयाच्या अंतरात्म्यातून उमलून आलेली नाहीत. त्याचा परिणाम म्हणून की काय, प्रत्येक पातळीवर लिखित नियम, अधिनियम उपनियम याचा उपयोग करावा लागतो. प्रत्येक बारीक सारीक गोष्टीसाठीसुद्धा नियम करावा लागतो.

भारतातील सर्व नोकरशाही ही या सर्व नियम उपनियमाच्या भक्कम दोरखडानी जखडून ठेवलेली आहे. पुन्हा हे सर्व नियम कायदेशीर भाषेत लाबलचक वाक्यात व अवजड इग्रजी भाषेत लिहून ठेवलेले आहेत. एखादा मनुष्य सरकारी नोकरीत शिरला की, त्याला त्याच्या विभागाचे, खात्याचे, सर्वसाधारण सरकारी नोकरांचे असे अनेक नियम तोडपाठ करावे लागतात. हे नियम असे असतात की, एखाद्या नोकराला चटकन निर्णय घेता येऊ नये. विशेषत: जर पैसे खर्च करण्याची गोष्ट असेल तर त्यावर इतके नियमांचे बंधन आहे की, केवळ एखाद्या अधिकाऱ्याच्या हातात एक पैसादेखील खर्च करण्याचे अधिकार नाहीत. प्रत्येक पातळीवर दुसऱ्या सरकारी वरिष्ठ किंवा कनिष्ठ अधिकाऱ्याची सही असल्याशिवाय काम होत नाही. यामुळे कागदपत्रांचा व्याप प्रचंड वाढतो.

अशा प्रकारच्या नियत्रणांवर नियंत्रणे ठेवणाऱ्या नियमाच्या जजाळाच खरं कारण हे आहे की, सरकारी नोकरावरचा शासनाचा असलेला अविश्वास ! एखाद्या सरकारी सेवकास अनिर्बंध अधिकार दिले तर तो त्याचा वापर स्वार्थाकरता करून भ्रष्टाचार करेल, या भीतीने ही सर्व नियत्रण आली आहेत; पण त्यामुळे सरकारी खात्यांच काम थंडावलं आहे. त्याच काय ? 'हजारो दोषी सुटले तरी चालतील; पण एकाही निर्दोषी माणसाला सजा होता कामा नये.' या आपल्या घटनेतल्या महान (?) तत्त्वाप्रमाणेच 'काम थंडावून हजारो लोकांच नुकसान झालं तरी चालेल पण काम भरभर करून एखाद्याच माणसाचा फायदा झाला नाही पाहिजे.' हे तत्व सरकारी नियमाचं आहे.

धोरण आखण्याचं काम निवडून आलेल्या मत्रिमंडळाचं आहे, तर त्या धोरणाची अमलबजावणी करण्याच काम सरकारी नोकराच आहे विधानसभेत किंवा पत्रकारपरिषदेत मत्री एखाद्या धोरणाची घोषणा करतात. ती चार-पाच ओळीत असते; पण त्याचा अधिनियम होऊन तो राजपत्रात प्रसिद्ध होतो तो मात्र १०-१५ पानं असतो व ...ज्या अर्थी...या शब्दाने सुरुवात होणारे १०-१२ लांबलचक परिच्छेद असतात. त्या त्या खात्याचे सचीव ही धोरण या सरकारी नियमांच्या आराखड्यात बसवतात आणि मग साधे सोपे नियम गुतागुतीचे बनतात. सामान्य माणसाला तर ते नियम समजतच नाहीत त्यामुळे तो सरकारी सेवक जे सागेल ते त्याला ऐकून घ्यावं लागत !

आता एवढे निर्बंध ठेवणारे लिखित नियम असूनही भ्रष्टाचाराची बजबजपुरी झाली आहे. म्हणजे हे नियम नसते तर काय झालं असतं, असा प्रश्न कोणाच्याही मनात येईल. सरकारी खात्यातला भ्रष्टाचार आपल्याला वाटतो, तितका सोपा नाही. एकट्या—दुकट्या माणसाला तर तो फारच अवघड आहे. लाचलुचपत खात्याच भय आहे. सरकारी नोकरी आरामशीर असते, हातात खूप अधिकार असतात. असं बाहेरच्या माणसाला वाटलं तरी प्रत्यक्षात काम म्हणजे सत्राशेसाठ कागद फिरवणं, फॉर्म भरण हेच असतं ! त्याचाच त्रास जास्त असतो. ज्या खात्यात लोकाचा जास्त सबंध येतो, तिथे एकतर दादागिरी करून अधिकार गाजवता येतो किंवा पैसे खाता येतात. इतर ठिकाणी या लोकाचा हेवा करणं आणि जमेल तस काम करणं एवढच त्याच्या हातात असतं !

## पात्रतेची खूण

सरकारी खात्यात भ्रष्टाचार होण्याची दोन प्रमुख कारणं आहेत. एक म्हणजे हल्लीचा भ्रष्टाचार 'सगळे मिळून खाऊ' या प्रकरणातला असतो, तर दुसरं म्हणजे या भ्रष्टाचाराला राजकीय संरक्षण असते, ड्रायव्हर, शिपाई यापासून ते सचिवापर्यंत हे सगळे एकाच माळेचे मणी असतात. यातला एकजण किंवा दोघेजण मिळून पैसे स्वीकारण्याच काम करतात; पण सर्वांना त्याचा त्याचा वाटा पोचवला जातो. या लाडग्याच्या टोळीत एखादं कोकरू आलं तर त्याची फार पंचाईत होते. या प्रकरणाचे धागेदोरे पार वरपर्यंत पोचले असल्याचं कळल्यावर तो फार घाबरून जातो. सामील व्हावं तर आपलच मन आपल्याला खातं, न सामील व्हावं तर आपला छळ होईल. एखाद्या दरोडेखोराच्या टोळीत जाण्यासाठी पात्रता म्हणून दोन-चार दरोडे व खून करावे लागतात, तसं या टोळीत सामील होताना दोन-चार घबाडं मिळवावी लागतात अशी घबाडं वरिष्ठांना

सादर केली की वरिष्ठ खुष ! मग सरकारी नोकरीतला ऐषआराम सुरू होतो. सरकारी नोकराला घटनेने जे संरक्षण दिल आहे, त्यामुळे त्याच्याविरूद्ध सामान्य माणसाला काहीही करता येत नाही. जे वरिष्ठ यांच्या टोळीत सामील आहेत, त्याच्याकडे तक्रार करून काय उपयोग ? न्यायालयात जाण्यासाठी पुन्हा सरकारची परवानगी लागते. ती देणे या वरिष्ठाच्याच हातात !

पण या वरिष्ठानेच खात्यातला भ्रष्टाचार निपटून काढायच ठरवल तर त्याला ते शक्य आहे. त्याला तसे अधिकार आहेत. लाचलुचपत खात किंवा इतर खाते याची मदत तो घेऊ शकतो. अशा या प्रामाणिक वरिष्ठाची व त्याच्या उत्तम कारभाराची अनेक उदाहरणे आहेत. पण या वरिष्ठाच्यावर सचीव असतात आणि सचिवाच्यावर राजकीय पुढारी असतात. राजकीय पुढारी भ्रष्ट असले तर ( हा काय प्रश्न झाला ? ) ते सचिवाना भ्रष्टाचार करायला किंवा त्याना साथ द्यायला भाग पाडण्यासाठी सर्व अधिकार व युक्त्या वापरतात. सगळ्यात सोपी युक्ती म्हणजे त्याची बदली दूर कुठेतरी करण्याची धमकी देणं त्याला तो बधला नाही तर त्याची बदली करून त्या जागी एखादा थोडासा कनिष्ठ अधिकारी बढती देऊन तिथं आणायचा लायकी नसताना बढती मिळाल्याने तो मंत्र्याचे उपकार मानतो व अखेर त्याच्या ताटाखालचं माजर बनतो. या सचिवाच काम नेहमीच्या कामाव्यतिरिक्त एवढच म्हणजे मंत्र्यानी सागितलेली प्रकरण नियमात बसवायची. नियमाबाहेर काम करायच तर मंत्र्याना अधिकार आहेत. पण शक्यतो मत्री या असल्या प्रकरणात लेखी आदेश देऊन आपलं नाव गुतवू इच्छित नाहीत. 'गिऱ्हाईका'ला मात्र 'मी काम करून देतो' अस सागून मोल वसूल करायच, व सचिवाकडून ते नियमात बसवून टाकायचं. म्हणजे आपणही मोकळे !

अनेक निर्णय मत्रिमंडळातर्फे एकत्रच घ्यायचे असतात. पण जिथे सर्व मत्रिमडळच भ्रष्ट असते ( याची उदाहरण द्यायला जागा पुरणार नाही) तिथं हा प्रश्न चटकन सुटतो. त्या त्या खात्याच्या 'मागण्याना' मजुरी गृहीत धरायची. प्रत्येकान आपल आपलं खात्याच दुकान स्वतत्र चालवायच. नफा-तोटा प्रत्येकाचा ज्याचा त्याचा, असा समजूतदारपणा असला की प्रश्न मिटतो तेव्हा एखादाच मत्री भ्रष्ट आहे, अस समजणं जसा भाबडेपणा आहे, तसंच मुख्यमत्री फक्त भ्रष्ट आहे, तेव्हा त्याला बदललं की सगळ सुरळीत होईल असं म्हणणही बरोबर नाही. मात्र भ्रष्टाचारी शासन सुधारण्याचा मार्ग वरून खाली असतो हे निश्चित.

आपल्याकडे इतका भ्रष्टाचार प्रचड आहे, व इतके खालच्या दर्जाचे राजकीय पुढारी आहेत, तरी आपला देश अजून कसा काय अस्तित्वात आहे असा प्रश्न पडतो. त्याचेही उत्तर पुन्हा ही भक्कम नोकरशाहीच आहे, असं म्हटलं तर विरोधाभास होईल. पण तस आहे खर ! दिल्लीतल्या पतप्रधानाच्या कार्यालयापासून ते खेड्यातल्या तलाठ्यापर्यंत सगळीकडे सरकारी सेवक आहे एकमेकात गुतलेली ही एक भरभक्कम साखळी आहे. या साखळीत लक्षावधी माणसं आहेत. ही सगळी माणस सामान्य, पोटभरू आहेत. यातले फार थोडे महत्त्वाकांक्षी आहेत. बहुसख्य पोटाची सोय म्हणून नोकरीत येतात. त्यामुळेच आपली नोकरी टिकवून धरणे हे त्याचं जिवितकार्य आहे. लाचलुचपत प्रतिबधक खात्याचा धसका त्याना असतो पापभिरू असल्याने लाच खाण्यात त्यांचं मनही त्याना खात! यामुळे ही मडळी लाच तर खात नाहीतच, पण अंगात शौर्य किंवा हिकमत नसल्याने फार मोठ काम आपल्या जबाबदारीवर घेतसुद्धा नाहीत. बारीक सारीक गोष्टीतसुद्धा याच खापर आपल्या अंगावर तर फोडलं जाणार नाही, या भीतीने जिथे स्वतःच्या न्यायबुद्धीने निर्णय घ्यायचा असतो तिथे सुद्धा ते कचरतात व सर्व गोष्टी नियम पुस्तकात सागितल्याप्रमाणे तपशीलवारपणे करतात.

याना घाबरवून सोडणं सोप वाटलं तरी तस कठीण असतं. कारण सर्व गोष्टी नियमानुसार करत असल्याने याना खात्याच्या चौकशीचं भय दाखवता येत नाही. बदली केली तर मुकाटपणे चबुगबाळ आवरून गरीब तोडाने ते नव्या गावी जातात. सरकारी नोकराला तडकाफडकी-विनाचौकशी काढून टाकता येत नसल्याने ( आता सुप्रीम कोर्टाने याच्याविरुद्ध निकाल दिल्याने ही मडळी बिथरली आहेत) तशी त्याच्या नोकरीवर गदा येत नाही. स्वकर्तृत्व, मर्दुमकी, कार्यक्षमता व वरिष्ठाची मर्जी संपादन करून पुढेपुढे करणे, हे प्रकार याना जमत नसल्याने खात्याचा कारभार थंड चालला तरी चालतो, बद पडत नाही.

पण हा वर्ग स्वातत्र्यापूर्वीपासून चालत आलेला आहे. त्याची परपरा मोठी आहे. फक्त दुर्दैवाची गोष्ट एवढीच की, हा वर्ग आता सख्येने कमीकमी होत चालला आहे 'एकत्रित भ्रष्टाचारा'च्या वर्तुळामध्ये याना 'वाळीत' टाकण्यात येतं ! वीस-वीस वर्ष सरकारी सेवा केलेली माणसं हे सहन करू शकतात पण मध्यमवयीन किंवा तरुण माणूस हे सहन करू शकत नाही. त्यामुळे तो अगोदर नाईलाज म्हणून व नतर सराईत होऊन यात सामील होतो.

## राजमान्य भ्रष्टाचार

नवा मुख्यमत्री, नवा मत्री किंवा नवा पतप्रधान आपापल्या पद्धतीनुसार या सरकारी यंत्रणेचा उपयोग करून त्याचा चागला किंवा वाईट कामासाठी वापर करतो. काम झटपट होण्यासाठी खालच्या पातळीवर अधिकार दिले तर त्यातून भ्रष्टाचार होण्याची शक्यता असते. तर हे अधिकार दिले नाहीत तर लाल फितीमध्ये सगळ्या योजना गुडाळल्या जातात. इदिरा गाधीनी एक नवीनच उपाय, अधिकाऱ्याना आपल्या कह्यात ठेवण्यासाठी वापरला. त्यानी भ्रष्टाचारासाठी प्रसिद्ध असलेल्या किंवा तयारी असलेल्या अधिकाऱ्यानाच जवळ केलं. त्याच्यावर जबाबदाऱ्या सोपवल्या. त्याच्याकडून आपल्याला हव तेवढं व हवं तसं काम करून घेण्यासाठी त्याच्या भ्रष्टाचाराच्या पुराव्याचा हातातली काठी म्हणून उपयोग केला. पैसे खाण्याबद्दल त्याची काहीच तक्रार नव्हती, भ्रष्टाचार जागतिक आहे, त्याचा निपात करण अशक्य आहे, अशी त्याची समजूत होती. त्यानी भर दिला कार्यक्षमतेवर. पैसा खा, पण काम करा, अशी त्याची पद्धत होती.

पण त्याना हे समजल नाही, किंवा सत्तेवर रहाण्यासाठी त्यांना काहीही चालत होत म्हणून असेल, पण या राजमान्य भ्रष्टाचाराच्या कहाण्या लवकरच राज्याराज्यात पोचल्या. अतुले, गुडुराव, डॉ. जगन्नाथ मिश्रा यासारख्या मुख्यमत्र्यानी यातून बोध घेतला व आपली

पृष्ठ २० वर

## पुस्तके

# नैसर्गिक शेती आणि जपानमधील नवी जीवनक्रांती

द वन स्ट्रॉ रिव्होल्युशन, हे आंग्ल भाषेत प्रसिद्ध झालेले पुस्तक मूळ जपानी शास्त्रज्ञ आणि तत्ववेत्ता श्री. मासानोबू फुकूओका यांनी लिहिलेल्या 'शिझेन नोहो वारा इप्पॉन नो काकुमेई' या जपानी पुस्तकाचे भाषांतर आहे. प्रसिद्धी हक्क १९७८–रोडेले प्रेस आणि मासानोबू फुकूओका यांचे आहेत. भारतात विक्रीसाठी प्रसिद्धी, प्रताप अगरवाल, का–ऑर्डिनेटर, फ्रेंड्स रुरल सेंटर, रसुलिया, होशंगाबाद, मध्य प्रदेश-४६१००१ यांनी केली असून, ते एस. जे. पटवर्धन, मुद्रा ३८३ नारायण पेठ, पुणे—४११ ०३०, यांनी छापले आहे.

पुस्तकाच्या भाषांतरित शीर्षकाच्या 'एका भाताच्या तणीसातून क्रांतीकडे' नावा मधून ध्वनित होणाऱ्या अर्थाने हे पुस्तक 'नैसर्गिक भात शेतीची तोंड ओळख' या विषयासाठी वाहिलेले आहे. आंग्ल भाषांतरकारांची त्याला तशीच पुस्ती आहे. माझ्या मते गहन अर्थाने मानव–प्रतीक मासानोबू स्वतःला निसर्गा समोर एक यत्किंचित तणीसमान मानतात आणि त्या एका भात तणीसातून क्रांतीकडे जाण्याचा चिरंतन मार्ग दाखवितात.

अण्विक प्रक्षेपकांनी अतराळात झेपावणारा मानव, विश्वातील ग्रह–गोलांवर पाय रोवणारा मानव, आकाशात परिभ्रमण करणाऱ्या उपग्रहांच्या मदतीने संदेश, दळणवळण, दूरदर्शन चित्रण आणि प्रसारण इत्यादी नियंत्रण करणारा मानव, हवे ते, हवे तसे, यंत्रमानवाकडून बिनबोभाट काम करून घेणारा मानव, संगणक—यंत्रे, गणक यंत्रे यांचा निर्माता मानव, ही भौतिक विज्ञानात मानवाने केलेल्या प्रगतीची द्योतके आहेत. जड बुलडोझरने आज येथे असलेली टेकडी उद्या तिकडे किंवा भुईसपाट झालेली. विस्तृत क्षेत्राची विद्युत वेगाने होणारी जमिनीची नांगरट, हवाई बीज प्रसरण, कीटक जंतु-नाशकांची फवारणी, विविध रासायनिक खतांचा वारेमाप उपयोग, वाढ-प्रेरकांचा वापर करून पीक उत्पादनांचे गाठलेले उच्चांक, शेतीच्या क्षेत्रात, गेल्या काही दशकात यांत्रिकीकरणाने – भौतिक विज्ञानाच्या मदतीने केलेली प्रगती सर्वश्रुतच आहे. या दैदिप्यमान प्रगतीमुळे जग लहान झाले आहे. गतिमान झाले आहे. यांत्रिक बनले आहे. मानवाचा आवाका विस्तारला आहे. हव्यास वाढीस लागला आहे. विज्ञानाने झपाटलेला मानव विश्वाला गवसणी घालून त्यावर ताबा मिळविण्याच्या दिशेने आणि अण्विक अस्त्रांच्या वेगाने झेपावतो आहे. ही वैज्ञानिक नेत्रदीपक यशाच्या चमत्कारांची अल्प झलक.

तर, दुसऱ्या बाजूला, दुसऱ्या महायुद्धात अण्विक विस्फोटाने बेचिराख झालेल्या हिरोशिमा, नागासाकी परिसराचा आणि स्फोटाच्या दूरगामी दृश्य परिणामांचा अनुभव घेणारा जपान, ज्वालामुखीच्या उद्रेकाने उध्वस्त चिली देश, भारतातील कीटकनाशकांच्या आकस्मिक गळतीमुळे, प्रदूषणग्रस्त भोपाळच्या परिसरातील मानवनिर्मित हत्याकांड, बंगला देशात चक्रीवादळाने न भूतो न भविष्यती घातलेले थैमान, तर दुष्काळाने ग्रासलेला इथिओपिया आणि सदैव दुष्काळाच्या छायेत असलेले इतर विकसनशील देश, ही वैज्ञानिक प्रगतीच्या गवसणीत न सापडलेल्या परिणामांची दृश्य रूपे. ओढवणाऱ्या सर्व प्रसंगांची पूर्व–सूचना, पूर्व–कल्पना असून सुद्धा, संभाव्य धोक्यावर मानवाला परिणामकारक नियंत्रण ठेवण्यात यश मिळालेले नाही. वैज्ञानिक प्रगतीने झपाटलेल्या, गतिमान आणि यांत्रिक जीवनातून मानवता नष्ट होण्यास मानवच कारणीभूत होत आहे काय? याच विचारांना चालना मिळून, अलिकडेच पर्यावरण-प्रदूषण निसर्ग घटकांचे संतुलन, परिस्थितीकडे विज्ञान इत्यादी विषयांची अंधुक पहाट येत आहे. मानव त्यात चाचपडत, घोटाळत प्रवेश करू लागल्याचे दिसत आहे.

दैदिप्यमान वैज्ञानिक प्रगती आणि निसर्गात वैज्ञानिकांनी केलेली ढवळाढवळ यामुळे विनाशाकडे नेणारे दृश्य परिणाम, अशा दुधारी कात्रीत सामान्य माणूस सापडलेला आहे. नव्हे तो भांबावून गेला आहे. गोंधळून गेला आहे. अशा परिस्थितीतून मार्गदर्शन करणारे विलक्षण विचारांचे पुस्तक म्हणून मासानोबू फुकूओका यांचे त्या एका भात तणीसातून क्रांतीकडे नेणारे पुस्तक लक्ष वेधून घेते.

नैसर्गिक शेतीची ओळख होण्याच्या अपेक्षेने पुस्तक हाताळणारा वाचक त्यातील आहार, आरोग्य, सांस्कृतिक मूल्ये आणि मानवाच्या ज्ञानमर्यादा इत्यादी विविध विषयांचे तर्कशुद्ध आणि तात्विक विवेचन वाचून खचितच चक्रावून जाईल. या ऐकीव

'दि वन स्ट्रॉ रिव्होल्युशन' लेखक – मासानोबू फुकूओका

परिचय लेखक : श्री. अ. रा. बापट, विभागीय वन अधिकारी, कार्य आयोजना, पुणे

जपानी तत्वज्ञानामुळे आकृष्ट वाचकाला, ही अनगड नैसर्गिक भातशेतीची पद्धती, हिवाळी –रबी पिकाची मशागत, लिंबू वर्गातील झाडाचो फळबाग जोपासना आणि भाजी-पाला मळयातील प्रात्यक्षिके इत्यादी तंत्र — मंत्राची सखोल वैज्ञानिक माहिती वाचून आश्चर्याने तोंडात ओठ घालावे लागेल.

दक्षिण जपानमधील शिकोकू बेटावरील लहान खेड्यात मासानोबू फुकूओका आपले नैसर्गिक शेतीचे प्रयोग करीत आहेत यांत्रिक आधुनिक शेतीने धारण केलेली विनाशाकडे नेणारी गती, ही नैसर्गिक शेतीपद्धती रोखून ठेवू शकेल त्याच्या नैसर्गिक शेतीला जड यंत्रसामुग्री नको, रासायनिक खते नकोत की कीटक–जंतु–नाशकाची हवाई फवारणी नको. निसर्गचक्रातील शेतीच्या प्रगतीच्या कलामुळे केवळ अत्यल्प निंदणी, खुरपणी केली की पुरे. ते जमीन नागरत नाहीत की कुजखते करीत नाहीत. पारंपारिक भात पिकाच्या बुडाशी खाचरात हंगामभर पाणी साचवितात. फुकूओका त्याच्या भात शेतीत पाणी साठवित नाहीत मागील २५ वर्षात त्यानी आपल्या शेताला नांगराचा फाळ लावलेला नाही. मात्र जपानमधील इतर कोणत्याही सर्वोत्तम शेती उत्पादनाशी तुलनात्मकच नव्हे तर अधिक उत्पादन ते आपल्या नैसर्गिक शेती पद्धतीने काढतात. नैसर्गिक शेती पद्धतीसाठी जागरूक अर्थपूर्ण कष्टाना पर्याय नाही; पण इतर पद्धतीत होणाऱ्या व्यर्थ कष्टाच्या तुलनेत नैसर्गिक शेती पद्धतीसाठी खूप कमी कष्ट उपसावे लागतात. त्याच्या पद्धतीत राब भरण्याची, जाळण्याची जरूरी नाही. त्याची पद्धती सर्वथ: प्रदूषण–मुक्त आहे

रबीच्या भात शेतीत कोणतीच मशागतीची कामे न करून, बीज केवळ प्रसरण पद्धतीने फेकून, इतके विक्रमी भाताचे पीक आणि त्याच शेतात हिवाळी रबीचे भरघोस पीक दरवर्षी घेणे कसे बरे शक्य आहे ? ही रास्त शंका होईल. परंतु इंग्रजी भाषांतराचे संकलन श्री. लॉरी कॉर्न यानी फुकूओकाच्या शेतावर आणि फळबागेत कित्येक महिने काम करून त्याच्या शेती पद्धतीच्या यशाचा अनुभव घेतला आहे, श्री लॉरी कॉर्न लिहितात, 'या महान गुरुच्या विषयी जे ऐकीव होते त्यावरून माझ्या नेमक्या काय अपेक्षा होत्या हे आता अनुभवानंतर सांगणे कठीण आहे. मात्र आता सामान्य जपानी कामकऱ्यासारखा त्याचा साधा वेष आणि बूट पाहून मला तरी आश्चर्याचा गोड धक्का बसला. त्याच्या झुपकेदार पांढऱ्याशुभ्र दाढीची, दक्ष आणि आत्मविश्वासपूर्वक हालचालीची, काही वेगळीच पण विलक्षण छाप पडून गेली त्याच्या सोबत आणि त्याच्या विद्यार्थ्यांबरोबर काम करता–करता आणि सध्याकाळी मातीच्या झोपडीत बसून केलेल्या व्यापक चर्चेतून मला फुकूओच्या नैसर्गिक शेतीपद्धतीचे आणि त्या मागील तात्विक बैठकीचे हळूहळू आकलन झाले.

मात्सुयामा सामुद्रधुनीच्या पलिकडे डोकावणाऱ्या डोंगराच्या उतरणीवर फुकूओकाची फळबाग आहे. याच डोंगर ओळीवर त्याचे विद्यार्थी राहतात, काम करतात. बहुतेक विद्यार्थी पाठीवर सामान बांधून येतात. सर्वजणच अनभिज्ञ अशा अपेक्षा बाळगून असतात. ते थोडे दिवस किंवा काही आठवडे तेथे थांबतात आणि नंतर डोंगर उतरणी पलिकडे निघून जातात. पण त्यातील ४–५ जणाचा एखादा गट वर्षभरासाठी विसावतो. कित्येक स्त्रिया आणि पुरुष वर्षानुवर्षे तेथे राहात आहेत आणि सतत काम करीत आहेत.

तेथे आधुनिक सुखसोयी नाहीत. पिण्याचे पाणी दूर झऱ्यातून वाहून आणतात. चुलीवर स्वैपाक होतो. मेणबत्त्या, धुपटणी, उजेडासाठी असतात. तणाच, भाज्याच सभोवार रान माजलेल असतं. मासे, कालव, शिपल्यातील तिसरे, जवळपासच्या ओढ्यातून गोळा करता येतात काही मैलावर पलिकडे समुद्रातील भाजीपाला मिळतो

ऋतुमान आणि वायुमानाप्रमाणे विद्यार्थ्यांचे कामाचे स्वरूप बदलते कामाचा दिवस आठ वाजता सुरू होतो. एक तास जेवणाची सुटी असते. उन्हाळी ती दोन–तीन तासही असते सूर्यास्ताला काम आटोपून सर्वजण झोपडीत परततात. शेतकामाखेरीज इतर कामाच्या पाळ्या लावल्या जातात. पाणी आणणे, जळण फोडणे, स्वैपाक करणे, अघोळीचे पाणी तापविणे, शेळ्या, कोंबड्या, मधमाशाची पोळी, याची देखभाल करणे, झोपड्या लिंपणे किंवा नव्या बांधणे आणि सोयाबीनचे वाटण (मिसो) आणि दही-ताक (टोफू) बनविणे इत्यादी.

संपूर्ण वसाहतीच्या खर्चासाठी मासिक १०,००० येन (३५ डॉलर्स) फुकूओका देतात त्यातूनच सोयासॉस, वनस्पती तेल तूप, रॉकेल इत्यादी शेतात न पिकणाऱ्या नित्य गरजा भागविल्या जातात. बाकी सर्व गरजा शेती पिकातून आणि कल्पकतेने विद्यार्थ्यांनी भागवाव्या अशी फुकूओका याची अपेक्षा असते. श्री. फुकूओका गेली ३०–४० वर्षे अशा अर्ध–आदिमानव पद्धतीने जीवन जगत आहेत आणि विद्यार्थ्यांनी तसेच राहिले पाहिजे असा त्याचा कटाक्ष असतो. नैसर्गिक शेतीची कला आत्मसात करण्यापूर्वी तिच्या अध्यात्मिक बैठकीचे आकलन होण्यासाठी आणि माणसांच्या जाणिवाचा विकास होण्यासाठी असे राहणे आवश्यक आहे असे त्याचे ठाम मत आहे.

श्री फुकूओकाच्या शिकुओकूच्या परिसरात सखल प्रदेशात भाताचे तर डोंगर उतरणीवर लिंबू वर्गाच्या फळबागाचे पीक घेतात. त्याच्या शेतापैकी दीड एकर भातशेती तर साडेबारा एकर मँडॅरिन संत्र्याची फळबाग आहे पाश्चिमात्याना आणि एकूणातच हा काही फार मोठा पसारा नाही. पण तेथील कामे परंपरागत लहान हत्यारानीच केली जातात त्यामुळे लहान क्षेत्रातील हे कामसुद्धा खूप कष्टाचे आहे

### प्रगत कला

श्री. फुकूओका शेतात आणि फळबागेत विद्यार्थ्यांबरोबर सतत राबतात पण ते केव्हा आणि कोठे भेटतील याचा नियम नसतो. विद्यार्थ्यांसमोर अनपेक्षित प्रगट होण्याची कला त्याना साधली आहे ते एक अत्यंत उत्साही व्यक्तिमत्त्व आहे ते सदोदित एखाद्या विषयावर बोलत असतात कधीकधी विद्यार्थ्यांना चर्चेसाठी एकत्र बोलवतात. बहुतेक वेळा एखादे काम कमीत कमी कष्टाने आणि वेळात कसे पूर्ण करावे यावर ते सूचना देतात. एखादी वस्तू मिळविण्यासाठी काहीजण अनावश्यक जास्त काम करतात आणि काही वस्तूंची त्याना आवश्यकता नसताना त्या मिळविण्याचा हव्यास धरतात, असे त्याना वाटते. 'व्यर्थ न मी ही शिणवीन काया कष्टानाही अर्थ हवा ..' इत्यादीवर त्याची दृढ श्रद्धा आहे. तर कधी बुरशी, कीटक,

तण, त्याचे उपद्रव, रोग यांची माहिती, त्याचे जीवनचक्र इत्यादी विषयावर प्रवचने देतात. क्वचित क्षणार्ध थांबून गतायुष्यातील अनुभव सांगण्यात ते दंग होतात. आपल्या नैसर्गिक शेतीचे तंत्र, मूलभूत तत्त्वे, अध्यात्मिक बैठक विषद करण्याची कौशल्यपूर्ण वेगळीच हातोटी त्यांना साधली आहे शेती अवजारांची निगा राखण्यावर त्यांचा भर असतो. त्याची उपयुक्तता, निगेचे फायदे आणि शेतात प्रात्यक्षिके देण्याचा त्याना कधीच थकवा वाटत नाही.

दूर आरामात बसून, आपोआप वाढणारी शेती पाहणे, म्हणजे नैसर्गिक शेती असा शेतावरील नवागताचा समज असल्यास, त्याना अद्याप बरेच काही माहीत करून घ्यावयाचे आहे, अशी समज फुकूओका देतात शेतात काम केल्याशिवाय तरणोपाय नाही हे विनोदी शैलीने पटवून देतात काहीही करू नका या मशागती तंत्राचा नैसर्गिक शेतीसाठी उपयोग करण्याचे मी प्रतिपादन करतो, त्यामुळे किती तरी लोक येतात, अंथरूणातून बाहेर पडावे लागणार नाही या कल्पनाविश्वात ते दंग असतात. शेतावरील अनुभवाने मात्र त्याना धक्का बसतो. काम करावे लागते याबाबत वादच नाही, अनावश्यक कामाचे विरुद्ध हा वाद आहे. असे ते प्रायोगिक समजावतात. 'नैसर्गिक शेती' म्हणजे केवळ शिकार आणि निसर्गात आपोआप वाढलेल्या वस्तू गोळा करणे असे नसून, ती एक प्रगत कला आहे. ती हस्तगत करण्यासाठी प्रयत्नाची आणि ज्ञानाची पराकाष्ठा करावी लागते. इतर आणि नैसर्गिक शेती यामधील मुलभूत फरक असा की 'निसर्गावर मात करून शेती सुधारणा करण्यापेक्षा निसर्गाच्या कलाकलाने शेती केली पाहिजे.' मानवाला अजून आपल्या निसर्गाशी असलेल्या नात्याची जाणीव झालेली नाही. त्याला निसर्गाशी असलेल्या एकरूपतेची जशी ओळख पटलेली नाही तसेच आपण काही निसर्गापासून वेगळे नाही, त्याचे स्वामी नाही किंवा केवळ प्रेक्षकही नाही, ही जाणीव जेव्हा मानवाला होईल तेव्हा त्याच्या जीवनाला एक नवीन अर्थ प्राप्त होईल, यावर फुकूओकाचा भर आहे.

फुकूओका 'काहीही करू नका या मशागतीच्या शेती तंत्राचे' प्रतिपादन करतात तेव्हा सेंट मॅथ्यु याच्या वचनाची आठवण होते... 'आकाशातील भराऱ्या मारणाऱ्या पाखराकडे पहा, ती पेरणी करत नाहीत, धान्य कापीत नाही, काढून साठवत नाहीत, पण तुमचा आकाशातील बाप मात्र त्याना खाऊ घालतो' दोन्ही वचनाचा हेतू एकच–एक दिसतो. त्यानी आपली या जगातील नेमकी जागा कोणती याचा इशारा दिला आहे. आपण हे विश्व किंवा स्वतःला घडविलेले नाही. निसर्ग निर्मित जीवन आपण जगतो, निसर्ग आपण निर्माण केलेला नाही. शोधल्याशिवाय पाखरांना अन्नकण मिळत नाही, शेतकऱ्याला शेतात काम केल्याशिवाय तरणोपाय नाही.

तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या...' असे न केले तर काय हरकत आहे ?... तसे न केले तर काय हरकत आहे ?... किंवा तसाच माझा विचार होता.' इत्यादी सर्वसाधारण बुद्धिवाद्यांच्या जाणिवाना पटणाऱ्या प्रतिक्रियांना हादरवून टाकण्याचे सामर्थ्य 'काहीही करू नका या मशागती तंत्रात' सोप्या आणि ठाम वचनात आहे. असे का ? किंवा कशासाठी ? या प्रश्नांची उत्तरे टाळून पुढे सरसावणाऱ्याविषयी लहान मुले आणि वृद्धाकडून जशी गैरविश्वासाची चपखल प्रतिक्रिया येते, तसाच सांकेतिक विज्ञान विरोध 'काहीही करू नका मशागत तंत्रात' आहे. विज्ञानाविषयी किंवा त्या नावाने बऱ्याच गोष्टी खपवून घेतल्या जातात, त्याविषयी संशय बाळगणारे श्री. फुकूओका एक शास्त्रज्ञ आहेत म्हणून ते अव्यवहारी किंवा ज्ञानाला तुच्छ लेखतात असे मुळीच नाही. त्याचा विज्ञान संशयखोरपणा 'आधी केले मग सांगितले...' या प्रायोगिक स्वानुभवातून आहे

## तत्त्वज्ञान आचरणे

तरुण फुकूओका आपले खेड्यातील निवासस्थान सोडून सूक्ष्म जिवाणू विज्ञानाचा अभ्यास व संशोधन करण्याच्या उद्देशाने प्रवास करत करत याकोहामाला येऊन पोहोचले. पुढे ते वनस्पती रोगाचे विशेषज्ञ झाले. त्यानंतर काही वर्षे ते वनस्पती/शेती विभागाचे कस्टम निरीक्षक म्हणून प्रयोगशाळेत काम करीत होते. त्या वेळी ते पंचविशीतील तरुण होते. लवकरच त्याना प्रयोगशाळेच्या मर्यादा समजल्या. एक दिवस खिन्न आणि हताश मनःस्थितीत त्यांना साक्षात्कार झाला. कुठलाही विचार मनात नसताना, ध्वनी उमटले... 'या जगात काहीच राम नाही... मला काहीच उमगत नाही अशी माझी अवस्था झाली', त्यातूनच 'काहीही करू नका मशागत तंत्राचे' आणि पुढे 'त्या एका भात तणीसातून क्रांतीकडे' वाटचाल सुरू झाली. त्यानी आपल्या नोकरीला रामराम ठोकला. कामाची दिशा बदलून प्रयोगशाळा सोडून देऊन त्यानी शेतीची वाट धरली. ते आपल्या खेड्याकडे परतले. साक्षात्काराची सत्यता पडताळून पाहण्यासाठी, स्वतःच्या शेतात प्रयोग करण्याच्या दृढ निश्चयाने. पडलेल्या जबाबदारीमुळे त्याना कळून चुकले दुसऱ्याला सल्ला देण्यापूर्वी स्वतःचा स्वतःलाच देता आला पाहिजे. शेकडो स्पष्टीकरणे पुढे करण्यापेक्षा तत्त्वज्ञान आचरणे हा उत्तम मार्ग नाही काय ? विचाराना आकार द्यावयाचा, समजुती बरोबर की चूक हे ठरविण्यासाठी प्रात्यक्षिके करावयाची आणि अनुभवातीच निश्चित निर्णय घ्यावयाचा. विशेषज्ञ जेव्हा स्वतःच्या सल्ल्याने निर्णय घेण्याचे ठरवतो आणि स्वत. सांगितल्याप्रमाणे कृती करू लागतो त्याच वेळी त्याने विशिष्टीकरणाच्या भिंती–मर्यादा तोडलेल्या असतात. विशेषज्ञ अधिकारवाणीने पूर्वी न सांगितलेले सांगतो म्हणून आपण ऐकून घेतो. ती केवळ माहिती म्हणून नव्हे तर त्याचा अनुभव आणि माहिती याचा संगम असतो, म्हणून आपण ऐकून घेतो.

पडीत, कित्येक वर्षे न नांगरलेल्या शेतातून वाट काढीत असताना फुकूओकाना या अभिनव नैसर्गिक शेतीची कल्पना डोक्यात चमकली. माजलेले तण आणि गवतातून सुदृढ वाढणाऱ्या भाताची कणसे दिमाखाने डोलत होती. हे त्यानी नेमके हेरले. तेव्हापासूनच भात खाचरात पाणी अडवून ठेवण्याचे त्यानी बंद केले, ते कायमचेच. वसंत ऋतूत भात पेरणीची पद्धत त्यानी बंद केली त्याऐवजी, नांगरट न केलेल्या जमिनीत प्रसरण पद्धतीची पेरणी हिमवर्षावापूर्वी हिवाळ्यात करण्याचा प्रघात त्यानी सुरू केला. भाताचे बी झाडावर परिपक्व होऊन निसर्गतः प्रसरण होण्याची हीच हिवाळ्यातील वेळ असते. तणांचा उपद्रव कमी होण्यासाठी नांगरणी तर बंद केलीच पण

जमिनीवर व्हाईट–क्लोव्हरचे किंवा भात/बार्लीच्या तणीसाचे कायमस्वरूपी आच्छादन करून, तणाच्या... नियंत्रणाचे एक नवे तंत्र त्यानी विकसित केले तेसुद्धा निसर्गाच्या कलाकलानेच. नैसर्गिक वातावरणाचा कल पीक वाढीच्या बाजूचा आहे हे दिसताच तण, इतर वनस्पती, कीटक, प्राणी इत्यादी, परिसरात नैसर्गिक वाढणाऱ्या सजीवाच्या जीवनचक्रातील फुकूओकांची अनाठायी ढवळाढवळ थाबलीच म्हणून समजावे.

खरीपाच्या भातपिकापाठोपाठ हिवाळी बार्लीचे रबी पीक घेण्याच्या फुकूओकाच्या पीक योजनेबाबत, सर्वजण अनभिज्ञच आहेत. 'त्या एका भात तणीसातून क्रातीकडे' या पुस्तकातून ते अशा चक्राकार पीक योजनेचा पुन्हा पुन्हा उल्लेख करताना आढळतात, म्हणून पारपारिक जपानमधील पीक योजना आणि पाठोपाठ फुकूओकाची नैसर्गिक शेती पद्धती, याची तुलनात्मक माहिती वाचकाना भावेल.

पारपारिक जपानी भातशेतीसाठी प्रथम राब भाजून काळजीपूर्वक तयार केलेल्या लहान वाफ्यात बेणे रूजवून, रोपे वसत ऋतुच्या सुरवातीला तयार करतात. अगदी अलीकडेच दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत ही पद्धती वापरात होती. चागले कुजखत आणि रासायनिक खताचे मिश्रण करून ते सपूर्ण शेतात पसरवून टाकण्यात येते. त्यात पाणी सोडून नागर आणि चिखलणी यत्राने जमिनीची मशागत करून, शेत लावणीसाठी तयार करतात. वसतऋतुत जपानमध्ये पावसाला सुरुवात होते. स्वतंत्र वाफ्यात रूजवलेल्या बीयाची रोपे, सुमारे ८–१० इचाची असताना, ती उपटून आणून चिखलणी केलेल्या शेतात मजुराकडून पुनर्रोपण करण्यात येते. एक मजूर एका दिवसात १।३ एकरात काळजीपूर्वक लागवड करतो. पुरेसे मजूर एकाच वेळी कामावर लावून, ही लागवड शक्यतो झटपट उरकण्याचा प्रघात आहे.

लागवडीनंतर, ओळीमधील अंतरात, हलक्या नागराने कुळवणी करतात. पाठोपाठ हाताने निंदणी, खुरपणी, मातीचा भराव देणे, ही कामे केली जातात. एका पीक हगामाच्या कालावधीत मशागतीच्या अशा चार फेरपाळ्या होतात. सुरुवातीपासूनच भात खाचरात १ ते २ इच जमीन बुडवे पाणी अडवून साचविण्यात येते, ते पुढे तीन महिने सतत शेतात रहाते. सप्टेंबर–ऑक्टोबरचे सुमारास पीक तयार होते. बुडापासून पीक कापून भारे बाधण्यात येतात भारे मळणीपूर्व वाळण्यासाठी लाकडी किंवा बासाच्या माडणीवर हुडकण्यात येतात.

भाताच्या कापणीनतर खोल नागरून एक–दोन फूट उचीच्या पसरट सऱ्या/ओळबे व नाल्या पाडण्यात येतात. बार्ली किंवा रायसे बी सऱ्यावर पेरण्यात येते. वेळोवेळी कुजखते, सेंद्रिय खते वापरून, मशागतीची कामे वेळापत्रकाप्रमाणे करून हिवाळी पीक वसतऋतुच्या आगमनापर्यंत तयार होते.

अशा या पारंपारिक पीक योजनेद्वारा चक्राकार सतत दोन पिके घेण्यात येतात. शेताचा मगदूर खालावू दिला जात नाही. अशी ही जपानी पारंपारिक पद्धतीसुद्धा वाखाणण्यासारखी आहे.

पारपारिक जपानी भात शेती आणि आलटून–पालटून पिके घेण्याच्या योजना-पद्धती, या गुणविशेषाचा फुकूओका याना सुद्धा रास्त असा अभिमान आहे. मात्र त्याचे मते किती तरी अनावश्यक कामाचा त्यात समावेश आहे. ते आपल्या नैसर्गिक शेती पद्धतीला– 'काहीही मशागत न करता पीक घेण्याचे तंत्र' (डू नथिंग टेक्निक्) असे म्हणतात.

## चक्र अव्याहत चालू

फावल्या वेळात 'रविवार-शेती' करणाऱ्यालासुद्धा कुटुंबापुरते भरपूर पीक घेणे त्याच्या पद्धतीने सहज शक्य आहे असा त्याचा दावा आहे. कसेही असले तरी कष्टाशिवाय, प्रयत्नाशिवाय शेती होते असे मात्र त्याना मुळीच वाटत नाही. नियमित वेळापत्रकाप्रमाणे काम, निसर्गाच्या चक्राच्या कलाकलाने काम म्हणूनच त्याच्या शेताची निगा व मगदूर टिकून आहे, असे त्याचे ठाम मत आहे. जे काही करावयाचे ते काळजीपूर्वक, जाणीवपूर्वक आणि मनापासूनच. जमिनीच्या खडकात भात, भाजीपाला जे काही पेरले असेल किंवा पिकविण्याचा इरादा असेल, त्याची निगा आणि जोपासना करण्याची जबाबदारी पेरा करणाऱ्याची आहे निसर्गात ढवळाढवळ करून शेत-जमीन पडीक सोडणे हानिकारक आणि बेजबाबदारीचे द्योतक आहे असे ते मानतात.

हिमवर्षाव सुरू होण्यापूर्वी भात, व्हाईट क्लोव्हर आणि हिवाळी बार्ली-रायचे बी, तिन्हीचे मिश्रण करून एकाच शेतात प्रसरण पद्धतीने फुकूओका पेरतात. त्यावर तणिसाचा जाड थर पसरविण्यात येतो. हिवाळी पिकाचे आणि क्लोव्हरचे बी निसर्गचक्राप्रमाणे रूजण्यास पक्व असते, ते ताबडतोब रूजून तणीसातून सरळ वर वाढून तरारू लागते भाताचे नैसर्गिक अपरिपक्व बी वसत ऋतूपर्यंत सुप्तावस्थेत तसेच पडून राहते.

सखल आणि खालच्या उतारावरील शेतात हिवाळी पीक वाढून कणसे भरेपर्यंत, डोंगर उतरणीवरील फळबागेचे क्षेत्र फुकूओकाच्या कामाचे केंद्र बनते. नोव्हेंबर मध्यापासून एप्रिल अखेर लिंबू वर्गातील फळाचा हगाम असतो.

हिवाळी बार्ली। रायचे पीक मे मध्ये कापणीस तयार होते. कापणीनतर ८।१० दिवस वाळवून, मळणी, वारवणी करून धान्य पोती भरली जातात. सपूर्ण तणीस जसेच्या तसे आच्छादन (मल्च) म्हणून शेतभर पसरण्यात येते. पावसाळ्याच्या सुरुवातीला थोडे दिवस–जूनमध्ये–पाणी अडवून शेतात साठविले जाते. उद्देश असा की तणाचा आणि तूर्त क्लोव्हरचा जोम कमी व्हावा. तणीस थराखाली इतके दिवस सुप्त पडून असलेले भाताचे बी आता जीवनचक्राप्रमाणे रूजण्यास परिपक्व आणि आसुसलेले असते, त्याला मदत व्हावी. भात बी रूजून भात तणिसातून जोमाने मार्ग काढीत सरळ झपाट्याने वर उगवावे. भात रोपानी एकदा का वर डोके काढले की, साठविलेले खाचरातील पाणी फुकूओका बाहेर काढून देतात ते कायमचेच. पाणी सोडून देताच आता व्हाईट क्लोव्हर पुन्हा फोफावतो. भाताच्या रोपाच्या बुडाशी जमिनीलगत त्याचे दाट आच्छादन बनते

पारपारिक भात शेतीत वास्तविक येथून पुढील कामेच जिकिरीची आणि कष्टाची असतात. या पायरीनतर फुकूओकाच्या शेतावर मात्र काम शिल्लक राहते ते केवळ पाणी शेतावाहेर काढून देण्याचे, येण्या-जाण्याच्या पायवाटाची सफाई, बेणणी वगैरे

किरकोळीचे.

ऑक्टोबरमध्ये टपोरी भात कणसे डोलू लागतात. कापणी केली जाते लोब्या कापून वाळविण्यासाठी टांगून ठेवण्यात येतात. भाताची मळणी, वारवणी करून साठवण होते तणीस शेतभर पसरविण्यात येते.हिवाळी पुन्हा तिन्ही बियाणाच्या मिश्रणाची प्रसरण पद्धतीने पेरणी आटोपण्यात येते. मॅन्ड्रीन सत्री डोंगर उतरणीवर पिकून तोडीला आलेली असतात. फुकूओकाच्या शेतातील चक्र अव्याहत चालू आहे

चतुर्थांश एकरातून फुकूओका अठरा ते बावीस बुशेल ( ५००-६०० किलो ) भात पिकवितात. परिसरातील परंपरागत किंवा आधुनिक रासायनिक खतांच्या शेतीतून सुमारे तेवढेच भाताचे उत्पादन होते. त्यानी काढलेल्या हिवाळी पिकाचे उत्पादन मात्र पारपरिक किंवा आधुनिक दोन्ही पद्धतीपेक्षा अधिक असते. या पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही पद्धतीत, खोल नागरणी, सऱ्या / नाल्या पाडणे, कुळवणी, बेणणीच्या फेरपाळघा इ. कष्टाची जादा कामे करावी लागतात ते अलहिदाच.

## जमिनीचा मकदूर

नैसर्गिक, पारंपारिक आणि आधुनिक तिन्ही पद्धतीने उत्पादन सारखेच मिळते. जमिनीच्या मगदुरावर मात्र विभिन्न परिणाम होतात प्रत्येक हंगामानतर फुकूओकाच्या शेताचा मगदुर सुधारतच आहे. गेली २५ वर्षे नागरणी बद केल्यापासून त्यांच्या शेताचा मगदुर – प्रत, पोत, रचना, आणि पाणी धारण क्षमता सर्वच बाबतीत सधन होत आहे. पारपारिक पद्धतीने होणाऱ्या शेतीक्षेत्राचा मगदुर टिकून आहे, तर आधुनिक रासायनिक खताच्या शेत-जमिनी निर्जीव, नापीक आणि निरुपयुक्त होत आहेत.

सर्वसाधारण भातशेतीच्या खाचरात पाणी साठविण्याच्या पद्धतीच्या उलट, फुकूओका भाताच्या ताटव्याच्या वाढीच्या काळातसुद्धा, खाचरात पाणी साठवत नाहीत. ह्या तंत्रातील अत्यत महत्त्वपूर्ण वेगळेपणा असून क्रांतिकारक फायद्याचा आहे. अशा तंत्र बदलाचे विचार, कल्पनाविश्वातसुद्धा कोणाच्याही डोक्यात शिरणार नाहीत. तंत्र व्यवहार्य आहे, हे ते सप्रयोग, ठामपणे सांगतात. इतकेच नव्हे तर भाताची वाढ त्यामुळे अधिक जोमाने व निरोगी होते. मुळे खोल रूजतात. ते भाताच्या ग्लुटिनस ह्या जुना वाणच पेरतात. प्रत्येक लोबीतून २५० ते ३०० दाण्यांचा उतारा मिळतो.

तणीसाच्या आच्छादनाचा ( मल्चचा ) सतत वापर केल्याने जमिनीची पाणी धारणक्षमता वाढते. नैसर्गिक शेतीमुळे सिंचनाला फाटा देता येतो. नापीक जमिनी, पुन्हापुन्हा आता केलेल्या नैसर्गिक शेतीनंतर, भात शेतीस व भरघोस पिकाचे वाण लावण्यास उपयुक्त ठरू लागल्या आहेत. निकामी पडीक जमिनीचे नैसर्गिक शेती पद्धतीने पुनरुत्थापन करणे शक्य आहे.

शेतात, फलोद्यानात, रोग, कीड दिसतात, मात्र त्यामुळे पिकाचा सर्वनाश झाला, असे कधीच घडत नाही कमकुवत झाडांचेच त्यामुळे नुकसान होते. सघन पर्यावरणात पीक वाढविणे ह्या रोग व कीड नियंत्रणाचा सर्वोत्तम उपाय आहे, असे फुकूओकाचे धोपटमार्गी मत आहे.

फळबागेतील झाडाच्या छताची, पसरून पल्लेदार वाढ होण्यासाठी, फळाचा खुडवा सुलभ होण्यासाठी, फुकूओका झाडाची छाटणी करीत नाहीत. झाडे अंगच्या नैसर्गिक गुणवत्तेनुसार वाढू दिली जातात. झाडातरात उतरणीवर भाजीपाला आणि हंगामी फुलझाडांची लागवड करण्यात येते उन्हाळयात चागला पाऊस येईल याचा अदाज बाधून वसत ऋतुत बुडकी, कोबी, मुळा, सोयाबीन, मोहरी, राई, नवलकोल, गाजर आणि इतर भाज्यांच्या बिया एकत्रित सरमिसळ करून झाडातरात प्रसरण पद्धतीने पेरण्यात येतात. फुकूओकाच्या फळबाग-जमिनीचा पोत अत्यत मृदु -- मृण्मयी आहे. पृष्ठभागात सेंद्रिय घटकाचे भरपूर प्रमाण असून ती ठिसूळ, भुसभुशीत आणि चागल्या पाणी धारण क्षमतेची व निचऱ्याची आहे. डोंगर उतरणीवर फळबागेत तण आणि भाजीपाल्याचे, क्लोव्हचे सतत आच्छादन राहिल्यामुळे असा पोत वधारला आहे.

भाजीपाला फुलझाडाची रोपे लहान असताना, तण व इतर उपद्रवी वाढ अगदी वरचेवर कापून केवळ अडथळा दूर करण्यात येतो. भाजीपाला व फुलझाडानी मूळ धरताक्षणी संपूर्ण क्षेत्र, तणासह सर्व वनस्पती वाढीसाठी निसर्गावर सोपविण्यात येते. काही भाजीपाला, फळे यांचा वेचा किंवा खुडवा घेतला जात नाही. परिपक्व झाल्यानतर ती फुलतात, फळतात, बीज प्रसरण होते. नैसर्गिक प्रजननामुळे भाजी, फळाच्या नव्या पिढीत मूळ रानटी सुदृढता, चिवटपणा आणि कडवट चव इत्यादी गुणविशेष उतरतात. कितीतरी प्रकारचा भाजीपाला, फुलझाडे त्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारच्या मशागतीशिवाय दरवर्षी आपोआप वाढतात.

श्री. फुकूओका याची तत्रे, जशीच्यातशी शेतीसाठी सर्वत्र वापरता येणार नाहीत. तरी सुद्धा पुस्तकातील प्रायोगिक वर्णनाचे परिच्छेद सरसकट वायफळ आणि निरूपयुक्त आहेत असे समजणे चूक ठरेल. एखाद्या लहान जमिनीच्या तुकड्याच्या वायुमान, पिके इत्यादी दृष्टिकोनातून डोळसपणे, सवेदनाशील मनाने आणि नव्या जोमाने, अभ्यास केल्यास काय घडविता येईल, याचे हे प्रयोग मूर्तिमत उदाहरण आहे म्हणून बारकाईने लक्ष देण्यास दखलपात्र आहेत. स्थानिक परिस्थितीस अनुरूप फेरफार करून नैसर्गिक शेती प्रयोग आणि विकासाची सधन दिशा म्हणून समातर तत्र विकासाला हे प्रयोग प्रेरणा देतात. भात आणि बार्ली/राय याच्या पारंपारिक पीक योजना चक्राखेरीज गहू, बकव्हीट बटाटे, मका आणि सोयाबीन याच्या पीक योजना विकसित करता येतील. सुजाण शेतकऱ्याला पुस्तकातील पानागणिक विचार, त्याची स्वत.ची शैली, आधुनिक शेतीपद्धती, नैसर्गिक शेतीपद्धती आणि खऱ्या विकासाचे तत्त्वज्ञान या विचारमालिकेत गुतवून ठेवण्याचे, पुन्हा-पुन्हा झुलवत ठेवण्याचे सामर्थ्य या 'एका भात तणिसातून क्रातीकडे' या पुस्तकात आहे

## अमेरिकन प्रभाव

फुकूओका कित्येक वर्ष सतत पुस्तके, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन यावरून आपल्या नैसर्गिक शेतीचे विचार मांडत होते. त्याच सुमारास अमेरिकन प्रभावाखाली दुसऱ्या महायुद्धानतर जपानमधील विकासकामाची पावले, निर्धारपूर्वक आणि नेमक्या उलट दिशेने आधुनिक, रासायनिक खताच्या शेतीपद्धतीकडे पडत होती. पारपारिक पद्धतीच्या तुलनेत निम्म्या कष्टात आणि वेळात

सुमारे तेवढेच उत्पादन होण्याची दैदिप्यमान किमया या आधुनिक रासायनिक खत पद्धतीच्या विक्रमी शेतीची होती. या मृगजळामागे धावून, विकासस्वप्ने पूर्ण होतील या भ्रामक समजुतीने, एकाच पिढीनतर प्रत्येक जपानी हिरीरीने आधुनिक रासायनिक खताची शेतीपद्धती वापरू लागला आलटूनपालटून पिके घेण्याची पद्धती, कुजखताचा वापर, क्लोव्हरसारख्या आच्छादन पिकाचा वापर, त्या पारपारिक पद्धतीने जमिनीचा पोत जतन करण्यात, जपानच्या अनेक पिढ्याची तपश्चर्या होती त्या पारपारिक पद्धतीकडे धुंदीने झपाटलेल्या जपान्यानी डोळेझाक केली. फुकूओकाच्या नैसर्गिक शेतीच्या प्रसरणाची कोणीच दखल घेतली नाही. एकाच पिढीच्या कालातरानतर शेती नापीक झाल्या. जमिनीचा कुजयर लोप पावला, रचना खालावली, पीके कमकुवत निसत्व, रोगट येऊ लागली पोषणासाठी शेती सर्वस्वी रासायनिक खतावर अवलबून राहू लागली शेतकरी, मजूर आणि प्राण्याच्या कष्टाची उणीव, जमिनीचा कस खाऊन पिके भरून काढू लागली

जपानने हेकेखोरपणे आणि एकागी दृष्टिकोनातून अमेरिकन अर्थनीतीचा आणि औद्योगिक विकासाचा पाठपुरावा केला आहे. औद्योगिक केंद्र असलेल्या शहराकडे खेड्यातील शेतकऱ्यांचा ओघ लागला आहे. गेली ४० वर्षे सामाजिक जीवनाचा आणि जमिनीच्या अन्याय्य ऱ्हासाचा राग श्री. फुकूओका यानी पचविलेला आहे. हजार वर्षापासून पूर्वज रहात असलेले त्याचे लहानसे खेडे आता मारसुयामा शहराच्या उपनगराला भिडले आहे टाकावू वाहतूकीने गजबजलेला आणि दारूच्या बाटल्याच्या काचाचा खच पडलेला, राष्ट्रीय महामार्ग त्याच्या भातशेतीतून जातो. हे पचविलेल्या अन्यायाचे द्योतक नाही काय ?

वैशिष्टीकरण असलेच पाहिजे असे गृहित धरण्याची आपल्याला सवयच जडली आहे. वैशिष्टीकरणाच्या नावाने दुराग्रही विलगन करणाऱ्याचा, फुकूओका निषेध करतात. एखाद्या विषयाचा एकात्म/सपूर्णत्वाने ते पाठपुरावा करतात. सपूर्णत्वाच्या सकल्पनेत त्याना अवगत असलेल्या आणि नसलेल्यासुद्धा माहितीचा समावेश होतो, याचा ते कधीच विसर पडू देत नाहीत. एकागी वैशिष्टीकरणातून दैदिप्यमान चमत्कार दाखविण्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा अवमान होत आहे, असे त्याचे मत आहे. तुटपुज्या माहितीच्या आधारे आणि माहिती नसलेल्या गोष्टीकडे अनावश्यक समजून, दुर्लक्ष करून विज्ञानाला दावणीशी बाधले जाईल याचे फुकूओकांना राम्त भय वाटते. शस्त्रस्पर्धा आणि शीतयुद्ध, याना अनुस्यूत भयाची प्रकट रूपे नाहीत काय ? विज्ञानाला उमगलेल्या निसर्गाबाबत फुकूओका स्पष्ट सागतात, नैसर्गिकता लोप पावलेल्या निसर्गाचे ते ज्ञान आहे. आत्मा नसलेल्या भूत पिशाच्चाप्रमाणे ज्ञान आहे. मानवाचा आवाका कितीही मोठा असो त्याची पकड सरतेशेवटी अपुरी पडणार नष्टच होणार; सपूर्णत्वाचा एखादाच पैलू इतरापासून अलग करणे मानवी सामर्थ्याच्या पलीकडचे आहे. आपली शेतीपद्धती बदलल्यास आहार बदलतो, समाज बदलतो, नैतिक मूल्ये बदलतात. वैशिष्टीकरणामुळे परस्परसबध, कार्यकरण मीमासा आणि ज्ञानावर मर्यादा पडतात, म्हणून त्याचा ते धिक्कार करतात. आपल्या सवयीप्रमाणे अपेक्षित, हे पुस्तक विशिष्ट विषयाचे आणि चौकटबद्ध नाही. त्यात व्यवहार, अनुभव, प्रयोग आणि तत्त्वज्ञानही आहे. उदाहरणादाखल उत्पादनासाठी चढाओढ आणि आहाराबाबतचे त्याचे विचार बोलके आणि मनोरजक आहेत.

### स्वादिष्ट आणि सत्त्वयुक्त

गैरहगामी पिके घेणे, बिन बीयाच्या फळाची निर्मिती, शीतगृहातील साठवणूकी, निवडक तजेलदार पॉलिश केलेली फळे, धान्ये इत्यादी कृत्रिम, दिखाऊ उत्पादनाविषयी फुकूओका म्हणतात, तो यात्रिकीकरण औद्योगिकीकरण, चढाओढ आणि हव्यास याचा परिपाक आहे. अशी कृत्रिम निर्मिती नि.सत्व असते. रसायने वाढ प्रेरके इत्यादींमुळे प्रदूषित व आरोग्यास घातकच असते. अशा निर्मितीमागे लावून शेतकरी अनावश्यक कष्टात गुतून पडतो. त्याला निसर्गकलाचा आस्वाद घेण्यास उसत मिळत नाही. उत्पादने महाग व परवडेनाशी होतात. उलट

---

‘सौम्य प्रकृतीची, सभा मोर्चे याचा पिंड नसलेली ही बाई सावधगिरीनेच प्रवास करते. स्त्रियांवर किती अन्याय होतोय म्हणून छाती बडवून घेत नाही किंवा अत्याचाराच्या लाल भडक जखमा उघड्या करून मध्यमवर्गीय अलिप्तपणाला आव्हान देत नाही. हिच्या लेखनाची जातकुळी वेगळीच आहे. ती स्वतः सुशिक्षित मध्यमवर्गीय बाई आहे. आणि त्या वर्गाशी मर्यादित अनुभव विश्वाबाबतच ती चिंतन करतीय. रोजच्या आयुष्यातील एकेक पदर हलकेच उघडून ती नेमक्या मर्मस्थळी बोट ठेवतीय. दुखवण्याच्या अविर्भावाने नव्हे तर जागे करून अस्मिता फुलविण्याच्या ताकदीने. उमेद हरवून बसलेल्या मध्यमवर्गीय बाईशी संवाद साधायचा मंगलाबाईचा प्रयत्न आहे आणि त्याना ती व्हेन गवसली आहे. तारा निश्चित जुळाल्या आहेत.’

**—छाया दातार**

रविवार सकाळ—१७ मार्च ८५


# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

**किंमत २० रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**


---

नेसर्गिक शेतीचे उत्पादन ओबडधोबड, वरपागी देखणे नसते, पण त्या निर्मितीत मानवाला आकलन न झालेल्या निसर्गकलांचा स्पर्श असतो. ती स्वादिष्ट, चविष्ट, सत्त्वयुक्त आणि स्वस्तही असतात.

ऋतुमानाप्रमाणे जेव्हा जे पिकते त्यानुसार पूरक अतर्भाव करूनच माणसाने आपला आहार ठेवला पाहिजे, असे फुकूओकाचे मत आहे. त्यांचे मते भावनिक, अध्यात्मिक *स्वास्थ्य आणि नीतीमूल्यांच्या* जपणुकीसाठी अशा विशिष्ट नैसर्गिक आहाराचीच गरज असते. ऋतुमानाप्रमाणे आहारयोजनाची पुस्तकांतील माहिती, मनोरजक आणि उद्‌बोधक वाटेल. शेतीसाठी आवश्यक आणि प्रोत्साहन देणारे पुस्तक आहे. कारण ते शेती या विशिष्ट विषयाचेच नाही. म्हणूनच 'त्या एका भात तणिसातून क्रांतीकडे' हे पुस्तक मनाची पकड घेते आणि मौलिक वाटते.

फुकूओकाचे तत्त्वज्ञान कोणत्याही धर्म, पथ किंवा सघटनेशी निगडीत नाही, असे ते स्पष्ट सांगतात. मात्र ताओईवाद आणि झेनबुद्धवादाचा प्रभाव त्याच्या शब्दरचना, शिकवणूक–पद्धती, यामधून दृग्गोचर होतो. ज्युदिओ ख्रिश्चन तत्त्वज्ञान, थिऑलॉजी आणि बायबलमधील निवडक उदाहरणे देऊन मुद्दा पटविण्याची त्याची पद्धत आहे चर्चेला त्यामुळे चागली चालना मिळते.

नैसर्गिक शेतीची सुरुवात व्यक्तीच्या आध्यात्मिक स्वास्थ्यापासून प्रगत होते असा त्याचा दावा आहे. जमिनीचा ऱ्हास भरून काढण्यासाठी जमिनीच्या आवश्यक सुधारणा आणि जोपासणाऱ्याच्या मनाची शुद्धी, ही एक एकसध प्रक्रिया आहे असे ते मानतात. त्यासाठी अनुसरावयाचा जीवनक्रम आणि शेतीपद्धती ते आपल्या पुस्तकात माडतात. फुकूओकाना त्याच्या दृष्टाताचे सपूर्ण आकलन होऊन त्यांनी ते पूर्णपणे व्यवहारी जीवनात *उतरविले आहे असे सध्याच्या परिस्थितीत* समजणे अवास्तव होईल. सपूर्णत्वाची जाणीव ज्ञानाने होत नाही तर सपूर्णत्व न उकलल्यामुळे मिळणारा आनद हे खरं ज्ञान आहे असं त्याच सागणं आहे नैसर्गिक शेतीच्या मर्माचे मूळ, त्यांनी सागितलेल्या गुणविषेशात रूजलेल आहे. आनद आणि समाधान मिळविण्याच्या झटापटीत तो नष्ट होतो, याचे जेव्हा एखाद्याला आकलन होते, तेव्हाच त्याला नैसर्गिक शेतीचे मर्म समजले, असे होईल. सर्वत्र भरलेल्या मानवता आणि मानवी गूढातच नैसर्गिक शेतीच्या उगमाचे आणि अताचे मर्म आहे मानवी भल्यासाठीच मानव सर्वोत्तम काम करतो. तो वाढीव किंवा अधिक कुशल उत्पादनासाठी कधीच उत्तम काम करत नाही. वाढीव उत्पादन, कुशल उत्पादन हे औद्योगिक शेतीचे अतिम उद्दिष्ट असते. शेतीचे अतिम उद्दिष्ट धान्य पिकविणे नसून शेती आणि मानवी परिपूर्णता आहे आणि त्याला त्याच्या नैसर्गिक शेतो प्रयोगातून त्याचा मार्ग दिसतो आहे .. येथे आपण लहानशा शेती तुकड्याची काळजी घेण्यासाठी दररोज आणि प्रत्यही विपुलता आणि स्वातत्र्य लुटण्यासाठी आहोत... हीच शेतीची अभिजात परपरा असावी. तीस वर्षाच्या प्रदिर्घ तपश्चर्येनंतर आजही त्याचे तंत्र उत्क्रांत होत आहे.

दिनक्रमातून आध्यात्मिक स्वास्थ्याची आस्थापना आणि तत्राच्या व्यवहार्य आचरणाने जगतात, फायदेशीर बदल घडवून आणणे सहज शक्य नाहे, हे त्यानी सप्रमाण दाखवून दिले आहे, ही त्याची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. अलिकडेच रासायनिक खतांच्या वापरामुळे होणाऱ्या धोकादायी परिणामांची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळे शेतीच्या इतर पद्धतीबद्दल जनमानसात कुतूहल निर्माण झालेले आहे. जपानमधील प्रत्येक जण ही नवी नैसर्गिक शेती आचरण्यास आता उतावीळ झाल्याचे आढळून येते. ऑक्टोबर १९७५ मध्ये 'एका भात तणिसातून क्रांतीकडे' प्रसिद्ध झाल्यापासून नैसर्गिक शेतीचा प्रसार जपानमध्ये झपाट्याने झाला आहे दिवसेंदिवस जपानमधील अधिकाधिक क्षेत्र या नव्या नैसर्गिक शेतीपद्धतीकडे वळत आहे जपानमध्ये शेतीची क्राती घडवून आणण्यासाठी, नेतृत्व आणि वाचा फोडणारा म्हणून मासानोबू फुकूओकाचा अवतार आहे

□

## नोकरशाही : पृष्ठ १३ वरून

कार्यक्षमता शाबूत ठेवून भ्रष्टाचार राजरोस चेकने आरभला. जेव्हा अगदीच गवगवा झाला तेन्हा इदिरा गाधीनी या लोकाच्याविरुद्ध पाऊल उचललं! पण ते मनापासून नव्हतं! इदिरा गाधीनी जी अनेक कृष्णकृत्य केली त्यातल्या या भ्रष्टाचाराच्या राजमान्यतेने सर्व नोकरशाहीच आपल नीतीधैर्य गमावून बसली. पेपरातून पुरावेच्या पुरावे प्रसिद्ध झाले तरी मंत्री त्या अधिकाऱ्याविरुद्ध काहीच करीत नाही, उलट सरक्षण देतो, हे पाहिल्यावर इतर सरकारी नोकरावर अतिशय वाईट परिणाम होतो. 'खऱ्याच जग आता राहिल नाही' अस समजून तोही या चोराच्या टोळीत सामील होतो.

पण एवढ झाल तरी जगबुडी आलेली नाही. सरकारी सेवेत कानाकोपऱ्यात ढकललेले अनेक सेवक *प्रामाणिक आहेत, कार्यक्षम* आहेत. अन् मुख्य म्हणजे ते बहुसख्य आहेत. प्रामाणिक राज्यकर्ते आले तर अजूनही चित्र पालटू शकेल. केंद्रीय सत्तेत स्वच्छतेची प्रतिमा मिरवणारे राजीव गाधी हातात सूत्र घेऊन बसले आहेत. त्यानी सत्तेवर आल्यावर प्रशासन खातं हे आपल्याकडे ठेवलं आणि या प्रशासनात सुधारणा करण्यासाठी जग जग पछाडल. अनेक सचिवाच्या बदल्या केल्या. अनेकाना परत आपल्या राज्यात पाठवून दिल. कार्यक्षमता दाखवण्यासाठी गाजरही दाखवल, व काठीचे फटके दिले तरी त्याना अपेक्षित परिणाम दिसला नाही वर्षानुवर्षं गेंड्याच्या कातडीसारखी टणक असणारी ही मडळी चार दिवसात लगेच कशी बदलतील? पण तरुण पतप्रधानाना सगळ्याची घाई झालेली आहे. पण इतक्या दिवसानतर का होईना त्याना या नोकरशाहीच्या फायदे तोट्याची जाणीव झालेली दिसते. कारण सुरुवातीला नोकरशाहीबद्दल ते रागाने कडवट बोलत. ही घाण उपसली पाहिजे. सगळ बदलून टाकल पाहिजे, अस ते म्हणत असत. आता मात्र ते नोकरशाहीबद्दल जरा कौतुकाने बोलताहेत. ही नोकरशाही लोकशाहीचा कणा आहे, अस पण ते म्हणायला लागले आहेत. आणि याउपर म्हणजे काट्याने काटा काढावा, त्याप्रमाणे या नोकरशाहीत सुधारणा करण्यासाठी त्यानी सरकारी सेवेत मुरलेल्या श्री. एल. के. झा याचीच नेमणूक केली आहे. आता बोला!

□

# शब्दांचं अंगण

## व्यक्तिचित्रे

व्यक्तिचित्रे हा वाङमयप्रकार मराठीत तसा उपेक्षितच राहिलेला आहे. काही तुरळक पण लक्षात राहतील अशी पुस्तकं या प्रकारात निर्माण झाली; परंतु भरघोस निर्मिती ज्याला म्हणता येईल, असं घडलं नाही. कल्पनेत अगर वास्तवात भावलेल्या व्यक्तींचं चित्रण शब्दांच्या काही फटकाऱ्यांनी नेमकं करणं हे या प्रकाराचं गमक. एखाद्या व्यक्तीचे सगळेच पैलू एकालाच जाणवतील असं नाही. त्यामुळं आरती प्रभूंविषयीच ग. दि. माडगूळकर लिहितील, रवींद्र पिंगे लिहितील आणि पु. ल. देशपांडेही लिहितील. प्रत्येकानं साधलेला कोन वेगळा, त्यामुळं तिघांनीही केलेलं व्यक्तिचित्रण वाचावंसं वाटतं. काही उत्तुंग व्यक्तिमत्त्वांना आपण भेटलेलो नसतो, त्यांचा सहवास आपल्याला लाभलेला नसतो; पण ज्यांना हे भाग्य लाभलं, त्या भाग्याचं शब्दांच्या कथनाच्या माध्यमातून वाटेकरी व्हावं असं आपल्याला वाटत असतं. याबाबत 'शतपावली'मध्ये रवींद्र पिंगे म्हणतात, 'नक्षत्राचं आभाळात चमचमणं बघणं वेगळं आणि त्याचं पुस्तकातलं चित्रण वाचणं वेगळं; पण ज्यांनी तारा पाहिला नाही, त्यांनी निदान त्याची अशी प्रतिकृती पहायला हरकत नाही.'

व्यक्तिचित्रं लिहिण्याचा पहिला ठाशीव प्रयत्न वि. द. घाटे यांनी केला. 'काही म्हातारे आणि एक म्हातारी' हा त्यांचा व्यक्तिचित्र संग्रह. ज्यांनी हा साहित्यप्रकार समृद्ध केला, त्यांच्यात पु. ल. देशपांडे (व्यक्ती आणि वल्ली, गुण गाईन आवडी), प्रभाकर पाध्ये (आगळी माणसे), पु. भा. भावे (मुद्रा), विद्याधर पुंडलीक (आवडलेली माणसे), चिं. त्र्यं. खानोलकर (दीपमाळ), व्यंकटेश माडगूळकर (माणदेशी माणसे), रा. भि. जोशी (सोन्याचा उंबरठा) रवींद्र पिंगे (शतपावली, दिवेलामणदिवे, पश्चिमेचे पुत्र, प्रकाशणारा परिसर) या लेखकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. व्यक्तिचित्रं वाचनीय आणि आकर्षक होण्यासाठी कथनशैली जिवंत असणं आवश्यक आहे. ग. दि. माडगूळकर आणि व्यंकटेश माडगूळकर या दोघांच्याही व्यक्तिचित्रांना कथेचा बाज आहे. गदिमा हा तर माणसांमध्येच रमणारा आणि बैठकीतला माणूस. मोह पडावा अशा व्यक्ती त्यांना आयुष्यात भेटल्या आणि त्यांनी त्यांची मोहक चित्रं रंगवली 'तीळ आणि तांदूळ'मध्ये. गदिमा एकटे कधी राहिलेच नाहीत. आपल्या कवितामय शब्दकळेत गदिमांनी यशवंतराव चव्हाण, बा. भ. बोरकर, वसंतराव नाईक, पु. भा. भावे, स. गो. बर्वे, भालजी पेंढारकर अशा विविध क्षेत्रातल्या व्यक्ती साकार केल्या. काहींना मृत्यूनंतरची श्रद्धांजली आहे तर काहींची जिवंतपणीच अक्षरपूजा. गदिमांचा जीवनाच्या आदर्शांवर, निष्ठांवर विश्वास होता त्यामुळे अस्सल भारतीय तत्त्वचिंतनाचा स्पर्श या व्यक्तिचित्रांना झालेला आहे. त्या व्यक्तींची दुःखं गदिमांच्या सहृदयतेनं आणि गुण मोठेपणानं व्यक्त होतात.

पु. लं चा सहवास हाच श्रीमंत अनुभव, पण पुलंनी ज्या व्यक्तींना अमर केलं, अशा व्यक्तींना भेटल्यावाचून पुढं जाणं अशक्य. त्यांचं 'व्यक्ती आणि वल्ली' भयंकर गाजलं. त्यात वीस काल्पनिक व्यक्ती आहेत. त्यातल्या अंतू बर्वे, नारायण, हरितात्या, चितळे मास्तर या व्यक्तींनी मराठी माणसाला वेड लावलं. खरं तर अशा माणसांना काल्पनिक तरी कसं म्हणणार? यातली सगळीच माणसं आपल्या मनात दडलेली आहेत. कुठं तरी खरोखरच वेगळ्या नावांनी त्या व्यक्ती अस्तित्वात असतीलही. पु. ल. म्हणतात, मला या व्यक्तींना कडकडून भेटावंसं वाटतं! ही तुमच्या आमच्यात वास करणारी सामान्य माणसं, पु. ल. त्यांना असामान्य करून टाकतात! खरं तर कुठल्याही माणसात असणारा गुण किंवा दोष किंवा स्वाभाविक लकब, त्यालाच पु. लं. ची लेखणी व्यक्तित्त्व देते म्हणूनच माणसं नेहमीच्याच पाहण्यातली वाटतात. 'माणसं सपाट नसतात. त्यांना कोपरे-कंगोरे असतात. आत कुठं तरी वल्ली दडलेली असते. या वल्लीलाही व्यक्तित्त्व असतं.' पु. लं. च्या भाषेत त्यांच्या वल्ली अशा आहेत. 'गुण गाईन आवडी' मधल्या काही व्यक्ती त्यांना असामान्य कर्तृत्वाच्या रूपानं भेटल्या आहेत, तर काही प्रत्यक्ष भेटल्या आहेत. त्यांच्या गुणांची आरास लेखकाच्या मनात सदैव मांडलेली असतेच; पण प्रसंगाच्या निमित्तानं स्मरण कधी तीव्र होतं. ही माणसं म्हणजे देवाघरची लेणी असतात. न पाहिलेल्या व्यक्तीही आठवणींच्या रूपानं मनात सदा जिवंत असतात. राम गणेश गडकरी, बाबा आमटे, इरावती कर्वे, बापू माने, भास्करबुवा बखले, वसंतराव देशपांडे ही पु. लं. च्या आदराचा आणि प्रेमपूर्ण भक्तीचा विषय झालेली माणसे. पु. लं. च्या क्षणात हसवणाऱ्या तर क्षणात गहिवरून टाकणाऱ्या शैलीत ती आपल्याला मनमुराद, कडकडून भेटत राहतात. त्यांची भेट मनात येईल तेव्हा आपल्याला घेता येते.

गेल्या दोन तपात उदयाला आलेला हा वाङमयप्रकार प्रयत्नपूर्वक जोपासण्याचे एक संपादनकार्य बाळ सामंत यांनी केलं आहे. 'मोठी माणसे' या किर्लोस्कर प्रेसच्या प्रकाशनात, महाराष्ट्रातल्या मोठ्या माणसांबद्दल निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेली व्यक्तिचित्रं यात एकत्र केली आहेत. त्यातून गेल्या दीडशे वर्षातल्या महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक अंतरंगाचं वेधक दर्शन घडतं. प्रत्येक व्यक्तीचित्राआधी त्या व्यक्तीचा थोडक्यात पण महत्त्वाचा परिचय करून देण्यात आला आहे. न्यायमूर्ती रानडे, वि. का. राजवाडे, वि. द. घाटे, डॉ. श्री. व्यं. केतकर, र. धों. कर्वे ही नुसती नावं वाचली तरी तळपत्या महाराष्ट्राचं क्षणात झळाळतं दर्शन घडून जातं. ही व्यक्तिचित्रं त्या व्यक्तीच्या जवळच्याच नातलगांनी किंवा परिचितांनी लिहिलेली आहेत.

रा. भि. जोशी यांचं 'सोन्याचा उंबरठा' हे अश्वमेघ प्रकाशनचं अलिकडेच प्रकाशित

झालेलं पुस्तक. यातले काही लेख गौरवपर तर काही अभिनंदनपर आहेत. काहींचा निकट स्नेह रा. भि.ना लाभला तर काहींचा ऐकीव मोठेपणा त्यांना लिहिण्याची प्रेरणा देऊन गेला. यातलं बर्ट्रांड रसेलचं व्यक्तिचित्र अत्यंत वाचनीय. रसेल त्यांना वाचनातूनच समजलेला. त्यांची चिंतनगर्भ आणि विनोदी लेखनशैलीही सुपरिचित; पण त्यांच्या खाजगी जीवनात त्यांना भयंकर चढ–उतार आढळले. रसेलच्या आत्मचरित्रातून त्यांच्या लक्षात आलं की, त्यांच्या आयुष्यात भावनात्मक चढ–उतार फार आहेत. तत्त्वज्ञ, विचारवंत रसेल आणि गृहस्थ रसेल यांनी एकमेकांशी कसं जुळवून घेतलं असेल ? गृहस्थ म्हणून रसेल विषयी जे वाटलं, ते रा. भि.नी इथं लिहिलं. ते त्यांच्या कर्तृत्वाचं मूल्यमापन नाही. ते त्यांच्या माणूस म्हणून जाणवलेल्या पैलूंचं एकांग दर्शन आहे. एकांग अशासाठी म्हणायचं की, तीच व्यक्ती इतरांना वेगळी भासण्याची शक्यता आहे. कॉंग्रेसची वाघीण आणि भारताची बुलबुल सरोजिनी नायडू, आचार्य स. ज. भागवत, बा. सी. मर्ढेकर यांची आणि इतरांची व्यक्तिरेखाटनं अगदी लहान लहान आहेत. व्यक्तिचित्र हे त्या व्यक्तीचं संपूर्ण दर्शन नसतं; पण त्यातून जेवढा भाग दिसतो तेवढाही आकर्षक असतो. बा. सी. मर्ढेकरांविषयी रा. भि. जोशी म्हणतात, या विलायती पोषाखाआड अतिशय कोवळं पण सुजाण मन दडलेलं होतं. त्यांच्या व्यक्तिमत्वाभोवती एक कवच होतं. कवचावृत असं ते कोडं होतं; पण हे कवच कुठतरी ठिसूळ होतं आणि त्या ठिकाणी मर्ढेकर हा माणूस नेमका भेटायचा. 'चार्ल्स पेट्राश' हे या संग्रहातलं वेगळं व्यक्तिमत्त्व . ऑस्ट्रियात त्याचा जन्म झाला, फ्रान्समध्ये तो स्थायिक झाला; पण त्याचं भारतावर आणि विशेषतः मराठी भाषेवर नितांत प्रेम होतं. त्यानं अनेक चांगल्या मराठी कवितांचे फ्रेंचमध्ये भाषांतर केलं.

रविंद्र पिंगे यांची आगळी शब्दकला आणि अप्रतिम शैली यामुळं त्यांची चारही पुस्तकं वाचनीय ठरतात. त्यात 'दिवे–लामणदिवे' हे प्रेस्टिज प्रकाशननं प्रसिद्ध केलेलं अलिकडचं पुस्तक. सुंदर शीर्षक आणि देखणं मुखपृष्ठ यामुळं ते उचलून वाचायला लागावं तर काका कालेलकर, आरती प्रभू, धर्मानंद कोसांबी, ज्ञानेश्वर, विनोबा भावे, गदिमा, पु. शि. रेगे, यशवंत देव, पु. ल. देशपांडे, रॉय किणीकर वगैरे माणसं आपलं अंतरंग उघडून बसलेली दिसतात. रविंद्र पिंगेंनाच कळलेला एखादा गुण किंवा विशेष मोकळा करण्यासाठी आतूर झाल्यासारखी ही माणसं पण या सगळ्या व्यक्तिमधलं वेगळेपण टिपण्यापेक्षा त्यांचं माणूसपण रंगवलं आहे. यश आणि प्रसिद्धी मिळूनही आयुष्यात राहिलेली, डाचणारी उणीव, यशासाठी करावी लागलेली धडपड, माणूस म्हणून येणारे काही दोष यांचं सहज चित्रण पिंगे करतात. वर्ण्य व्यक्तीच्या आयुष्यातली लेखकाच्या साक्षीनं घडलेली एखादी घटना किंवा त्यांचं बोलणं हे त्या व्यक्तिचा अप्रकाशीत भाग अचानक उघडा करतं. पण तो म्हणजे ती व्यक्ती नसते.

तरीदेखील त्या लेखकाच्या संदर्भात ते सत्य असतं. म्हणून तो अनुभवही तेवढाच मर्यादित मानायचा. जो माणूस बाहेरून दिसतो, त्या माणसाच्या आत एक माणूस दडलेला असतो आणि तोच बाहेर काढण्याचा पिंगे यांचा प्रयत्न आहे. ते त्या व्यक्तीच्या मनाचे प्रवाह तपासतात. इतर फापट पसारा वगळून सरळ त्या व्यक्तीच्या मनात शिरतात आणि तिथून दर्शन घडवतात. ही व्यक्तिचित्रं वाचून त्या व्यक्तीविषयी नवी माहिती मिळाली असं न वाटता, माणसाकडे माणूस म्हणून बघण्याची अलिप्त, अनाग्रही वृत्ती मिळाली असं वाचकांना वाटावं अशी त्यांची अपेक्षा आहे. ते अंतःस्तरातले व्यक्तिशोध आहेत. यातील ज्या व्यक्ती सध्या हयात नाहीत ती अवतारसमाप्तीनंतरही लामणदिव्यासारखी निरंतर तेवणारी माणसं आहेत. रवींद्र पिंगे यांचंच राजहंस प्रकाशननं प्रकाशित केलेलं 'शतपावली' हे आणखी एक पुस्तक. पोटभर आनंद देणारी माणसं यात भेटतात. या पुस्तकाला ललित लेखनाचं, महाराष्ट्र शासनाचं पहिलं पारितोषिक मिळालं होतं. कुमार गंधर्व, ह. ना. आपटे, वि. स. खांडेकर, डी. जी. तेंडुलकर या सर्वांची व्यक्तिचित्रं फार सकस उतरली आहेत. 'देवासचा रहिवासी' या कुमार गंधर्वांच्या व्यक्तिचित्रणात त्यांच्या कलेचा मागोवा घेतला आहे. कलावंतांच्या आयुष्यात निराशेचे क्षण अनेक येतात, पण या निराशेच्या टप्प्यावरच अनेक वाटा फुटलेल्या असतात. त्यातून नवनिर्मिती साधते. कलावंताची निराशा कोणती असेल ? तर नवनिर्मिती करता न येणं. कुमार गंधर्वांच्या कलासक्त मनाचा सुरेख आलेख पिंगेंनी काढला आहे. वि. स. खांडेकर यांचंही चित्रण प्रभावी उतरलं आहे. एक मानवतावादी लेखक म्हणून त्यांना कोण ओळखत नाही. हा एक कोल्हापुरातला माणूस म्हणून चितारताना कोल्हापुरात प्रत्येकाला आपले वाटणारे असे खांडेकर सामोरे येतात. खांडेकरांची मूल्यं आणि त्यांचे आदर्श त्यांच्याच सुभाषितवजा शैलीत व्यक्त होतात. उदा. श्रीमतीला असा शाप आहे की तिच्यामुळे मनातली करुणा हळूहळू सुकून जाते. डी. जी. तेंडुलकर हे असंच उत्तुंग व्यक्तिमत्त्व. त्यांच्या विद्वत्तेचं आणि मोठेपणाचं दर्शन घडवायला शब्द अपुरे पडावेत. गृहलक्ष्मीला खानदानी प्रेमानं वागवावं, तसं त्यांनी लेखणीला वागवलं. लेखणीच्या चारित्र्याचा प्रश्न आला तेव्हा तडजोड केली नाही. ते पंडित नेहरूंच्या प्रेमाचा विषय होते. त्यांची इंग्रजी भाषेवर कमालीची हुकुमत होती. त्यांनी पाच हजार पानांचं गांधी चरित्र लिहिलं. त्यांची प्रूफं तपासून द्यायला खुद्द गांधीजी तयार असायचे. आत्मपर मात्र दोन ओळीही त्यांनी लिहिल्या नाहीत. ते उत्तम छायाचित्रकार होते. त्यांनी काढलेले फोटो जगभर गाजले, पण स्वतःची छबी मात्र त्यांनी उतरवून घेतली नाही.

व्यंकटेश माडगूळकर यांचं 'माणदेशी माणसं' अत्यंत अकृत्रिम अशा माणसाची भेट घडवून देतं. ज्या परिसरात माडगूळकर वाढले, वावरले तो परिसरच माणसाच्या स्नेहानं उजळून गेलेला. त्या मातीतून उगवलेली माणसं हृदयात माणुसकीचे झरे घेऊनच वावरतात. भौतिक सुखाची फार लालसा नसलेली, मातीवरच प्रेम करणारी ही माणसं किती साधीभोळी ! पण नियती त्यांना साध्या सुखापासूनही वंचित करते. त्याचं प्रतिनिधित्व करणारा 'बिटाकाका' हे काळीज हलवून टाकणारं व्यक्तिचित्र या संग्रहात आहे. पायावर उकिडवा बसणारा, मुलांवर अतिशय प्रेम करणारा हा बिटाकाका लगीन करतो, त्याला मातीच्याच

रंगाचं पण अत्यंत बाळसेदार बाळ होतं. काहीतरी विपरीत घडतं. बघता बघता ते बाळ पोखरलं जातं, त्याचा देह मुठीएवढा होतो आणि मृत्यू त्याला ताब्यात घेतो. विटाकाकावर पहाड कोसळतो. स्वप्नवत आलेला आयुष्यातला आनंदाचा काळ तसाच नाहीसाही होतो. बाकी एकलेपणा हेच त्याचं खरं आयुष्य असतं. अशी अनेक चटका लावणारी माणसं माडगूळकर रंगवतात.

इतर साहित्यनिर्मितीच्या तुलनेत व्यक्तिचित्रं मात्र मराठीत फार अल्प प्रमाणात आढळतात. अगदी शोधूनच काढावी लागतील तेव्हा सापडतील. अलिकडे तुरळक प्रयत्न होतात; पण त्यांची दखल घेतली जात नाही. प्रभाकर पाध्ये यांचं 'आगळी माणसे' हे पुस्तक लक्षात राहण्याजोगं आहे. ते अशासाठी की, पाध्ये जगभर भटकलेले. जागतिक पातळीवरच्या अनेक व्यक्तींशी त्यांचा घनिष्ट संबंध आला. त्यामुळे यूनोचे माजी सरचिटणीस ऊ थांट यांचं त्यांनी रंगवलेलं चित्र खाजगी परिचयामुळे वाचनीय ठरतं. काही व्यक्तींविषयी दोन लेख आहेत जयप्रकाश नारायणांविषयीची त्यांची भक्ती सर्वश्रुतच आहे. त्यामुळे जे. पीं. वरचे दोन्ही लेख सरस उतरले आहेत पाध्ये स्वतः एक विचारवंत होते. त्यामुळे व्यक्तिचित्र रेखाटताना ते केवळ त्या व्यक्तीतच गुंतून पडत नाहीत तर लिखाणाच्या ओघात जगाच्या राजकारणाचा संदर्भही डोकावतो, भारतीय विचारप्रवाह त्यात उपस्थित होतात आणि ते वाचन समग्र आकलनाच्या दृष्टीनं मोलाचं ठरतं. एखाद्या व्यक्तीविषयी भक्ती आहे म्हणून ते त्या व्यक्तीचं प्रेमांध चित्रण करत नाहीत, तर तिच्या कार्याचं परखड मूल्यमापन देखील करतात. पाध्येंची आपली माणसं अशी मननपूर्वक घडवलेली आहेत.

व्यक्तिचित्रांमधून परिचय नसतानादेखील आपल्या सहवासात काही काळ येणाऱ्या या व्यक्ती मनात कायम घर करून राहतात

—आशा कर्दळे

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

## एकनाथ, ज्योतिबा आणि आम्ही

'जीवनसत्व' हा विषयांश शिकून आलेला उपेंद्र आईकडं लिंबू मागत होता. 'कशाला हवंय लिंबू?' 'मला 'सी' व्हिटामिन खायचंय.' 'काही तरी बडबडू नकोस. म्हणे सी व्हिटामिन खायचंय म्हणून लिंबू दे.' फारसं न शिकलेल्या आईला लिंबामध्ये सी व्हिटामिन असतं हे कसं समजून सांगावं, कसं दाखवून द्यावं हे उपेंद्रला समजत नव्हतं. सूक्ष्मदर्शक यंत्र वापरूनसुद्धा सी व्हिटामिन दाखवून देता येणार नाही हे त्याच्या लक्षात आलं. शेवटी उपेंद्रला एक युक्ती सुचली. तो आईला म्हणाला, 'वसंतऋतु आला हे तू आंब्याच्या झाडाकडं बघून कसं ओळखतेस?' 'अरे, त्यावेळी झाडाला एक नवी पालवी फुटते, झाडाला मोहोर येतो.' 'वसंतऋतु झाडात होणाऱ्या बदलातूनच तुला दाखवावा लागतो की नाही? सी व्हिटामिनचासुद्धा परिणाम दाखविता येतो, प्रत्यक्ष सी व्हिटामिन दाखविता येत नाही.'

माय–लेकांचा हा संवाद ऐकता ऐकता माझं शिक्षकी मन दुसऱ्याच एका विचाराकडं झेपावलं. 'शिक्षणाद्वारे मूल्यांचा ( values ) विकास व्हावा असा डांगोरा मारे आम्ही पिटत असतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, माणुसकी, सहिष्णुता, स्वच्छता, प्रेम, अशी शंभरएक मूल्यांची यादी शिक्षणविषयक पुस्तकात वाचावयास मिळते. जटिल प्रश्न येतो तो असा की ही मूल्यं विद्यार्थ्यांना दाखवायची कशी? कुठं सहल काढली असता ही मूल्यं पाहायला मिळतात? कोणती पुस्तकं पाठ केली असता ही मूल्यं विद्यार्थ्यांपर्यंत पोचतात? ध्येयवादी शिक्षकांना पडणारे हे प्रश्न ध्येयवादी पालकापुढंही उभे असतात.

कोणत्याही शब्दाचा अर्थ पाहण्यासाठी शब्दकोश पाहण्याची आपली प्रथा आहे. स्वातंत्र्य, समता यांसारख्या शब्दांचे अर्थ कोशात पाहून आपल्याला समजतात का? कोशातून फक्त पर्यायी शब्द समजतात! मूल्यविषयक शब्दांचे अर्थ व्यक्तीच्या / समाजाच्या / राष्ट्राच्या वर्तनात शोधावे लगतात. ते कोशात सापडत नाहीत.

मुलांना वाढवताना व विद्यार्थ्यांचा विकास करताना संस्कार हा शब्द नेहमी ऐकायला मिळतो. 'चांगले संस्कार करणं हे पालकांचं, शिक्षकांचं कर्तव्य असं सांगितलं जातं. काही मंडळी संस्काराचे तय्यार ताईत व गंडेही विकतात. गीतापठण, रामायण–महाभारतातल्या कथांचे कथन, नीतीपाठ ध्यानधारणा, प्रतिमा पूजन–हे नेहमी सांगितले जाणारे संस्कारशिक्षणाचे गंडेदोरे. परंतु इथं थोडी गल्लत आहे. रामभक्ती करणाऱ्यानं केवळ 'राम राम' असा जप केल्यानं तो रामभक्त ठरतो का? रामासारखं न्यायप्रिय वर्तन करण्याचा, एकवचनी असण्याचा त्याचा प्रयत्नच त्याला खरा रामभक्त ठरविणार नाही का? आणि हे वर्तनसुद्धा विशिष्ट काळापुरतं पांघरलेलं कातडं असून चालणार नाही, तो त्यानं अंगीभूत केलेल्या संस्कारांचा, मूल्यांचा (सत्यवचन व न्यायप्रिय ही मूल्यं) स्वाभाविक आविष्कार असायला हवा.

मूल्यं रुजविण्यासाठी शब्द हे फार अपुरं व तोकडं माध्यम आहे. लहान वयाच्या मुलांनाही शब्द व कृती यांच्यातला फरक फार चटकन समजतो. 'परीक्षेत मुख्यमंत्र्यांना चागलेच म्हणायचं असतं' या संबंधीचं एक हास्यचित्र आपण 'शिक्षणातील ग्राहक चळवळ' या लेखात पाहिलं आहे. त्याच लेखात एक व्याख्याते जगात यशस्वी होण्यासाठी काय काय करायला पाहिजे हे सांगत आहेत. आणि एक विद्यार्थी 'या शाब्दिक बकवासावर माझा तरी विश्वास नाही' असं म्हणतो आहे असंही एक हास्यचित्र आपण पाहिलं



आहे. शब्दांद्वारे सदाचार, नीती, संस्कार, मूल्यं रूजविण्याचा प्रयत्न म्हणजे मृगजळ पिऊन तहान भागवण्याचा प्रयत्न करण्यासारखं आहे. शब्द अर्थवाही केव्हा होतात ? जेव्हा त्यांचा अर्थ वास्तवात, प्रत्यक्षात दिसतो तेव्हा. अश्व म्हणजे घोडा आणि घोडा म्हणजे अश्व असे शब्दार्थ पाठ करून आपल्याला घोडा म्हणजे काय हे समजत नाही. चित्र, प्रतिकृती किंवा प्रत्यक्ष घोडा अशा एकाहून एक सरस माध्यमांमार्फत आपल्याला घोडा म्हणजे काय हे एकदा समजलं की परत ते आपल्याला पाठ करावं लागत नाही. मूल्यांच्या रूजवणुकीबाबतही हे खरं आहे. शब्दजंजाळ व्याख्यानं, चर्चासत्रं, परिसंवाद यांच्यापेक्षा वर्तनाचे आदर्श अधिक उपयोगी पडतात. एखाद्या दगडाला रंगीबेरंगी चकचकीत आवरण लावलं तर तो आकर्षक दिसतो. हाती घ्यावासा वाटतो. पण तो हाती घेतला की त्याचे सत्य स्वरूप लक्षात येतं. केवळ वाचेद्वारे व्यक्त होणारी मूल्यं ही अशीच वेगडी ठरतात. व्यक्ती सहवासात आली की तिच्या वर्तनातून तिचं मूल्यविहीन रूप सहज लक्षात येतं.

कोणत्याही शाळेत तुम्ही गेलात तर अनेक ठिकाणी मोठमोठ्या अक्षरात कागदावर लिहिलेले सुविचार झळकत असलेले तुम्हास दिसतात.काही मुख्याध्यापकांना मी विचारलं, 'हे कशासाठी लावलंय ?' तत्क्षणी उत्तर आलं, 'विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होण्यासाठी ' 'या सर्व सुविचारांचा अर्थ त्यांना समजलाय का ? तो अर्थ त्यांच्या मनात उतरेल आणि त्यांच्या वागणुकीतून तो इतरांना दिसेल अशासाठी काही प्रसंगांची योजना तुम्ही सातत्यानं करता का ?' 'अहो, लीलाताई, सुविचारदर्शक वचनं लिहिणं हाच आमचा उपक्रम. त्याचा अर्थ आणि कुठं सांगत बसायचा ?' सुन्नपणं हा मूल्यविषयक शालेय व्यवहार मी अनुभवला.

शाळाशाळांत श्रमशिबिरं घेतली जातात. सर्वसाधारणपणे श्रमशिबिरात विद्यार्थ्यांनी श्रम करायचे व शिकविणाऱ्यांनी पाठीमागं हात बांधून विद्यार्थ्यांवर देखरेख करायची. आणि 'मातीशी मतीचं नातं जुळणं कसं आवश्यक आहे ' हे व्याख्यानातून सांगायचं ! आपण जे इतरांना करायला सांगतो ते आपण केलंच पाहिजे असं वातावरणच मुळी आपल्या सामाजिक पर्यावरणात नाही. स्वतःला वगळून इतरांनी काय करावं याबद्दल बोलणं म्हणजे विद्वत्ता, नेतृत्व ! इस्रायलच्या पंतप्रधान श्रीमती गोल्डा मायर दुचाकीवरून ऑफिसात जात. एक दिवस नव्हे नेहमीच. प्रशासनातला अवाजवी भपका कमी करणं त्यांना सुलभ झालं. कशामुळं ? 'स्वार्थात सेवा गरियसी ' हे मूल्य त्यांनी अंगीकृत केलं म्हणून. महात्मा गांधींच्या 'सत्याच्या प्रयोगा'त अशी अनेक उदाहरणं आपल्याला वाचायला मिळतात की ज्यातून आपल्या हे लक्षात येतं की अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह स्वदेशी–अशी मूल्यं लहान–मोठ्या व्यक्तींनी केवळ सांगितली नाहीत; ती त्यांनी आपल्या स्वतःच्या वर्तनातून साकार केली. हजारो माणसं त्यांच्या शब्दांवरहुकूम वागली ती त्यांच्या भाषाप्रभुत्वामुळं नव्हे; त्यांच्या वर्तनाच्या तेजस्वीपणामुळं.

शाळांत 'लोकशाही 'च्या मूल्यांबाबत बरंच बोललं जातं. शाळांच्या व्यवहारात लोकशाही अंगीकृत झाली आहे का ? The School that I' d like* नावाच्या एका पुस्तकात इंग्लंडमधल्या मुलांनी आपल्याला कोणत्या प्रकारची शाळा आवडेल याबद्दल लिहिलं आहे. इक तेरा वर्षांचा मुलगा त्या पुस्तकात सांगतो. 'The pupils would also be treated as individuals and not as a flock of sheep all with the same purpose in life. ' पंधरा वर्षांची एक मुलगी म्हणते 'Respect for the pupils is just as important as the respect for the teacher, because after a young person's opinion has been disregarded three or four times the person may never express an opinion again. ' 'आम्हालाही काही सांगायचंय** या पुस्तिकेत इयत्ता आठवीच्या मुलांनी मुख्याध्यापकांसंबंधी अपेक्षा सांगताना म्हटलं आहे 'मुख्याध्यापकांनी स्वतः शिकवावं. ' त्याच पुस्तिकेत शिक्षकां-

संबंधी लिहिताना (१) 'तासाला वेळेवर यावं.' (२) 'नि.स्वार्थी असाव.' (३) 'शाळेत खाऊ नये.' (४) 'वर्गात झोपू नये' (४) 'तासाच्या वेळी कामाला बोलवू नये.' (५) 'एकाच मुलाला शिकवू नये'—अशा किती तरी अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. 'पान खाऊ नये' असं मांगणाऱ्याच्या तोंडात सतत पानाचा तोबरा असला तर सागण्याचा परिणाम किती होईल ? शाळाशाळात व घराघरात विद्यार्थी आणि मुलं शिक्षकांना आणि पालकांना 'मग तुम्ही तस का करता?' असं म्हणताना आपण ऐकतो. आईला न सागता तिच्या पाकिटातून पैसे घेतले म्हणून मार खाणारी नीता आईला म्हणते, 'मग, तू नव्हते का त्या दिवशी घेतलेस बाबांच्या खिशातून पैसे ?' 'माझं खरं वय बारा आहे पण अर्ध्या तिकिटाचे पैसे देता यावेत म्हणून बाबा मी अकरा वर्षांची असल्याची सागतात' असं सांगणारी मुलगी जणू सागत असते की आपल्या फायद्यासाठी खर नाही बोललं तरी चालतं ! असे किती तरी दाखले तुम्हाला व मला दररोजच्या आयुष्यात सतत दिसतात.

लक्षात ठेवायचा मुद्दा असा की मूल्य-शिक्षण किंवा सस्कार म्हणजे काही एखादी वस्तू नव्हे की जी देता–घेता येते. मूल्य-शिक्षण म्हणजे माहितीही नव्हे की जी वाचता लिहिता येते व पाठ करून आत्मसात होते. सकस आहाराप्रमाणं मूल्यशिक्षणाची पाकिट तयार करता येणार नाहीत की जी मुलाना देऊन पालकाना/शिक्षकाना निःश्वास सोडता येईल. शारीरिक शिक्षणाच्या कवायतीप्रमाण ती कवायतही नव्हे. तुम्ही म्हणाल, 'हे चालवलयत काय ? न इदम् न इदम्.' मूल्य शिक्षणाचा विषयच असा आहे. मूल्य शिक्षणा-साठी शब्द, त्याचे अर्थ व कृती असे तीन पदर एकाच वेळी उचलून धरावे लागतात. मूल्यशिक्षण झालं आहे की नाही याची प्रचीती व्यक्तीच्या उक्तीपेक्षा, तिच्या पाडित्यापेक्षा तिच्या कृतीद्वाराच मिळते. 'सर्वांनी सुखी असावं' ही प्रार्थना नुसती म्हणून अथवा तिचा अर्थ सागता येऊन काय कामाचं ? सर्वांच्यापैकी काहीना तरी सुखी करण्याची धडपड दिसेल तो मूल्य शिक्षणाचा परिणाम, तो संस्कार.

मूल्यशिक्षण हे कृतीतून पाझरतं. या प्रकारच्या शिक्षणाचे प्रयत्न करणारे जे पालक, शिक्षक आहेत त्यांनी हे लक्षात घ्यावयास हव की जे आपण आचरत नाही असा कोणताही संस्कार करण्यास आपण असमर्थ ठरू. झाडाच्या मुळानी शोषिलेल्या पाण्याचे तेज जसे त्यांच्या फांद्यावरील पानांच्या टवटवीतपणात दिसतं तसं अंगीभूत केलेल्या मूल्याचं, सस्काराचे तेज व्यक्तीच्या दैनंदिन वर्तनात दिसत. मूल्यशिक्षणासाठी प्रयत्न करावे लागत असले तरी मूल्यशिक्ष-णाची प्रचीती मात्र सहज येते, ती प्रयत्न-पूर्वक द्यावी लागत नाही.

या संदर्भात ऐकलेल्या दोन गोष्टी सागते. एक भारतीय माणूस जपानमध्ये गेला होता. त्यानं आपल्याकडच नफ्या–तोट्याचे दुधाच गणित शाळेतल्या मुलाना घातल व विचा-रल, 'गवळ्याला नफा किती झाला ?' एका सेकंदात उत्तर देण्यासाठी मुलांनी हात वर केले. या मुलाला उत्तर विचारलं, त्या मुलाला उत्तर विचारलं. सगळ्यांचच उत्तर एकच. 'फाशीची शिक्षा' दुसरं उदाहरण रशियातल आहे. रशियाला गेलेल्या सास्कृ-तिक शिक्षण मडळातल्या एका विदुषीन मुलींना विचारलं. 'तुम्ही कोण होणार ?' 'अवकाश यांत्रिक, ट्रॅक्टर ड्रायव्हर, केमिकल इंजिनिअर'— अशी निरनिराळी उत्तरं आली एकाही मुलीनं 'मी गृहिणी होणार' असं म्हटल नाही. त्याबद्दल मुलींना विचारता त्या मुली म्हणाल्या, 'एक व्यक्ती म्हणून आम्हाला कोण व्हावंसं वाटतं ते आम्ही सांगितलं. गृहिणी तर आम्ही होणारच आहोत.' स्त्रीही एक माणूस आहे, एक व्यक्ती आहे हे मूल्य त्या मुलींच्या अंतरंगात झिरपल आहे. दुधामध्ये पाणी मिसळण अनीतीमान आहे हे जपानमधल्या मुलाच्या हृदयात रूजल आहे. गणित विषयातील या उदाहरणाच्या आशयाचा मूल्यशिक्षणाशी काय सबंध ? उक्ती व कृती यामधील तटबंदीच्या भिंतीसारखा व्यवहार त्या जपानी मुलानी पाहिलेला नाही. मूल्यशिक्षण व सामाजिक पर्यावरण, संस्कार आणि जीवन-व्यवहार यांचा संबंध अतूट आहे.

जॉर्ज वॉशिग्टनची एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. अमेरिकन स्वातंत्र्य-युद्धाच्या वेळी जॉर्ज वॉशिंग्टन सेनाप्रमुख बनतो. सैन्याच्या तळावर एके दिवशी घोड्यावरून फिरता फिरता त्या तळाच्या एका टोकाला एक नवी इमारत बांधली जात होती आणि एक अतिशय अवजड अशी लोखंडी तुळई वर उचलण्यासाठी सहा सैनिकाना सैन्यातला कॅप्टन 'हा, चला उचला. आणखी वर. आणखी वर' असं ओरडून सागत होता. कॅप्टन जवळ थांबून जॉर्ज वॉशिंग्टन म्हणाले, 'तुळई फार अवजड दिसते. तुम्ही का नाही मदत करत त्याना ?' कॅप्टन म्हणाला, 'ते सैनिकांचं काम आहे. मी कॅप्टन आहे.' 'असं होय ! मला माहीतच नव्हतं' असं म्हणून जॉर्ज वॉशिंग्टननं ती तुळई वर उचलायला मदत केली व नंतर ते कॅप्टनला म्हणाले, 'पुन्हा एखाद्या वेळी तुमच्याकडं सैनिक कमी आणि काम अवजड असलं तर मला बोलवा. मी आनंदानं येईन. अमेरिकन सैन्याचा मी प्रमुख आहे.' श्रमप्रतिष्ठेच व समतेच तत्त्व जॉर्ज वॉशिंग्टननं आपल्या उदाहरणानं कॅप्टनपुढं साकार केलं. कामामुळं माणसाची उच्चनिचता ठरत नाही. तू कॅप्टन असलास तरी तुळई उचलायला हात लावण्यास काहीच हरकत नाही असं व्याख्यान वॉशिंग्टननं दिलं नाही. या दोन गोष्टींतून मूल्यशिक्षणासाठी काय करायला हवं हे चागलं उमजतं.

द्वितीय पुरुषी व्यवहारानं मूल्यशिक्षणाचा प्रश्न कधीच सुटणार नाही. केंद्र सरकार, राज्य सरकार, विद्यापीठ, महाविद्यालयं, शाळा यांनी मूल्यशिक्षणाबाबत काय केलं असता ती काय करेल अशी भाषा न वाप-रता आपल्याला जे इष्ट वाटतं आहे, जो संस्कार माणसाला सत्, शिव, सौंदर्याकडं नेणार आहे तो करण्याला आपापल्या ठिकाणी सुरुवात करायला हवी. एकनाथांनी अत्यजाच्या पोराला कवटाळलं त्यावेळी अस्पृश्यता निवारण कायदा पास झालेला नव्हता ! महात्मा ज्योतिबा फुल्यानी स्त्रिया-साठी शाळा उघडली त्यावेळी स्त्रीमुक्तीचे नारे दिले जात नव्हते ! तुम्ही म्हणाल कुठं एकनाथ, कुठं ज्योतिबा आणि कुठं आम्ही ! पण ज्योतिबानतर महात्मा झाले व एकनाथांना नतर सतत्व प्राप्त झालं. तुमच्या-माझ्या अणुरेणूतसुद्धा एकनाथ व ज्योतिबा आहेतच. समुद्राच्या एक बिंदूची चव आणि त्याच समुद्रातल्या बादलीभर पाण्याची चव वेगळी का असणार ? आपल्यातील प्राणीत्व हटवून मानवता जपण्याचा प्रयत्न कसो-शीनं करण म्हणजेच मूल्यशिक्षणाचा प्रसार करण. ☐

---

* 'आम्हालाही काही सांगायचं'— विस्तार सेवा विभाग, श्री. म ता. अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर व कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शाळा मुख्या-ध्यापक सघ प्रकाशन, १९७९. ३ रु.,

** The School that I'd like. Edited by Edward Blishen. Penguin Edition, 1969.

रंगभूमी

# उडुनि जा पाखरा

## एक आव्हानात्मक नाटक

वि. भा. देशपांडे

गेल्या दीड–दोन महिन्यात जी नाटके मराठी रंगभूमीवर आली त्यामध्ये जी काही थोडी चांगली म्हणून हाताशी लागली त्यात 'उडुनी जा पाखरा' हे एक नाटक आहे या नाटकाचे रूपातरकार आहेत वसंत कामत. नाटकाच्या नावावरून हे नाटक स्वतंत्र की भाषांतरीत–रूपांतरीत याचा अंदाज येत नाही. पण नाटक पाहायला आरंभ झाला की, काही वेळातच त्याचा अंदाज यायला लागतो. तर हे नाटक 'वन फ्ल्यू ओव्हर द ककूज नेस्ट' या कादंबरी आणि त्यावर झालेल्या चित्रपटाच्या मुख्य गाभ्यावर आधारीत आहे. वसंत कामत हे थोडयाच नाटयकृती निर्माण करणारे पण बिनीचे नाटककार आहेत. या आधी त्यानी लिहिलेले 'हॅण्डस् अप' आपल्या परिचयाचे आहे. त्यांच्या नाटयनिवडीतील वेगळया विषयाचा आणि आविष्करणाचा किंबहुना एकूणच आगळया अभिरूचीचा प्रत्यय आपल्याला येतो. तसा तो याही नाटकात येईल या आधी 'वनफ्लू' वर आधारीत औरंगाबादच्या कुमार देशमुखने 'आकाशपक्षी' नामक नाटक राज्यस्पर्धेमध्ये केलेले स्मरते. वास्तविक 'उडुनी जा पाखरा' हे सतीश दुभाषी असताना त्याच्यासाठी लिहिले गेलेले नाटक. या नाटकावर त्याचा किती जीव होता हे संबधितांना माहीत आहे. ( सतीशने हे नाटक आवर्जून माझ्याकडे वाचावयास दिले होते त्यावर आमचे सविस्तर बोलणेही झाले होते ) विद्यमान संहिता ही मुळात बरेच बदल होऊन आली आहे. अनेक कलावंत–दिग्दर्शकानी ती रंगमचावर प्रयोगित करण्याचा यत्न केला, पण अनेक कारणानी ते राहून गेले शेवटी आता 'सुयोग' या नाटयसस्थेतर्फे दिग्द. दिलीप कोल्हटकरने रंगमचावर आणले.

हे नाटक मनोरुग्णांच्या भावदर्शनावर आधारीत आहे. एका खाजगी वेडयांच्या इस्पितळात निरनिराळया प्रकारच्या वेडानी पछाडलेली माणसे एकत्रित आलेली आहेत. *त्यांच्यावर यथायोग्य उपाय चालू आहेत.* अशा अवस्थेत अजित नामक एक तरुण काहीसे वेडाचे सोग घेऊन उपचार करून घेण्यासाठी येतो. त्याच्या येण्याने तिथले सारे वातावरण उध्वस्त होऊन जाते, ती कहाणी नाटकभर खेळवली आहे. यामध्ये बलदड असलेला आरभी मूक–बधीर असणारा आणि नंतर अर्थपूर्ण बोलणारा बडा आहे, वामन-मूर्ती असणारा वामन वाटाणे आहे, लहानपणापासून आईची भीती मनात बाळगणारा बाबी आहे, आपल्याच नादात रमणारा पत्रावली आहे तर सतत विठ्ठल विठ्ठल गजरात रंगून जाणारे जोशीबुवा आहेत. कुठेही बॉंब उडून सारे उध्वस्त होईल अशा भीतीत चूर होणारा चड्ढा आणि वेडाची बतावणी करणारा अजित असा हा वेडयाचा मेळ आहे. यांच्यावर देखरेखीसाठी दोन नर्स आहेत, डॉक्टर आणि वॉर्डबॉय इत्यादी मंडळी आहेत.

*ही सारी मनोरुग्ण आहेत.* सर्वच काही ठार वेडे नाहीत. यातले अनेकजण तिथल्या मुख्य नर्सच्या करडया शिस्तीमुळे दबून आहेत. त्याना या इस्पितळाच्या वातावरणात बदल हवाय, मोकळी हवा खाण्याची इच्छा आहे, पण *ती मिळवण्यासाठी* प्रतिकार करण्याची, प्रसंगी बड करण्याची ताकद नाही. किंवा तसे करण्याची ताकद आपल्यात उरली आहे अथवा नाही याची खात्री नाही. ती ताकद निर्माण करण्याचे काम अजित करतो *नर्स आणि तिथल्या सर्व यत्रणेशी प्रखर झुज* देण्याची तयारी करतो. त्यातून या सर्व मंडळीमध्ये नवे चैतन्य निर्माण होते. हुकूमशाही यत्रणा आणि तिला दिलेले आव्हान यातून नाटक आकार घेते, अधिक गडद होते. *या आव्हानाला त्यातून येणाऱ्या गडद*पणाला करूणेची किनार आहे. जो अजित हे आव्हान निर्माण करून सर्वशक्तिनिशी उभा ठाकतो तोच व्यवस्थेचा ( तिथल्या यत्रणेचा ) बळी होतो. त्याच्यावर अघोरी उपाय केले जातात. तो विकल होतो. ज्याच्या कर्तृत्वाला आकाशाची भरारीच श्रेयस्कर आहे त्याला एका पिंजऱ्यात कोडले जाते. त्याच वेळी दुसराच कोणी पिंजऱ्याबाहेर जातो. हा सारा नियतीचा खेळ आपल्याला अस्वस्थ करणारा ठरतो.

या नाटकाच्या अन्वयार्थाचे स्तर अनेकविध आहेत. आपण जसजसा या नाटकाच्या विषयाचा, आशयाचा अधिकाधिक खोलवर विचार करू लागतो, तसतसा अधिक अर्थ भावतो. त्यातच बडा जेव्हा अनेक दिवसानी बोलायला लागतो आणि अर्थपूर्ण कविता म्हणून कोडे घालतो तेव्हा तर आपणही पुन्हा विचाराना चालना देत राहतो. तो म्हणतो– 'यक गातो असा, अन् यक गातो तसा, कावळयाच्या गळयात मग पंचम कसा ?' ही विरोधात्मक जाणीव माणसाच्या आयुष्याचा वेध घ्यायला कारणी होते आणि तीच त्याचा जीव घ्यायलाही कारणी होते

असे हे काव्यात्म, अंतर्मुख करणारे नाटक प्रयोगरूपाने रगमचावर आणायचे म्हणजे अनेक गोष्टीची आव्हाने आणि आवाहने होती. दिग्दर्शक दिलीप कोल्हटकरने दिग्दर्शनाचे आव्हान यथायोग्यपणे पेललेले आहे. आताच्या तरुण पिढीतील व्यावसायिक रंगभूमीवरचे जे दिग्दर्शक आहेत त्यामध्ये तो सर्वात कल्पक आणि गुणवान दिग्दर्शक आहे त्याने अलिकडच्या काही वर्षांत बाळ कोल्हटकराची नाटके दिग्दर्शित केली त्याचबरोबर मृत्युंजय, राजसन्यास, मोरूची मावशी, बजरगबलीचा बकरा अशी अगदी वेगळया प्रकृतीची–प्रवृत्तीची नाटके दिग्दर्शित केली आहेत. त्यामुळे 'उडुनी जा' हे नाटक *त्याच्याकडे आले तर नवल नाही त्याने* नाटक दिग्दर्शित करताना त्यातल्या प्रत्येक व्यक्तिरेखेला एक स्वतत्र अस्तित्व दिलेले होते. प्रत्येकाची लकब किंवा एकूण शारीर हालचाल त्याच्या वेडाला अनुरूप अशी दिलेली होती त्या हालचालीना काही वेळेला सामूहिक रूपही होते. सहितेतले भावताण नेमके हेरून त्याचा यथायोग्य परिणाम होईल याची काळजी घेतली होती. सपूर्ण नाटयविषयाला पूरक ठरेल असे नेपथ्य आणि पार्श्वसंगीत यांचा वापरही दिग्दर्शनाला साजेलसा होता.

या नाटकामध्ये व्यक्तिरेखाची सख्या आठ–दहा असली तरी त्यामध्ये अजित आणि नर्स याच दोन मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहेत नर्सच्या भूमिकेत नयनतारा होती. तिने तिच्या नेहमीच्या बाजापेक्षा वेगळया थाटाची भूमिका स्वीकारली हे उत्तम झाले. ती नर्स म्हणून दिसली चागली फक्त तिच्या आवाजाची वरची पट्टी काही वेळेला नाटयपरिणाम उणावणारी ठरत होती. इतका आवाज चढवण्याची गरज नव्हती. अजितच्या भूमिकेत उदय टिकेकर होता. आताच्या नवनायकापैकी उदय हा एक आहे. त्याची भूमिकेची समज, अभिनयाची पद्धती आणि त्यासाठी आवश्यक असणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व ह्या साऱ्याचा मेळ जमल्याने त्याचा प्रभाव सर्वाधिक पडला. बराच काळ त्याचा अभिनय ध्यानात राहील, पण त्याची भूमिका पाहात असताना असे वाटून गेले की यासाठी इतक्या देखण्या व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता होती का ? त्याचे देखणेपण काही वेळा लक्ष वेधणारे ठरले. तशी गरज नव्हती. दीपक शिर्के, अच्युत देशिंगकर, रवींद्र बेर्डे, मस्तकार

आदी कलाकारानी केलेल्या भूमिकाही तितक्याच महत्त्वाच्या होत्या.

अशी वेगळ्या विषयावरची, चाकोरीबाह्य कथानक व्यक्तिरेखा असलेली नाटके व्यवसायाच्या दृष्टीने यशस्वी होतीलच असे नाही. पण निदान अशा नाटकाचे किमान चाळीस–पन्नास प्रयोग व्हायला हवेत याचाच अर्थ असे नाटक अनेकानी आवर्जून पाहायला हवं. ☐

चित्रपट

## पहिलाच पण स्तुत्य प्रयत्न

# धूमधडाका

मराठी चित्रपटांना हल्ली बरे दिवस आलेले दिसतात. त्याच त्या तमाशा, पाटील नाहीतर कौटुंबिक जिव्हाळ्याच्या हमखास रडवणाऱ्या वगैरे चित्रपटाच्या चाकोरीतून हळूहळू का होईना पण निश्चितपणे मराठी चित्रपटसृष्टी बाहेर पडायला लागली आहे. दुसरी एक स्वागतार्ह गोष्ट म्हणजे तरुण दिग्दर्शक, निर्मात्यांची वाढती संख्या. गेल्या एक–दोन वर्षातले चित्रपट पाहिले तर या तरुणांनी मराठी चित्रपटसृष्टीला एक वेगळा चेहरा देण्याचा प्रयत्न नक्कीच केलेला दिसतो अशाच एका तरुण निर्मात्या-दिग्दर्शकाचा-महेश कोठारेचा पहिलाच पण स्तुत्य प्रयत्न म्हणजे ' धूमधडाका '.

काही वर्षांपूर्वी ' प्यार किये जा ' हा हिंदी चित्रपट लागून गेला होता. या विनोदी चित्रपटात किशोरकुमार, मेहमूद, या दुकलीनं शशीकपूर, मुमताज, कल्पना यांना साथीला घेऊन धमाल उडवून दिली होती. या चित्रपटाची सहीसही नक्कल म्हणजे ' धूमधडाका '. पण ही नक्कल असली तरी ती खूपच चांगली उतरली आहे. त्यामुळं ' धूमधडाका ' प्रेक्षणीय झाला आहे.

महेश (महेश कोठारे) ची गाठ अपघातानेच एका मुलीशी (निवेदिता) पडते. आणि त्यांच्यात थोडी बोलाचाली होते. ती एका श्रीमंत पण कवडीचुंबक माणसाची (शरद तळवलकर) मुलगी असते. योगायोगानं महेश त्याच्याकडेच नोकरी मागायला जातो. पण आपल्या मुलीला यानं त्रास दिला हे कळताच त्याची नोकरी काढून घेतली जाते. चिडलेला महेश त्यांना धडा शिकवायचा ठरवतो.

त्याच्या योजनेप्रमाणे निवेदिता खरोखरच त्याच्या प्रेमात पडते. पण तिचे वडील महेशला जावई म्हणून स्वीकारणे शक्य नसते. म्हणून मग महेश आपल्या जिवलग मित्राला (अशोक सराफ) याला मदत करायची विनती करतो. या मित्राचं निवेदिताच्या मोठ्या बहिणीवर, सीमावर (सुरेखा राणे) प्रेम असतं. त्यामुळे तो ही कामगिरी खुषीनं मान्य करतो.

महेशचे वडील म्हणून हा मित्र या दोघा बहिणींच्या घरात प्रवेश मिळवतो आणि आपल्या खोट्या श्रीमंतीचे प्रदर्शन करून त्यांच्या वडिलाना भारून टाकतो. महेशच आपल्याशी पटत नसल्यानं तो आपल्याजवळ रहात नसल्याचं सांगायला तो विसरत नाहीच. त्यांच्या श्रीमंतीन भारून गेलेले निवेदिताचे वडील महेशला आपला जावई करायचं स्वप्न पाहू लागतात.

त्याचा सिनेमाचं वेड असलेला मुलगा (लक्ष्मीकांत बेर्डे) हे चित्रपटातील आणखी एक पात्र चित्रपटाशिवाय दुसरं काहीही न सुचणाऱ्या या तरुणाला लोकेशनच्या शोधात असतानाच आपल्या चित्रपटाची नायिका (प्रेमाकिरण) भेटते आणि तो तिच्या प्रेमात पडतो.

दरम्यान महेश आणि त्याच्या मित्राचे खरे वडील येऊन दाखल होतात. आणि एकच गोंधळ उडतो तिघहीजण पळून लग्न करायचा प्रयत्न करतात आणि आणखीनच धमाल निर्माण होते.

मुळातली ही कथाच हवे तेवढे हसे वसूल करणारी आहे. खुमासदार पटकथेन आणि नीटस दिग्दर्शनान ती अधिकच खुलली आहे. ' प्यार किये जा ' ची ही नक्कल असली तरी ती सहीसही केल्यानं एकप्रकारे फायदाच झाला आहे.

' प्यार किये जा ' मधे मेहमूद आपल्या वडिलाना (ओमप्रकाश) आपल्या चित्रपटाची कथा समजावून सागतो तो सीन इथंही आहेच. धमाल उडवणारा हा प्रसंग मराठी आवृत्तीतही लक्ष्मीकांत बेर्डे आणि शरद तळवलकरानी चांगला रंगवला आहे. तळवलकरांनी तर आपल्या मुद्राभिनयानं बहार उडवली आहे. असाच विनोद निर्माण होतो तो महेशच्या संस्कृत शिक्षक असलेल्या वडिलांच्या शुद्ध बोलण्यामुळे.

चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणजे अण्णासाहेब देऊळगावकरांची पटकथा. नेहमी कौटुंबिक कथांच्या साच्यात रहाणाऱ्या देऊळगावकरानी इथं केवळ विनोदी पटकथाच लिहिलेली नाही तर कौटुंबिक कथावर मनसोक्त ताशेरेही मारले आहेत !

महेश कोठारेचा दिग्दर्शनाचा हा पहिलाच प्रयत्न. पण तो कुठही नवखा वाटत नाही. चित्रपटाची जात ओळखून त्यान वेग चागला ठेवला आहे. अमर, अकबर, ॲंथनीच सोंगही चागलं जमलं आहे. फक्त शेवटी स्मगलर वगैरे उगीचच घुसडला आहे. अर्थात तो भाग फार काळ रहात नाही हेही खरच

महेश कोठारेचं आणखी एक यश म्हणजे पात्राची अचूक निवड. अशोक सराफ आणि लक्ष्मीकात बेर्डे आपापल्या भूमिकात अतिशय फिट्ट बसले आहेत. महेशन त्याना वावही चागला दिला आहे. लक्ष्मीकातला अशोक सराफपेक्षा अधिक गमतीदार सवाद लाभले आहेत. पण दोघानीही आपल्या भूमिका तुफान रंगवल्या आहेत. संवादफेकीच टायमिंग त्याना सुरेख जमलं असल्याचा प्रत्यय वारवार येतो. स्वत: महेश कोठारेन फारशा विनोद निर्मितीची जबाबदारी स्वत.वर घेतलेली नाही. आपल्या भूमिकेत तो ठीक आहे.

बेर्डे–सराफाच्याबरोबर विनोद निर्मितीची जबाबदारी शरद तळवलकरांनी उचलली आहे. खूप दिवसानी चित्रपटात एवढी मोठी भूमिका त्याच्या वाट्याला आली आहे. कवडीचुंबक श्रीमताच्या भूमिकेत ते छान रंग भरतात.

चित्रपटाच्या तिन्ही नायिकांना नायकाच्या बरोबर जोड्या जुळवण्याखेरीज फारसं काम नाही. निवेदिताला नेहमीपेक्षा वेगळी, हलकी फुलकी भूमिका मिळालीय हेच तिच्या भूमिकेचं वैशिष्ट्य

अनिल–अरुण याचं संगीत चित्रपटाला साजेसं आहे.

थोडक्यात दिग्दर्शकाचा पहिलाच प्रयत्न असला तरी भट्टी जमलेला चित्रपट म्हणून ' धूमधडाका ' उल्लेख करावा लागेल.

— सीमा कुलकर्णी

सांस्कृतिक नागपूर

# शहारे आणणाऱ्या आठवणी

नागपूरच्या सांस्कृतिक विश्वात येथल्या बंगाली लोकांनी बरीच संपन्नता आणली आहे. नाटकाच्या क्षेत्रात तर काही विचारूच नका. मराठी आणि बंगाली नाटयक्षेत्रात नागपूरला जेव्हढी देवघेव होते तेव्हढी अन्य कोठेही होत नसेल. त्यापैकी एक बंगाली तरुण रसिक माणूस डी. पी. गांगुली याने तर नागपुरातल्या काही मराठी आणि बंगाली रसिक व्यक्तींचे सहकार्य घेऊन 'सिने मॉंटेज' नावाची संस्था स्थापन केली आणि तिच्यामार्फत एक्सप्रिमेंटल आणि कलेच्या दृष्टीने उच्च प्रकारच्या सिने–फिल्म्स दाखविण्याचा सपाटाच चालविला. हळूहळू त्यात त्याने जगातील निरनिराळ्या देशातील सुंदर फिल्म्सचा अंतर्भाव केला आणि त्यामुळे 'सिने मॉंटेज 'ने दाखविलेल्या फिल्म्स् पाहणे हा एक मोठा आनंदाचा सोहळा होऊन बसला.

ह्या 'सिने–मॉंटेज'ने तपन बोस आणि सुहासिनी मुळे यांनी भोपाळ–शोकांतिकेवर तयार केलेली एक शॉर्ट फिल्म पहाण्याला नागपुरातल्या सर्वांना मोठे आवर्जून बोलाविले. तपन बोस ह्यावेळी स्वतः उपस्थित होते. फिल्म दोन तासांची होती परंतु तो एक मनाला पीळ पाडणारा आणि सुन्न करणारा विलक्षण अनुभव होता. फिल्मला प्रारंभ करण्यापूर्वी तपन बोसने काही मुद्दे उपस्थित केले. त्यापैकी आपण गॅस–पिडीत लोकांना मोबदला देण्यामध्ये जास्त आस्था घेत आहोत. परंतु ज्या गुन्हेगारांनी हा गुन्हा केला त्यांच्या शिक्षेचे काय ? गॅसमध्ये साईनाईडसारखा काही प्रकार होता काय ? आणि मुख्य म्हणजे अजनही गॅसपिडीत लोकांना योग्य ती Medical Treatment मिळत नाही अशी त्यांनी तक्रार केली. जे जे गॅस–पिडीत आहेत त्यांच्यावर दूरगामी परिणाम झालेले आहेत. त्या प्रदेशात टायफाईड आणि कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. विषारी वायुचा गर्भवती स्त्रियांवर आणि लहान मुलांवर विपरित परिणाम झालेला आहे. ह्याकडे कोण लक्ष देणार ?

दोन तासांच्या ह्या फिल्ममध्ये भोपाळमधील विषारी वायूने ग्रस्त झालेले रोगी अमेरिकन मल्टी–नॅशनल औषधी कंपन्यांसमोर, भारत सरकारसमोर, मध्यप्रदेश-सरकारसमोर कसे असहाय्य झालेले आहेत याचे विदारक चित्रण करण्यात आलेले आहे. सरकार तिकडे अमेरिकेत नुकसानभरपाईची कायदेशीर लढाई लढत आहे तर इकडे विषारी वायूने ग्रस्त झालेली झोपडयाझोपडयातील असहाय्य माणसे, हमिदिया हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी दिलेल्या सतरा प्रकारच्या कॅप्सूलस समोर ठेवून शून्य नजरेने पहात बसलेली आहेत. कारण त्यांच्या तब्येती दिवसेंदिवस ढासळत आहेत, त्यांना काम करण्याचा उत्साह नाही, त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग आलेला आहे. सरकारने मात्र आपली सहाय्यता शिबिरे बंद केलेली आहेत आणि सरकारला एकूणच कार्बाईड प्रकरणाचा शेवट करावयाचा आहे. अशा स्थितीत काय होणार ह्या हजारो गॅस–पिडीत रोग्यांचे ? तपन बोस यांनी आपल्या कॅमेराच्या सहाय्याने अशा अनेक रोग्यांची गाठ ह्या फिल्ममध्ये प्रेक्षकांशी घालून दिलेली आहे. ती सर्व दृश्येच मनात कालवाकालव निर्माण करणारी आहेत. तपन बोस ह्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास 'भोपाळ शोकांतिका ही शांततेच्या काळातील हिरोशिमा शोकांतिका आहे. आणि म्हणून भारतातील सर्वच लोकांनी त्या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करून त्यावर उपाययोजना करावयाची आहे. माझ्या ह्या शॉर्ट–फिल्ममुळे थोडी बहुत जरी जागृती झाली तरी माझ्या मनाला मोठे मानसिक समाधान मिळणार आहे.'

खरोखरच भोपाळच्या २–३ डिसेंबर रात्रीच्या आठवणी अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. ज्यांनी पुण्याला पानशेतचा प्रलय पाहिला त्यांना थोडीबहुत त्याची कल्पना येऊ शकेल. माझ्या स्वतःच्या भावाच्या शोधार्थ ज्या वेळी आम्ही स्वतः भोपाळला ४ डिसेंबरला संध्याकाळी पोहोचलो त्यावेळी सुद्धा भोपाळचे दृश्य भीषण होते. रस्त्यारस्त्यावर गुरे–ढोरे मृत पडलेली होती. भोपाळला एखाद्या मृत आणि उजाड शहराचे स्वरूप आलेले होते. हॉस्पिटलमध्ये बाजूच्या खोलीत प्रेतांचे ढीग लावलेले होते. जागा नाही म्हणून एकावर एक प्रेते जाळली जात होती. हवेची दिशा त्या वस्तीकडे नव्हती म्हणूनच आमच्या भावाची वसाहत वाचली. येताना भोपाळ रेल्वेस्टेशनवर आमचा एक ओळखीचा रेल्वे कंडक्टर भेटला. त्याने रेल्वे स्टेशनवर मृत झालेल्या २१ रेल्वे सेवकांची यादीच दाखविली. त्यातच भोपाळ रेल्वे स्टेशन–मास्तर जागच्या जागीच आपली ड्युटी बजावीत असताना मृत झाल्याचे त्याने सांगितले. त्याने दिलेल्या संदेशामुळे अनेक गाडया हुशंगाबादलाच थांबविल्या गेल्या. 'टिटॅनिक' बोट बुडाली त्यावर एक सुंदर चित्रपट निघाला होता. त्या बोटीचा कर्तव्यदक्ष कॅप्टन शेवटपर्यंत बोटीवर होता. एकेक मजला बुडत गेला तसतसा तो वरच्या मजल्यावर यावयाचा. सर्वांची त्याने सुटका केली आणि शेवटी बोटीबरोबर त्याने जलसमाधी घेतली. भोपाळच्या स्टेशनमास्तरचे काय ? त्याच्यावर कोण सिनेमा काढणार ? त्याच्या कर्तव्यदक्षतेची कोण दखल घेणार ?

— शरश्चंद्र

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# मेळावा, परिसंवाद - माणूसमित्रांचा

माणूसमध्ये लावली त्यामुळे शरद जोशी बोलायला लागले तेव्हा त्यांच्याकडून काही अपेक्षा होत्या. जोशी म्हणाले, 'श्रीभाऊंच्या निवेदनाचा आणि सकाळ-पासूनच्या चर्चेचा काही संबंध नाही. त्यांच्या निवेदनात माणूस आता संपला असं म्हटलेलं नाही. फक्त काही मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत. त्यातला एक मुद्दा मला पटला. माझं आधीपासून एक मत आहे, ते मी चर्चेच्या ओघात श्रीभाऊंना सांगितलंही आहे की, कोणत्याही कार्यकर्त्याने आपल्या कार्याचा कालावधी आधीपासूनच निश्चित केलेला असला पाहिजे. सैन्याचा सेनापती दर तीन-चार वर्षांनी बदलतो, त्याला निवृत्त करण्यात येत. मग त्याची शारीरिक अवस्था कितीही चांगली असो. कोणत्याही आंदोलनाचा एक शारीरिक – मानसिक ताण असतो. तो मी किती काळ सोसू शकतो हे आधीच ठरवून घ्यायला हवं. कारण जेव्हा पाच वर्षांपेक्षा अधिक काळ जो आंदोलनाचं नेतृत्व करतो, किंवा करतोय असं म्हणतो, तो स्वतःला आणि इतरांनाही फसवत असतो. आंदोलन त्याच्या हाताखालून निसटून गेलेलं असतं. तेव्हा आता श्रीभाऊ थांबण्याचा विचार करत असतील तर आपण त्यांना परवानगी दिली पाहिजे.'

सकाळच्या परिसंवादाचा संदर्भ घेऊन ते पुढे म्हणाले, 'ध्येयवादी तरुण कमी झालेत असं नाही. हे सगळं समाजात पूर्वी होतं तेवढ्याच प्रमाणात आहे. फक्त ध्येयवादी मंडळींचा आणि तुमचा संबंध कमी झाला आहे. तुमच्यात एक संघर्ष रेषा तयार झाली आहे आज इंडिया टुडे खपतो– इतकच नाही तर पार्लमेंटमधले लोकसुद्धा त्यातील मजकूर आधारासाठी वापरतात तेव्हा आज विचार परिवर्तन करणारा शब्द मृत झाला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर एखाद्या लेखकाने जर मतपरिवर्तन करू म्हटलं तर आता त्याला अर्थ नाही. छापील कागदाची किंमत आता राहिली नाही. माणूस चालू राहण्यासाठी आर्थिक अडचण हा महत्त्वाचा मुद्दा नाही; पण तुम्ही जे करताय त्यातूनच तुमचा खर्च का भागत नाही? आता तुमचा राष्ट्रवाद मान्य असलेला समाज राहिला नाही हे लक्षात घेऊन माणूस चालण्यासाठी आवश्यक ती तडजोड करायला तुम्ही तयार आहात का? हा मुद्दा आहे

'एखाद्या कामातला आनंद जोपर्यंत मिळत आहे तोपर्यंतच ते काम करत रहावं. एक मित्र म्हणून मी तुम्हाला सल्ला देईन की, आपण कुणाचं काही देणं लागत नाही. आपण एक चांगली इनिंग खेळलात. आता लढाई खेळायची असेल तर हत्यारं बदलावी लागतील.'

## कामातून मैत्री

आ. विनायकराव पाटील यानंतर बोलले. ते म्हणाले, 'अन्नस्वतंत्रता संचलनात आम्ही सहभागी झालो. तिथपासून आमची मैत्री आहे आमच्यासारख्या खेड्यातल्या लोकांची मैत्री छापील मजकुरातून होत नाही तर प्रत्यक्ष घटना घडतात, कार्य घडतात त्यातून आमची मैत्री जुळते. श्रीभाऊंच्या परिचयाचं मैत्रीत रूपांतर होण्यात ज्या एक–दोन महत्त्वाच्या घटना घडल्या त्या सांगायच्या तर आणीबाणीच्या काळात त्यांनी एक विशिष्ट भूमिका घेतली आणि शेवटपर्यंत ते त्या भूमिकेला चिकटून राहिले. अनेकांनी आणीबाणीच्या काळात आपल्या सुरुवातीच्या भूमिका शेवटी बदलल्या. ज्यावेळी आणीबाणी उठली, इंदिरा गांधींचा पराभव झाला, त्या रात्री त्यांचा मला फोन आला पुण्यात तेव्हा जल्लोषाच वातावरण होतं–श्रीभाऊंनी मला सांगितलं – 'झालं ते गेलं पण या बाईची शक्ती कमी लेखायचं कारण नाही' एखाद्या विचाराचा शेवटपर्यंत पाठपुरावा करायचा पण त्यात वाहून न जाता लगेच सावध व्हायचं, हा मला त्यांचा विशेष गुण वाटला. तसंच कोणतीही भीती न बाळगता ते आपल्या विचाराचा पाठपुरावा करतात हेही त्यांचं वैशिष्ट्य आहे. यशवंतराव चव्हाणांच्या उक्तींचा संग्रह प्रसिद्ध करावा, त्याला निश्चित खप आहे असं मला वाटतं असं मी त्यांना सांगितलं. ते म्हणाले – खप असेलही. पण मी हे काम करणं योग्य ठरणार नाही आणि त्यांनी ते काम केलं नाही. या त्यांच्या गुणावर मी लुब्ध झालो. भीती आणि लोभ याच्या पलीकडे जाऊन काम करणे हाच त्यांचा ध्येयवाद असावा आणि या पुस्तकाचं काम लाटकरांकडे चालू असताना त्यांनी त्यांचं पुस्तक असल्याप्रमाणे तिकडे लक्ष पुरवलं, ते चांगलं निघावं याची काळजी घेतली आणि तयार पुस्तक दिलं. म्हणजे मी संपादक वेगळा आणि आमची मैत्री वेगळी. तेव्हा आमच्या मैत्रीतही मी हेच धोरण ठेवलं आहे. माणूस वेगळा आणि आमची मैत्री वेगळी. त्यांचं ऑफीस हा अशाच विविध क्षेत्रात आपापल्या मस्तीत कार्य करत राहणाऱ्या लोकांचा अड्डा आहे असं मी समजतो. यात त्यांची भूमिका कुटुंबप्रमुखाची आहे.

'आज मी इथे आलो तेव्हा मला वाटलं माणूसचा पंचविसावा वाढदिवस म्हणजे २५ सुवासिनी ओवाळतील, पंचवीस लाखाची थैली देतील आणि कार्यक्रम संपेल पण पुण्याबद्दलचे आमचे अंदाज नेहमीच चुकत आले आहेत. श्रीभाऊंना मी मित्र म्हणून सांगतो की, पंचवीस वर्षांपूर्वी तुम्हाला वाटलं, तुम्ही माणूस सुरू केलात. पंचवीस हजारांचा खप पाहिलात, पाच हजारांचा सोसलात. या पंचवीस वर्षांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात तुम्ही हाक दिलीत की प्रतिसाद देणारे अनेक मित्र तुम्हाला लाभले आहेत. तुमच्या कोणत्याही निर्णयात आम्ही तुमच्याबरोबर आहोत; पण आत्तापर्यंत तुमच्या काही गोष्टी–लिहिणं, वाचन, कौटुंबिक लहान-सहान गोष्टी राहून गेल्या असतील तर हा निर्णय तुम्ही करा. तुमची नक्षत्राची देणी द्यायची राहिली असतील तर जरूर द्या पण कोणत्याही अडचणीसाठी माणूस थांबत असेल तर तसे होऊ न देण्याचे आश्वासन आम्ही देतो.'

सत्कारप्रसंगी झालेली ही मनमोकळी मनोगतं दि. वि गोखले यांच्या अध्यक्षीय छोट्या भाषणानं संपली. जेवणाची वेळ झाली होती. एक वाजत आला होता. सत्काराला उत्तर देताना श्रीभाऊ काय बोलतात हे ऐकायला सारेच उत्सुक होते. त्यापूर्वी माणूसनं असंच चालत रहायला हवं असं सांगताना दि वि. गोखले म्हणाले, 'माजगावकर असतील तरच माणूस चालावा. अन्यथा

नाही. त्यांच्या विचारात निराळा सूक्ष्म पैलू असतो. ते कोणाऱ्यातही जो चागला भाग आहे तो आपल्यासमोर माडतात. हे त्याच वैशिष्टय मोठं मोहक आहे. यामागे खोलवर विचाराची बैठक आहे अशा प्रकारे विचार करू शकणारे महाराष्ट्रात कमी आहेत म्हणून जे आहेत ते टिकण आवश्यक आहे माजगावकराना बदल आवश्यक वाटतो तो निराशेपोटी असावा असं मला वाटतं. सगळ्यानाच मधूनमधून निराशा येते, ती कोणाला चुकलेली नाही. आजच्या स्पर्धेच्या युगात माणूससारखं ध्येयवादी नियतकालिक चालवणं अवघड आहे त्यात निराशा येण अपरिहार्य आहे; पण आज पचवीस वर्ष पाजळून लखलखीत केलेल हत्यार टाकून चाललात कुठे? शरद जोशी म्हणाले त्याप्रमाणे पाहिजे तर पुन्हा धार लावून घ्या; पण निराशावाद टाकून द्या. ग्रामायनच कार्य, हिंदुत्ववादाच कार्य, नव्या अर्थकारणाची जाणीव आज लोकांना माहीत व्हायला हवी आहे. तेव्हा माजगावकराना न थाबता चालण्याची मी सर्वांतर्फे विनती करतो. पु. ग. सहस्रबुद्धे शेवटपर्यंत शरपंजरी पडलेले असूनसुद्धा हे करा, ते करायला पाहिजे असं सागत होते तेव्हा दमण्याची भाषा न करता नव्या दमानं चालत रहा.'

सत्कार समारंभाला उपस्थित राहिलेले माजगावकर कुटुंबीय आणि या कार्यक्रमाला उत्स्फर्त प्रतिसाद देणाऱ्या सर्व उपस्थिताचे रगा मराठे यांनी उचित शब्दात आभार मानले आणि माजगावकर बोलायला उठले. श्रीभाऊंचं बोलणं अतिशय सहज, साधं, सकाळपासूनच्या चर्चेतल्या बहुतेक मुद्द्याना स्पर्श करणारं आणि कृतज्ञता भाव व्यक्त करणार होतं. ते म्हणाले, 'हा वैयक्तिक माझा सत्कार नसून माणूस यशस्वी करण्यात ज्याचा ज्याचा सहभाग होता त्या सर्वांचा आहे, प्रतिकरूपाने माझा आहे,याची मला जाणीव आहे.' दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे याचाही सत्कारात समावेश केल्याबद्दल समितीतील सर्व मित्राचे त्यांनी विशेष आभार मानले. या दोघाचे सहकार्य माणूस वाटचालीत मोलाचे ठरले, हे त्यांनी आवर्जून सागितले आणि पुढे ते म्हणाले, 'माणूस सुरू करण्यापूर्वी निदान दहा–पाच क्षेत्रात तरी माझी भटकती झाली आहे. त्यासाठी काही वर्ष मी खर्च केली आहेत प्रथम मला प्राध्यापक व्हायचं होतं कारण माझं तस शिक्षण होतं. नतर माझ्या लक्षात आल की,माझ्या स्वभावाची जी स्वायत्ततेची मागणी आहे ती यात पूर्ण होणार नाही. नतर शेतीकडे मी वळलो होतो. अनेक प्रयोग करून एखाद साप्ताहिक मासिक हेच आपल क्षेत्र असू शकत अस माझ्या लक्षात आल. इतर ठिकाणची जी काही बंधन असतील ती आपल्याला मानवणार नाहीत अशा भूमिकेतून ६१ च्या सुमारास माणूसच्या टप्प्यावर येऊन पोचलो आणि यात जेवढ स्वातत्र्य अपेक्षित होतं तेवढं मला गेल्या पंचवीस वर्षात लाभलं आणि यालाच जर तुम्ही मस्ती वगैरे म्हणत असाल तर ते तस आहे. अगदी आणीबाणीच्या काळातही मी ते स्वातत्र्य राखलं, उपभोगलं आणि आपण जे आज मोठ्या सख्येनं उपस्थित आहात त्यावरून आपल्याला ते आवडलं, पटल असं मी समजतो. आपण केलेल्या कार्याचं कोणी मूल्यमापन केल, त्याची पावती दिली तर आपल्याला बरं वाटत. आपण पेरलेल बी उगवल आहे हे पाहून समाधान लाभत.

### अभिराष्ट्रेण वर्धताम्

'सकाळी ध्येयवाद वगैरे जे बोलण झाल ते माझ्या तब्येतीत न बसणारं आहे. मी जेव्हा 'माणूस' सुरू केला तेव्हा दोन गोष्टी माझ्यासमोर स्पष्ट होत्या. एक म्हणजे मी हे कोणासाठी सुरू करतोय याचं मला तेव्हाही पूर्ण भान होत. केवळ पैशामागे लागलेला उथळ व शहरी मध्यमवर्ग हा माझा वाचक नाही हे मला तेव्हाही माहीत होतच. त्यापूर्वी ३/४ वर्ष खेड्यापाड्यातून मी हिंडलो होतो. खेडेगावातून पुढे आलेला नवा मध्यमवर्ग, त्याच्याकडे मला जायच आहे, हे मला ६१ जूनमध्येही माहीत होत. या वर्गाला करमणुकीबरोबरच आणखी वेगळ्या ज्या दोन–तीन गोष्टी माझ्याजवळ होत्या त्या द्यायच्या या भूमिकेतून ही सुरुवात झाली. फक्त अर्थकारण, फक्त स्वार्थ याच्यामागे जर हा वर्ग लागला तर त्याने देश पुढे जाणार नाही. तेव्हा मला त्यांना राष्ट्रवाद सांगायचा होता. हा देश, हा समाज माझा आहे, त्याच मी काही तरी देणं लागतो, हाच नाही तरी राष्ट्रवादाचा मला अभिप्रेत असलेला आशय होता राष्ट्रवादाशिवाय अशी भावना दुसऱ्या कोणत्याही विचारसरणीतून निर्माण होऊ शकत नाही. 'अभिराष्ट्रेण वर्धताम्' हे माझं पहिल्या अकापासूनच बोधवाक्य होतं. तू मोठा हो,विकसित हो,पण समाजासहित.असा वाचक पूर्वीही कमीच होता आणि आजही तेवढाच आहे. वाचक कमी झाला असं माझं म्हणणं नाहीच. कारण जगात कुठेही हे प्रमाण कमीच आहे. पण आता माझ्याकड साधनं पूर्वीचीच आहेत ती वाढवायची आहेत का? त्यासाठी आवश्यक ती आर्थिक जबाबदारी या वाढत्या वयात मी पेलायची का? पूर्वी ही माड माडताना २५ हजारात काम होत होतं आता त्यासाठी २/५ लाख लागणार आहेत. हे पुन्हा नव्यान जुळवायच का हा माझा प्रश्न आहे. मी बुडलो–मला वाचवा असं मी म्हटलेल-लिहिलेल नाही या रडव्या, पराभूत मनोवृत्तीचा मला तिटकारा आहे, संताप आहे गेली २५ वर्ष मी माझ्या मस्तीने माणूस चालवला. आताही तो जगणार असेल तर याच पद्धतीने तो जगला पाहिजे. फक्त तुमच्याशी सवाद साधून हा निर्णय घ्यावा अस मला वाटल्यामुळे मी ते निवेदन दिलं. कारण सत्यकथा मासिक बद झालं तेव्हा काही जणानी म्हटल, की आम्हाला कळलं असतं, तर काही करता येण शक्य झालं असतं. आर्थिक अडचण, वाचक बदलला आहे वगैरे मला काही म्हणायच नाही. ध्येयवाद या शब्दाचाही काही वेळा मला तिटकारा येतो खेड्यातून पुढे आलेला नवा सुशिक्षित तरुण वर्ग, शहरात तंत्रविद्येकडे वळलेला समाज याच्या संमिश्रणातून तयार झालेल्या नव्या मध्यमवर्गासाठी मी माणूस काढला. सगळ्यानाच मध्यमवर्गात आणणं, त्यासाठी प्रयत्न करणं हा निरोगी सामाजिक दृष्टिकोन आहे. दलितवर्गालासुद्धा मध्यमवर्गात आणणं हे आपल काम आहे. मी आणि तू एका पातळीवर आलो तरच आपला सवाद होऊ शकेल. अशा तऱ्हेची नवे हुडकण्याची, जुन्याशी त्याचा साधा जुळवण्याची मला पहिल्यापासून आवड असल्यामुळे या माझ्या प्रयत्नाला यश लाभले. आणि विविधतेमुळे ते टिकून राहिले. आता हे देण्याची यंत्रणा फार मोठी झाली आहे. बुद्धिमत्तेत महाराष्ट्र मागे आहे,

चागल्या लेखकाची वाण आहे अस मला मुळीच वाटत नाही आपल्याकडचे लेखकही इग्रजी नियतकालिकाच्या दर्जाचं लिहितात, लिहू शकतात. पण आपण त्याना आवश्यक ती साधनसामग्री देऊ शकत नाही. ती देण्या-साठी यापुढे खूप यत्रणेची गरज आहे. आता यापुढे मी ती जमवायची का हा प्रश्न आहे. त्याशिवाय विकासाचा पुढचा टप्पा गाठला जाणार नाही. हा मनूच्या माशाचा प्रवास आहे. तुम्ही विहिरीत असता. तुमच्या लक्षात येत की, हे आता आकुचित क्षेत्र वाटतय. यावेळी जर तुम्ही तळयात गेला नाहीत तर मासाही मरतो आणि विहिरीच पाणीही दूषित होतं हा विकासाचा क्रम आहे. त्याच्याशी तुम्ही फार शत्रुत्व करू शकत नाही. तुमच्या सर्वांच्या आग्रहासाठी मी आणखी थाबेनही पण केव्हा तरी मी पचावन्नवरून साठकडे जाणारच आहे आणि आता जर मी व्यव-स्थापकीय कामात अधिकाधिक अडकलो तर माझी दुसरी सपादकाची-लेखनाची कामगिरी मी केव्हा करणार ?

'सपादन हीही एक सर्जनशील कला आहे. मला वाटत मी एक गिर्यारोहक आहे. तुम्हाला निरनिराळया पर्वतराजीवर घेऊन जावं, विविध क्षेत्रातली उच शिखरं दाखवावीत, त्याचे सौंदर्य, त्याची उत्तुगता-भव्यता याचा अनुभव घ्यावा, तेथील गर्द झाडी,दऱ्याखोऱ्या, खाचखळगे, वनराया तुमच्या दृष्टीस आणून द्याव्यात, अशी माझी सपादक म्हणून भूमिका असते. हे एक गिरीभ्रमण आहे. हे जोपर्यंत जमतंय तोपर्यंतच करण्यात मजा आहे त्या-ऐवजी दर आठवडयाला एका ठिकाणी बसून तुमच प्रबोधन करत बसलो किंवा कुणा-कुणाच्या भानगडीवर प्रकाश टाकत राहिलो तर...खर तर दुसऱ्याच्या भानगडी छापून स्वत चं वर्तमानपत्र खपवणं मला अनैतिकच वाटतं आता विषय निघाला म्हणून सागतो की,हसा वाडकरच आत्मचरित्र आम्ही छापतो आहोत हे समजल्यावर त्या क्षेत्रातील काही मान्यवर मडळी गडबडून गेली आपला उल्लेख आला तर-बाई काहीतरी बोलून बसल्या तर- त्यातल्या एका व्यक्तीनं मला निरोप पाठवला की, जर तुम्ही आमची नावं छापलीत, तर आम्ही कोर्टात केस करू. मी त्याना निरोप पाठवला की, माझ्या सपादकीय कात्रीत जो भाग मी अगो-दरच बाजूला काढून ठेवलाय त्यात तुमच नाव आहे. पण जर तुम्ही मला अशा प्रका-रची धमकीच देत असाल तर मी तो भाग परिशिष्ट म्हणून छापीन. निदान दहा-पाच माणसांच असं वस्त्रहरण करण मला अशक्य नव्हत. किंवा 'भोगावादी' होणही मला आवडत नाही. दर आठवडयाला देश संकटात आहे, खड्डयात चालला आहे म्हणून ओरडत राहण्यात काय अर्थ आहे ? त्यापेक्षा तुमच्या साथ-संगतीनं शिखराच्या दिशेने चालणं मला अधिक आवडतं. खरो-खरच माझा हा पंचवीस वर्षाचा प्रवास मस्तीतच झाला. काही वेळा नैराश्य, अडचणी आल्या पण त्याबद्दल मला पश्चा-त्ताप मात्र मुळीच होत नाही. शेवटी ही मैफिल आहे रगलेली असली, सर्जनशील असली तरी ती केव्हातरी थाबायलाही हवी. अजून काहीच निर्णय झाला नाही. तुम्ही सगळे माझे मित्र आहात-तेव्हा आपण सगळे मिळूनच हा विचार करणार आहोत. निस-र्गाचा क्रम लक्षात घेऊनच मी माझे निवेदन दिले होते याबद्दल बोलण्यासारखे खूप आहे पण आता बराच उशीर झाला आहे'

श्रीभाऊच्या माणूसच्या संदर्भातल्या व्यक्ति-गत-सपादकीय आठवणी, माणूसच्या वाट-चालीतले महत्त्वाचे टप्पे, 'माणूस'च्या प्रकृतीची नियतकालिके चालू रहाण्यासाठी खरच काय करता येईल,यासर्वाबद्दल श्रीभाऊं-कडून जास्त ऐकण्याची सगळयानाच उत्सु-कता होती पण थाबायच कस आणि कुठे याचं भान श्रीभाऊना किती चागल आहे याचा प्रत्यय पुन्हा आला. जेवणानतर पुन्हा बोलण्याच ठरवून सकाळचा हा कार्यक्रम सपला. दि. वि. गोखलेंनी माज-गावकरांचा सत्कार केला आणि समितीच्या वतीनं भेट म्हणून आणलेली शाल विनायक-रावानी त्याना पाघरली. साहित्य परिषदेच्या वतीने म श्री.दीक्षित व विद्यार्थी परिषदेच्या वतीने द. मा मिरासदार, साप्ताहिक मुद्रणचे श्री. पाध्ये, सौ. सरोजा परुळकर, शाताबाई किर्लोस्कर, सौ. चपाताई कुलकर्णी यानीही पुष्पगुच्छ देऊन श्री. ग. मा.चे अभिष्टचिंतन केले.

## उत्तररंग

सकाळच्या कार्यक्रमाइतकाच जेवणाचा कार्यक्रम रंगला. गप्पा मारता मारता, पुन्हा भेटायच ठरवताना, नव्या ओळखी पक्क्या करताना जेवणाचा कार्यक्रम थोडा जास्तच रंगला. सहभोजनानतर 'माणूस'चे लेखक गो. रा. जोशी ('नाटचपढरी' चे लेखक) यानी नाटयक्षेत्रातल्या जुन्या आठवणी सागितल्या. या छोटया मध्यतरानतर श्रीभाऊ ठरल्याप्रमाणे पुन्हा बोलायला उभे राहिले. पण जेवणापूर्वीचा चर्चेचा सूर पुन्हा जोडला जाण्याची ही वेळ नव्हती, तसा मूड नव्हता. श्रीभाऊ एवढच म्हणाले, 'दि. वि गोखले मुबईहून खास या कार्यक्रमासाठी आले या-बद्दल त्याचे आभार मानायला हवेत. त्याचं आणीबाणीतलं काम फार मोठं आहे. ते प्रत्यक्ष तुरुगातही सत्याग्रह करून गेले. त्यांच्याबद्दल माझ्या मनात अतिशय आदर आहे. हे एक खणखणीत नाणं आहे. त्याच्या बोलण्याला कृतीचा आधार आहे. आणि अशा व्यक्तीकडून सत्कार होणं हा मला मोठा गौरव वाटतो.' नतर सकाळच्या चर्चेत आलेल्या एका महत्त्वाच्या मुद्दयाचा विचार त्यानी केला. तो म्हणजे श्री. ज. जोशी यानी पुसट उल्लेख केलेला आणि स. ह. देशपाडे यानी जरा स्पष्टपणे माडलेला 'माणूस' मधल्या वैचारिक मोकळेपणाचा मुद्दा. 'माणूस'ची आणि माजगावकराची निश्चित भूमिका कोणती ? की तशी ठाम भूमिकाच नाही, हा. त्यावर श्रीभाऊ म्हणाले, 'माणूस हे विचाराचं मुक्त व्यासपीठ आहे याचा अर्थ हा वैचारिक गोंधळ नाही. ज्या ज्या वेळी काही महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत त्या त्या वेळी सपादकीय लिखाणातून मी माझी भूमिका माडली आहे. माझी भूमिका उदारमतवादी आहे. या उदारमत-वादाचा गैरफायदा मात्र मी कोणाला घेऊ दिलेला नाही मी वेगवेगळया विचारसरणीना 'माणूस'मध्ये जागा दिली. माझी भूमिकाही त्या त्या वेळी स्पष्ट केली उदारमतवाद हा भारतीय माणसाचा स्थायीभावच आहे असे मला वाटते. हा आपल्या सतपरपरेतून आलेला आहे. तेव्हा माझ्या उदारमत-वादाचा गैरफायदा 'माणूस'मधून जर कोणी करून घेतला असेल तर माझ्या मित्रानी मला ते दाखवून द्याव.'

शेवटी ते म्हणाले 'मैफील केव्हा संपवावी याचंही एक शास्त्र असतं. तेव्हा मी आता फार ताणत नाही. पण 'माणूस' तर्फे दिवाळीनंतर होणाऱ्या कार्य-क्रमाचं आग्रहाचं निमंत्रण आत्ताच देऊन

ठेवतो. त्यावेळी आज दिवसभर झालेल्या चर्चेच्या आधारे आपण काही पुढील विचार ठरवू शकू असं मला वाटतं. कारण अशा चर्चेतून घासून–पुसूनच माझा निर्णय ठरणार आहे वाचक–लेखक–अर्थकारण या सर्व दृष्टींनी विचार करूनच निर्णय घेतला जाणार आहे. २५ वर्षं झाली आहेत आता सिंहावलोकनाची वेळ आली आहे अशा विचारानेच मी निवेदन केले होते. आणि सर्व संबंधित लोकांचा विचार घेऊनच पुढील १०-२० वर्षांचा निर्णय करता येईल. आपण सर्वांनी पुन्हा एकदा भेटायचं आहे म्हणून आता इथेच थांबू.'

सकाळी नऊ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम असा दुपारी चार वाजता संपला. या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या संपादकाच्या वाटचालीत त्याला साथ देणारे, प्रोत्साहन देणारे, प्रसंगी टीका करणारे निरनिराळ्या क्षेत्रातले लेखकमित्र त्या संपादकाबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी, वाटचालीची पावती देण्यासाठी आपणहून एकत्र येतात, सकाळपासून संध्याकाळपर्यंत चर्चा-परिसंवादात बोलतात हे फार वेगळं, चांगलं, नोंद घेण्यासारखं होतं. सुरुवातीपासून कार्यक्रमात लागलेला एक सहजतेचा सूर श्रीभाऊंच्या निरोपाच्या बोलण्यापर्यंत कायम राहिला आणि लेखक-संपादकामधल्या अकृत्रिम जिव्हाळ्याचं, 'माणूस' सारख्या विचारप्रधान, गंभीर 'देणाऱ्या' नियतकालिकाबद्दलच्या आपल्या मनात असलेल्या आस्थेचं, बांधिलकीचं एक लखलखीत सहज दर्शन यात स्पर्शून गेलं.

माजगावकराचा 'माणूस' पुढे चालू राहील किंवा राहणार नाही, पण या चर्चेतून, दिवसभराच्या एकत्र येण्यातून एक लक्षात आलं की, समाजाला 'माणूस' अजूनही हवा आहे. मग तो कुणा 'दुसऱ्या' माजगावकराचा असला तरी चालेल. ☐

# पुणे मॅरेथॉन स्पर्धेत आदिवासी स्पर्धक

'शोधा म्हणजे सापडेल' ही मराठीतील एक साधी म्हण. पण या तीन शब्दाचा अर्थ सर्वांगीण विकासाला निश्चितच उपयोगी पडतो. माणसाचे विकासाचे क्षेत्र कोणतेही असो, या म्हणीच्या अर्थाप्रमाणे वागल्यास म्हणजेच प्रयत्न केल्यास यश मिळण्याची चिन्हे निश्चित दिसतात या म्हणीप्रमाणेच महाराष्ट्र राज्य हौशी अॅथलेटिक्स संघटनेने मैदानी स्पर्धेत भारताची शान वाढावी या हेतूने पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील आदिवासी मुला–मुलींवर लक्ष केंद्रित केले आहे हे आदिवासी स्पर्धक २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या तिसऱ्या पुणे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत धावणार आहेत. यंदाच्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत परदेशी धावपटूंप्रमाणेच हे आदिवासी स्पर्धकही 'खास' आकर्षण ठरणार आहेत.

खेड्यापाड्यात राहणारी मुले शहरी मुला–मुलींपेक्षा शारीरिकदृष्ट्या अधिक सुदृढ असतात, चपळ असतात. त्यांच्या कलागुणांना वाव देऊन योग्य मार्गदर्शन दिले तर आदिवासी स्पर्धक भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये निश्चितपणे गाजवतील. पुणे जिल्हा हौशी अॅथलेटिक्स संघटना व महाराष्ट्र राज्य हौशी अॅथलेटिक्स संघटना या दोन संघटनांनी पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील आश्रम शाळात समक्ष जाऊन आदिवासी मुला–मुलींची पहाणी केली. त्यांची वैद्यकीय तपासणी केली व या आदिवासी मुलांसाठी त्यांच्याच गावात एक स्पर्धा आयोजित केली. आतापर्यंत भोर, आंबेगाव, जुन्नर, वडेश्वर या ठिकाणी आदिवासी मुलांच्या स्पर्धा झाल्या आहेत. या स्पर्धकांपैकी विशेष प्राविण्य दाखविणाऱ्या आदिवासी स्पर्धकांची १ महिन्याच्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड करण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण पुण्यातच होणार आहे.

## जास्त उत्साही

आतापर्यंत झालेल्या आदिवासी मुलांच्या स्पर्धेत आदिवासी मुलांनी खूपच उत्साह दाखविला आहे. या मुलांना लहान–वयातच योग्य मार्गदर्शन लाभले तर भविष्यकाळात या स्पर्धकांमधून शिवनाथसिंगसारखे दर्जेदार धावपटू निर्माण होऊ शकतील पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत हे आदिवासी स्पर्धक धावतील तेव्हा त्यांचे कौशल्य निश्चितपणे जाणवेल. शारीरिक तन्दुरुस्तीच्या बाबतीत शहरी स्पर्धकांपेक्षा सरस असलेले आदिवासी स्पर्धक आपले वेगळेपण निश्चितपणे सिद्ध करतील. शहरी जीवनापासून दूर राहिलेल्या व अत्याधुनिक सुखसोयींना व योग्य मार्गदर्शनाला वंचित झालेले हे उत्साही स्पर्धक पुण्यातील रस्त्यावरून धावतील तेव्हा यातूनच एखादा शिवनाथसिंग निर्माण होईल असे वाटल्याशिवाय राहणार नाही. या आदिवासी स्पर्धकांना भूक आहे ती फक्त योग्य मार्गदर्शनाची व प्रोत्साहनाची. हे काम पुणे जिल्हा व राज्य हौशी अॅथलेटिक्स संघटनेने स्वीकारले आहे. या कामाचे फळ निश्चितच चांगले मिळणार यात शंकाच नाही. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेला जागतिक स्पर्धेचा दर्जा प्राप्त झाला आहे. या जागतिक कीर्तीच्या मॅरेथॉन स्पर्धेत प्रथमच उतरणाऱ्या आदिवासी स्पर्धकांनी ही सुवर्णसंधी प्राप्त करून देणाऱ्या पुणे जिल्हा हौशी संघटनेचे व तिच्या कार्यकर्त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

## राज्यव्यापी योजना

भारताच्या क्रीडाक्षेत्रात आदिवासी स्पर्धकाचा प्रवेश करण्याचे काम पुणे जिल्हा हौशी अॅथलेटिक्स संघटनेने केले आहे. पण ही प्रक्रिया अशीच पुढे चालू राहण्यासाठी राज्यव्यापी योजनेची गरज आहे. महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यात आश्रमशाळा आहेत त्या जिल्ह्यातील संघटनेनेही त्या शाळातील आदिवासी स्पर्धकांची निवड करणे आवश्यक आहे. पुणे जिल्हा संघटनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे इतर जिल्हा संघटनांनी केले तरच आदिवासी खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्याची संधी मिळेल.

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत आदिवासी स्पर्धक भाग घेणार आहेत. पण या आदिवासी स्पर्धकांना फक्त धावण्याचेच प्रशिक्षण न देता मैदानी स्पर्धेतील इतर क्रीडा प्रकाराचेही प्रशिक्षण द्यावे. हे प्रशिक्षण योग्य प्रकारे दिले गेले तर या आदिवासी स्पर्धकांमधूनच पी. टी. उषा, एम्. डी. वलसम्मा यांच्यासारखे दर्जेदार मैदानी स्पर्धक तयार होतील. पुणे जिल्हा हौशी संघटनेच्या या अभिनव उपक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या क्रीडाखात्याने व आदिवासी कल्याण खात्याने सक्रीय सहकार्य दिले तर महाराष्ट्रात अनेक उत्कृष्ट मैदानी स्पर्धक तयार होतील.

महाराष्ट्र शासनाने आदिवासी जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना आखल्या आहेत. राज्याचे क्रीडामंत्री विजयसिंह मोहिते-पाटील आणि आदिवासी कल्याण मंत्री पिचड यांनी आदिवासींच्या कल्याणकारी योजनेचा उपयोग आदिवासींच्या क्रीडाविकासासाठीही करून घ्यावा. शहरी जीवनापासून दूर राहिलेल्या या आदिवासी खेळाडूंना आपल्या अंगी असलेले गुण सुशिक्षित जगाला दाखविण्याची संधी महाराष्ट्र शासनाने जरूर द्यावी.

—श्रीकांत खरे

# म्हातारा न इतुका

तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही पण एक्याण्णव वर्षाचे एक आजोबा सध्या एका अमेरिकन विद्यापीठात गणकयंत्रासबंधी अभ्यासक्रम शिकण्यात गर्क आहेत तर पंच्याऐंशी वर्षांच्या एक आजीबाई कुटुंबाचा इतिहास कसा लिहावा याबद्दलचा अभ्यासक्रम शिकत आहेत. या दोघांच्याही उत्साहाचे कारण आहे त्यांचे नातू–पणतू ! आजोबाना नातवाशी कॉम्प्युटरबद्दल चर्चा करावयाची आहे. त्याच्या यासंबधीच्या गप्पागोष्टीत भाग घ्यावयाचा आहे तर आजीबाईंना स्वत:च्या कुटुंबाचा इतिहास लिहून काढून तो आपल्या नातवांना ऐकवावयाचा आहे. असे उत्साही वृद्ध अनेक असू शकतात हे लक्षात घेऊन त्रेसष्ट वर्षे वयाच्या मार्टीन नोल्टन या गृहस्थाने 'अेल्डर होस्टेल प्रोग्रॅम' नावाची एक चळवळ अमेरिकेत सुरू केली. या चळवळीला उत्तम प्रतिसाद मिळाला व आजही मिळत आहे. १९७६ साली जेव्हा ही चळवळ सुरू झाली त्यावेळी यात फेवळ २०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता पण आज या चळवळीचे लोण सर्व जगभर पसरत असून आज ते दहा देशात पसरले आहे. जगातील ७०० विद्यापीठामधून आज जवळ जवळ ७०,००० वृद्ध या योजनेचा फायदा घेत आहेत.

'अेल्डर होस्टेल' हे सेवाभावी सघटन असून याचे उद्दिष्ट वयोवृद्धासाठी शैक्षणिक संधी स्वस्त दरात उपलब्ध करून देणे हे आहे. आता ही एक आतरराष्ट्रीय चळवळ झालेली असून तिचे संचलन या सघटनेमार्फत चालू आहे.

आधुनिक औद्योगिकरण व एकूण भौतिक प्रगती यामुळे पाश्चात्य देशातील लोकाचे सरासरी जीवन बरेच वाढले आहे व वृद्धलोक आपले आरोग्य देखील चागले ठेवू शकतात कारण आयुर्विज्ञानाची प्रगती. त्यामुळे त्याना नवनवीन गोष्टी शिकण्याची हौस कायम असते. त्याची ही ज्ञानलालसा पुरविण्यासाठी चालू केलेली ही चळवळ खरोखर स्तुत्य मानली पाहिजे.

सेवानिवृत्तीमुळे माणसाच्या मनात एक प्रकारची उदासीनता निर्माण होते. आता आपला काही उपयोग नाही व आपण काही करू शकणार नाही अशी आत्मग्लानी या लोकामध्ये बरेचदा निर्माण होते. ती घालविण्यासाठी अशा उपक्रमांचा फार उपयोग होऊ शकतो. शिवाय आधुनिक शिक्षणशास्त्रीय सिद्धाताप्रमाणे वय वाढल्यावरही माणसाच्या नवीन ज्ञान मिळविण्याच्या क्षमतेत मुळीच फरक पडत नसल्याने वाढत्या वयातही व्यक्तीला या योजनेमुळे नवनवीन ज्ञान ग्रहण करता येऊ शकेल. म्हणूनच अशा उपक्रमाची फार आवश्यकता आहे.

### शिक्षणक्रमाची वैशिष्टचे

या शिक्षणक्रमामुळे म्हाताऱ्याना शारीरिक व मानसिक उत्तेजना प्राप्त होते व त्यामुळे याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. यात विज्ञान, तत्त्वज्ञान, सृजनात्मक लेखन, योगविद्या, सस्कृतीचा अभ्यास, काही प्रकारचे व्यवसाय शिक्षण इत्यादी विविध विषयाचा समावेश करण्यात आला असून याची आखणी अनुभवी प्राध्यापक व विद्यापीठ अधिकारी यानी मिळून केली आहे त्यामुळे यात विषयाची विविधता व कठीणपणाच्या विविध पातळ्या आढळतात. हा अभ्यासक्रम स्वीकारणाऱ्यापैकी ६०% स्नातक असतात तर ३०% शिक्षकी व्यवसायातील असतात. या सर्व बाबी लक्षात घेऊन हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

या अभ्यासक्रमाची आखणी विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेऊन करण्यात आली आहे म्हणजे यातील विद्यार्थ्यांचे कमीत कमी वय ६० वर्षे असल्याने ह्याचा ताण त्याना जाणवणार नाही याची काळजी घेतली आहे. यात होमवर्क हा प्रकार नाही पण पूर्ण अभ्यासक्रमाचे सिलॅबस दिले जाते त्यामुळे हौशी विद्यार्थी खोलीवर अभ्यास करू शकतात. हा अभ्यासक्रम स्वीकारणाऱ्याने होस्टेलवर राहावे अशी अट आहे. त्यासाठी शुल्क व फी फारच नाममात्र आहे. अभ्यासक्रमाला येणारा जास्तीचा खर्च काही फाऊंडेशनस् व कार्पोरेशनस् करणार आहेत.

येथे चाचणी परीक्षा, श्रेणी व किमान पात्रता या बाबीना पूर्ण फाटा देण्यात आला असून यातील विद्यार्थी ऐतिहासिक ठिकाणे पाहणे किंवा जलप्रवास इत्यादी गोष्टी हा अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून करू शकतात. होमवर्क नसल्याने विद्यार्थी सध्याकाळी संगीतसभा, नाटके, खेळ इत्यादी गोष्टी फुकट पाहू शकतात.

### उपक्रमाचे फायदे

या अभ्यासक्रमामुळे मुख्यत्वेकरून म्हाताऱ्यांना नवीन मित्र मिळतात एकच प्रकारचा अभ्यासक्रम शिकणाऱ्यामध्ये मैत्रीची भावना जागृत होते. शिवाय प्राध्यापकाना देखील हा उपक्रम आवडू लागला आहे. परपरागत विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या तुलनेत हे म्हातारे विद्यार्थी कसे वाटतात असे विचारले असता, एक प्राध्यापक म्हणाले, 'या म्हाताऱ्यांना स्वत:च्या मर्यादा कळलेल्या असतात व प्राध्यापकांच्या चुका आढळल्यास त्या दाखविण्याम ते मुळीच घाबरत नाहीत. शिवाय त्याच्या अनुभवाचाही आम्हाला फायदा होतो.' दुसरे एक प्राध्यापक म्हणाले, 'मी या वर्गाची आतुरतेने वाट पहातो. मला वाटते या वर्गातून विद्यार्थ्यांना आमच्याकडून जितके ज्ञान मिळते तितकेच आम्हालाही त्याच्याकडून मिळते. माझ्या विद्यार्थ्यांचे मत जाणून घेण्यास मी सदैव आतुर असतो. त्यांनी जग पाहिलेले असल्याने ते काहीतरी विशेष अनुभव बाळगून असतात ज्याचा आम्हा सर्वांना फायदा होतो.' या विद्यार्थ्यांचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे याना कोणतीही नोकरी करावयाची नसल्याने ते खऱ्या अर्थाने विद्यार्थी असतात, परीक्षार्थी नसतात. त्यामुळे केवळ ज्ञानाकरिता ज्ञान, आनदाकरिता ज्ञान असा त्यांचा दृष्टिकोन असतो. खऱ्या अर्थाने विचाराची देवाण घेवाण येथे शक्य होते व शिकण्याचा व शिकविण्याचा आनंद द्विगुणित होतो.

—अ. ल. देशपांडे

(टाईम जुलै २३, १९८४ व स्पॅन ऑगस्ट १९८५ मधील लेखांच्या आधारे)

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW – 28

# राजहंसची तीन नवी प्रकाशने

## तेंडुलकरांची नाटके

**डॉ. चंद्रशेखर बर्वे**

" वहात वहात आयुष्याच्या मध्यभागी पोचलो आहे. अथांग खोली आता प्रत्यक्ष जाणवू लागली आहे.... समुद्रावरून समुद्रपक्षी फिरतात, तसा मी जीवनावरून मनानं दिशाहीन, निरुद्देश, संथपणे भिरकांडत, तरंगत आहे....उत्सुकता एकच आहे, या समुद्राचा तळ किती खोल असेल, तो कसा दिसत असेल ? " जो तळ दिसला तो तेंडुलकरांनी आपल्या नाटकांतून दाखवला,

समुद्रपक्ष्याप्रमाणे शांतपणे भिरकांडणाऱ्या तेंडुलकरांची नाटके मात्र वादळी अन् वादग्रस्त ठरली !

या साऱ्या म्हणजे पंचवीस नाटकांचा व तेंडुलकरांच्या श्रेयाचा, विवेचक दृष्टीने, पण आस्वादक वृत्तीने शोध घेण्याचा हा एक प्रयत्न–

**तेंडुलकरांची नाटके**

किंमत : तीस रुपये

## कल्पान्त

**मनोहर राईलकर**

आजकाल सटरफटर राष्ट्रंसुद्धा अणुशस्त्रांचे ढीगच्या ढीग बाळगून आहेत. अणुयुद्धाच्या संभाव्य परिणामांचं गांभीर्य त्या सर्वांना समजत असेल का ? आणि एखाद्या बेजबाबदार राष्ट्रानं युद्ध सुरू केलंच तर ?

किरणोत्सर्गी धूळ जगभर पसरली तर ? तर काय होईल ? या प्रश्नाचं ज्वलंत व जिवंत उत्तर म्हणजे ही कादंबरी.

' ऑन द् बीच ' या नेव्हिल शूटच्या कादंबरीचा भावानुवाद

**कल्पान्त**

किंमत : पस्तीस रुपये

## लांडगा आला रे ऽ आला

लेखक : **फर्ले मोवॅट**
रूपांतर : **जगदीश गोडबोले**

फर्ले मोवॅट या जीवशास्त्रज्ञाने घेतलेल्या लांडग्यांच्या जीवनाच्या शोधाची ही कथा. कल्पितालाही मागे टाकणारा, रोमांचक अनुभव मोवॅटला उत्तर ध्रुवावरच्या या सफरीत आला. लांडग्याविषयीची माणसाची पूर्वापार मतं पार कोसळवून टाकणारी ही कहाणी, त्याच वेळी मनुष्य स्वभावावरही विदारक प्रकाश टाकते.

**लांडगा आला रे ऽ आला**

किंमत : तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर ( प. ) मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२ २५ ४५५